
९५०३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
वॉ. नं.

# आजम जिन्हा



लेखक:

एस्. अब्दुल गफ्फार मोहम्मद साहिब
सांगली.

★

REFBK-0006503

किंमत २॥ रुपये

" दि इस्लामिक लिटररी असोसिएशन " सांगली.

माझे परमपूज्य वडील

# मोहम्मद साहेब मरहूम

यांच्या प्रेमळ स्मृतिस

सप्रेम समर्पण.

REFBK-0006503

दि इस्लामिक लिटररी ॲसोसिएशनची

# " पार्श्वभूमि व ध्येय "

आज कित्येक दिवसापासून आमचा विचार चाललेला होता कीं, महाराष्ट्रीय मुस्लिम समाजाकरितां इस्लामिक लिटरेचर प्रकाशन संस्थेची स्थापना करावी व भांडवलशाहीच्या कांहीं विवक्षित पक्षांकडून इस्लाम नि मुस्लिम संस्कृति यां विरुद्ध हिंदी जनतेंत जो भयंकर गैरसमज पसरविण्याचा अव्यापारेषु प्रयत्न करण्यांत येत आहे तो कांहीं अंशानें कां होईना दूर करून, हिंदी जनतेला त्यांच्या खऱ्या जीवना-बरोबर खऱ्या राष्ट्रीयत्वाचीहि ओळख करून द्यावी ! तो सुदीन आज आला, बद्दल त्या सर्व शक्तिमान जगन्नियंत्याचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

आज हिंदी जनतेला प्रामुख्यानें जर कोणता प्रश्न भेडसावीत असेल; तर तो हिंदी स्वातंत्र्याचा होय. परंतु जों पर्यंत हिंदुस्थानांतील प्रमुख जमातींत खरें ऐक्य नि शांतता निर्माण होणार नाहीं! तों पर्यंत तरी हे वारंवार ऐकूं येणारे स्वातंत्र्याचे निनाद स्वप्नतरंगा प्रमाणें आभासमयच ठरणार आहेत म्हणून हिंदी जनतेंत प्रथम ऐक्य नि शांतता निर्माण होणें अत्यावश्यकतेचे आहे व ती खऱ्या धार्मिक ज्ञानानें प्राप्त होईल, अशी आमची निश्चित खात्री आहे. कारण हिंदु धर्माचें

यथार्थ ज्ञान प्राप्त करून घेणारी व्यक्ति दुसऱ्या धर्मावर नाहक शिंतोडे उडवण्यास कधींहिं तयार होणार नाहीं; तसेंच इस्लाम धर्माचें खरें रहस्य समजाऊन घेणाऱ्या व्यक्तिकडूनहि नाहक दुसऱ्या धर्मावर अतिक्रमण करणारी भाषा बोलली जाणार नाहीं. ह्मणून हिंदी जनतेंत खऱ्या धार्मिक ज्ञानाचा प्रसार होणे अत्यंत जरूरीचें आहे. कारण त्यामुळेंच हिंदी जनतेला खऱ्या राष्ट्रीयत्वाची ओळख होणार आहे. हेंच ध्येय दृष्टी समोर ठेवून " दि इस्लामिक लिटररी ॲसोसिएशन " नें आज आपल्या कार्यास प्रारंभ केला आहे. या कामीं सर्व राष्ट्रीय वृत्तिच्या बांधवांकडून मार्गदर्शनपर उत्तेजन मिळेल, असा आह्मास भरंवसा वाटतो.

" दि इस्लामिक लिटररी ॲसोसिएशन " तर्फे:—

**एस्. अब्दुल गफ्फार मोहम्मद साहेब:—**

**फौजदारलेन सांगली** ता. ११-३-१९४४

माझी मातृभाषा उर्दू आहे. मराठी भाषेंत चरित्र लिहीण्याचा माझा हा पहिलाच प्रयत्न असल्यामुळें चरित्रांत भाषेच्या दृष्टीनें कांहीं चुका होणें संभवनीय आहेत. परंतु उदार वाचक हा माझा पहिलाच प्रयत्न आनंदानें गोड करून घेतील अशी माझी खात्री आहे. शेवटीं पुढील एडिशन याहि पेक्षां सुधारून काढण्यांत येईल, असें अश्वासन देवून, माझ्या सर्व हितचिंतकांचे अंतःकरणपूर्वक आभार मानून, मी हे अल्पसे निवेदन आटोपतें घेतो.

११–३–४४. एस्. अब्दुल गफ्फार मोहंम्मद साहेब.

# चरित्रास आधारभूत झालेल्या

## ग्रंथांची यादी.

---

मराठी

(१) अधुनिक भारत:—

(२) कॉंग्रेसचा इतिहास

इंग्लिश

(३) ग्रेटमेन ऑफ इंडिया

(४) लीडर्स इन इंडिया

उर्दू

(५) चार वडे आदमी

(६) वतनके लीडर

(७) मुस्लिम लीग

(८) कायदे आजम जिन्हा

(९) पाकिस्तान

" दि डेक्कन टाइम्स " चा खास अंक १९४०

" वतन " चा खास अंक १९४१

—७८६—

# प्रस्तावना.

ही अल्पशी प्रस्तावना जनाब अब्दुल गफ्फार साहेब यानीं आग्रह पूर्वक विनंती केल्या वरून लिहीत आहे. परमेश्वरानें मानव जात अशीच निर्माण केली आहे कीं, तिला प्रत्येक बाबतीत आदर्श असा गुरु, नेता, मार्गदर्शक वा पुढारी याची अवश्यकता असतेच, आणि जसजसे मार्गदर्शक निर्माण होत असतात, मानव जातींत खरीखुरी सुधारणा घडली जाऊन, ती उन्नतीच्या शिखरांवर पोहोंचली जाते. प्रत्येक मनुष्याला बालपणापासून वृद्धावस्थे पर्यंत अनेक गोष्टी आत्मसात करून घ्यावयाच्या असतात. परंतु कोणालाहि हे छाती ठोकपणें सांगता येणार नाहीं कीं, या जगांत जें कांहीं साध्य करून घ्यावयाचें आहे, तें मनुष्यानें पूर्णपणें साध्य करून घेतले आहे. तथापि ज्यानां जें अधिक साध्य झालेले असतें, त्यानांच आम्ही मार्गदर्शक, पुढारी अगर नेते मानून, त्या आदर्श व सच्छिल अशा पुढाऱ्याच्या आज्ञेबरहुकूम वागतो. मानवांचा निर्माणकर्ता परमेश्वर असल्यामुळें तो त्यानां कधींहि नेत्या शिवाय ठेवं इच्छित नाहीं जेव्हां जेव्हां नेत्यांची अवश्यकता

असनें तेव्हां तेव्हां वेळा काळा नुसार नेते निर्माण करून परमेश्वर मानवांचा उद्धार करीत असतो. ही गोष्ट जगाच्या आजवरच्या इतिहासावरून सिद्ध होते. ईश्वर इच्छेनुरूप जे नेते बनतात त्यांची आवड, प्रेम नि आदर हें मानवांच्या मनांत तोच उत्पन्न करीत असतो. या मुळेंच बहुजन समाज त्यांच्या हांकेला ओ देउन नि त्यांच्या आज्ञेत वागून, आपले कल्याण करून घेत असतो.

"स्वातंत्र्य हा मानव जातीचा जन्मसिद्ध हक्क आहे." याची जाणीव जेव्हां आमच्या कांहीं हिंदभूच्या सुपुत्रानां झाली; तेव्हां त्यानीं आपल्या मातृभूमीला पारतंत्र्याच्या दास्य शृंखलेतून सोडविण्यां करितां कॉंग्रेस या नांवानें अखिल हिंदी लोकांची एक राष्ट्रीय सभा स्थापन केली. ज्या सदस्यानीं या राष्ट्रीय सभेला जन्म दिला नि तिला नांवारुपास आणली, त्या सदस्यां पैकीं कांहीं ठळक व्यक्ति, दादाभाईनौरोजी, न्या. रानडे, न्या. तय्यबजी, लो. टिळक ना. गोखले, व दे. लाला लजपतरॉय वगैरे होत. या स्वातंत्र्यप्रिय पुढाऱ्यांवर प्रथम पासूनच सरकारची करडी नजर असल्यानें, साम्राज्यवादी मुत्सद्यानीं आपलें आसन स्थिर करण्या करितां राष्ट्रसभेंतील कांहीं पुढाऱ्यानां निरनिराळीं आमिषें दाखवून, व बड्या बड्या हुद्याच्या जागा देऊं करून त्यानां आपल्या गोटांत ओढलें. अर्थात या पुढाऱ्यांची तोंडें आपोआप बंद पडलीं व ते पूर्णपणें सरकारचे बगलबच्चे बनले.

परंतु कांही निस्वार्थपुढाऱ्यानीं मात्र आपणांस काँग्रेसच्या ध्येयास वाहून घेऊन, कसल्याहि आमिषांस बळीं न पडतां, तिची योग्य प्रकारें जोपासना केली व तिला खऱ्या नांवारुपास आणली. अर्थात जसजशीं काँग्रेस प्रबल होत गेली तसतसे सरकारवरहि तिचा परिणाम होऊं लागला. काँग्रेस ही जो पर्यंत हिंदवासीयांच्या सर्व लहान थोर समाजांची प्रातिनिधिक संस्था होती नि सर्व समाजांचें हित, तेंच काँग्रेसचे हित, हें जो पर्यंत तिचे एकमेव तत्व होते तो पर्यंत काँग्रेसची एकमुखी मागणी सरकारालाहि मानणे भाग पडत जाऊन, लोकशाहीस धरून वेळोवेळीं हिंदुस्तानला ज्या सुधारणा बहाल करण्यांत आल्या त्याचें सर्व श्रेय काँग्रेसला मिळत गेले. परंतु काँग्रेसचे नेतृत्व जेव्हां म. गांधींच्या हातीं आलें, तेव्हां पासून काँग्रेसमध्यें जात्यंध पुढाऱ्यांचा मोठ्या प्रमाणांत शिरकाव होऊं लागला. यामुळें हळूहळू काँग्रेसला आपल्या मूळ ध्येय पासून परावृत्त व्हावें लागून, तिला एका विशिष्ट ध्येयाचा आखाडा बनविण्यांत आला. ही गोष्ट नेहरू रिपोर्ट व मलकाना शुद्धिकार्य इत्यादि गोष्टीवरून सिद्ध होते. शिवाय हिंदी मुसलमानांना हिंदूंचे गुलाम बनवून हिंदुस्थानांत हिंदु राज्य वा रामराज्य स्थापन करणेचाहि त्यांनीं घाट घातला.

या गुप्त खलबताची जेव्हां काँग्रेसभक्त मुस्लिम पुढाऱ्यांना जाणीव झाली. तेव्हां त्यांनीं ही गोष्ट म. गांधींच्या कानावर घातली. परंतु त्यांनीं जाणूनबुजून ' नरोवा कुंजरोवा'

चा बहाणा करून कानांवर हात ठेवले. अर्थात या चळवळीला आंतून उत्तेजनच मिळालें. यामुळें काँग्रेसच्या तत्वाशीं समरस झालेल्या मुसलमानांना अनुभवांतीं पूर्णपणें कळून चूकलें कीं उत्तरोत्तर काँग्रेस आपल्या महान तत्त्वापासून बाजूस सरत आहे; ह्मणून मुस्लिम जनतेच्या सर्वांगीण उन्नतीप्रित्यर्थ व त्यांच्या अबाधित न्याय्य हक्कांचें संरक्षण करण्याकरितां आपणांस मुस्लिम लीगमध्येंच प्रवेश करणें योग्य होईल. अर्थात सर्वपक्षीय मुस्लिम पुढाऱ्यांनीं मु. लीगमध्यें प्रवेश मिळवून तिला सर्व हिंदी मुस्लिमांची एकमेव प्रातिनिधिक संस्था बनविली. काँग्रेसच्या पक्षपाती राजकारणास कंटाळून जे पुढारी मु. लीगला मिळाले त्यांपैकीं मौ. मोहम्मद अली, मौ. शौकत अली, डॉ. इक्बाल व कायदे आजम मोहम्मद अली जिन्हा यांचा प्रामुख्यानें नामानिर्देश करण्यांत येईल. निःसत्व, निष्क्रिय, स्वाभिमानशून्य असें हजारों वर्षें गुलामीचें जीवन जगण्यापेक्षां, आपल्या देशाकरितां व आपल्या देशबांधवांच्या न्याय्य हक्काकरितां लढतां लढतां क्षणार्धांत नाहींसें व्हावें, हीच उपरिनिर्दिष्ट देशभक्तांची अंतिम इच्छा होती. कायदे आजम जिन्हा यांनीं प्रथम लीगच्या घटनेंत बदल घडवून आणून तिची संपूर्ण राष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठापना केली. शिवाय जिन्हांनीं काँग्रेस, होमरूल लीग व नॅशनॅलिस्टपार्टी वगैरे राजकीय संस्थांचा पूर्णपणें अनुभव घेतलेला असल्यामुळें, त्यानीं मु. लीगच्या कार्यांत अनपेक्षित जोम, धडाडी नि निश्चय उत्पन्न केला

व लीगला अखिल हिंदी मुसलमानांची एकमेव राजकीय संस्था बनवून, तिला नांवारूपास आणली. अशा लौकिकवान मार्गदर्शकाच्या चरित्राची जाणीव प्रत्येक हिंदी मुसलमानास असणें अत्यावश्यक नाहीं काय?

प्रचलित राजकारणांत कायदे आजम जिन्हा सारखा बुद्धिमान, कर्तव्यतत्पर स्वार्थ निरपेक्ष, निर्भिड, निस्पृह व निधड्या छातीचा इत्यादि अनेक गुणांनीं संपन्न असा राष्ट्रीय पुढारी जर वेळेवर मुस्लिम जनतेला लाभला नसता, तर हिंदी मुसलमानांचे अपरिमित असे नुकसान झालें असते. परंतु ही केवळ ईशकृपा म्हणुनच कायदे आजम जिन्हा सारख्या सकलगुण संपन्न राष्ट्रनेत्याची त्या जगन्नियंत्यानें निवड केली आहे.

सांप्रत हिंदी राजकारणांत कायदे आजम जिन्हानां एक आदर्शस्थान प्राप्त झाले आहे. ते एक असामान्य राष्ट्रीय वृत्तीचें पुढारी असून, हिंदी स्वातंत्र्याकारितां त्यांनीं महत्वाच्या अशा कामगिऱ्या मोठ्या कौशल्यानें यशस्वी करून दाखवल्या आहेत. राजकारणांतील एक कसलेले व अनुभविक राष्ट्रपुरुष म्हणून हिंदी स्वातंत्र्याच्या कोणत्याहि महत्वाच्या मुद्यावर त्यांचे प्रथम मत घेण्यांत येते. म्हणून ज्यानां राष्ट्रकार्याची आवड आहे, ज्यानां हिंदी जनतेच्या आशा आकांक्षा बरोबर त्यांच्या न्याय हक्कांची पूर्ण जाणीव आहे, अशा

नवयुवकानां जिन्हांचे जीवन चरित्र अत्यंत बोधप्रद नि तितकेचे मार्गदर्शक होईल यांत शंका नाहीं.

इस्लामेतर बांधव आपल्या लहान मोठ्या पुढाऱ्यांची चरित्रें लिहून व त्यांचे वाढदिवस साजरे करून, हर एक प्रकारें त्यांचा गौरव करीत असतात. परंतु सद्यःस्थितींत आम्हा मुस्लिम समाजांत ही प्रथा फारच क्वचित आढळते. तथापि जनाब अब्दुल गफ्फार साहेब यांनीं आपल्या विद्यार्थी दशेंतहि कायदे आजम जिन्हा यांचे मराठी भाषेंत चरित्र लिहून त्यांचा गौरव केला आहे. ही गोष्ट आम्हा महाराष्ट्रीय मुस्लिमानां अत्यंत अभिमानास्पद व भूषणावह अशीच आहे. लेखकाचा हा पहिलाच लेखन व्यवसाय असूनहि त्यानीं एकंदरीत चरित्र अत्यंत रसभरींत, उद्बोधक नि परिणाम-कारक लिहिलें आहे. चरित्र लेखकांस हरप्रकारें उत्तेजन देणें हें महाराष्ट्रीय मुस्लिम समाजाचें पवित्रतम कर्तव्य आहे. लेखकानें मला ही प्रस्तावना लिहिण्याची सुसंधी दिली त्या बद्दल मी त्यांचे आभार मानून, व त्यांच्या कार्यांत सर्व प्रकारें यश चिंतून ही अल्पशी प्रस्तावना पूर्ण करितों.

वेंगुर्लें
ता. ४–३–१९४४

एम्. वाय्. हकीम.

# अनुक्रमाणिका.


| | पृष्ठ |
|---|---|
| मुस्लिम लीगका तराना | |
| जन्मभूमी | ११ |
| शिक्षण व कार्याचा ध्यास | १७ |
| बॅरिस्टरचीी प्रॅक्टिस व सार्वजनिक कार्यास प्रारंभ | २७ |
| काँग्रेसमध्यें प्रवेश | ३१ |
| सुप्रीम लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमधील कामगिरी | ३४ |
| विलायतेस प्रयाण | ३७ |
| मुस्लिम लीगमध्यें प्रवेश | ४१ |
| मुस्लिमलीग व मुस्लिमांचे उज्ज्वल भवितव्य | ४८ |
| होमरूल लीगची चळवळ | ५९ |
| मानपत्र व पीपल्स जिन्हा-हॉल | ६५ |
| राजकारण व समाजकारण | ७७ |
| ऐक्याचे अपूर्व दृश्य व शुद्धिसंघटन | ८३ |
| ऑलपार्टीज कॉन्फरन्स | ९१ |
| सायमनकमिशन व नेहरू रिपोर्ट | ९७ |
| नमुनेदार मार्गदर्शक | १०५ |

पृष्ठ


| | |
|---|---|
| गोलमेज़ कॉन्फरन्स | ११३ |
| पाकिस्तान-घोषणा | ११७ |
| स्वार्थ निरपेक्ष पुढारी | १२७ |
| असामान्य व्यक्तिमत्व | १३३ |
| पाकिस्तान अधिवेशन | १४३ |
| मोठ्यांच्या चष्यांतून | १५२ |
| शुद्धि-पत्र | १५३ |

# " मुस्लिम लीग का तराना "

" सदरहू गीत पाटणा एथील ऑल इंडिया मुस्लिम लीगच्या अधिवेशनांत एक लाख लोक-समुहासह कायदे आजम जिन्हांनींहि मोठ्या उत्सुकतेनें ह्मटलें आहे."

वहेदतका तराना शौकसे गा, कसरतसे न डर, तेरा है खुदा,
तंजीमका खत नुक्तेसे मिला, मरकजसे सरक कर दूर न जा,
मुस्लिम है तो मुस्लिम लीगमें आ,

बोल आपना जहामें बालाकर, तौहीदका नाम उझाला कर,
मे नूरके शीसेमें ढालाकर, घर दीनका हक्से उजाला कर,
मुस्लिम है तो मुस्लिम लीगमें आ,

इस्लामका झंडा लहेराकर, ईनामका जजबा पैदाकर,
बुतखानेकी राह न देखा कर, काबेकी तरफ मुंह आपनाकर,
मुस्लिम है तो मुस्लिम लीगमें आ,

जुल्मतनें जो कुफ्रकी आहे घेरा, एक शमाअ जलाके लगा फेरा,

मंजीलपे पहुंचके जमा डेरा, महेफिल हो तेरी साकी तेरा,

मुस्लिम है तो मुस्लिम लीगमें आ,

बातिलपे आडे हैं कॉंग्रेसी, करते नहीं हककी दाद रसी,

कुच्छ औरही उनके जीमें बसी, हां छोडके उनकी हम नफसी,

मुस्लिम है तो मुस्लिम लीगमें आ,

है जाल बिछाना काम उनका, दाना है तो देखले दाम उनका,

कहेनेको स्वराजी नाम उनका, है हिंदुराज निजाम उनका,

मुस्लिम है तो मुस्लिम लीगमें आ,

यं ६८
१८/२७१

जिन्हांचे वडील कराची शहराचे मोठे वजनदार व्यापारी असून, त्यांची गणना मोठमोठ्या व्यापारी व श्रीमंत लोकांत होत असे. मोहम्मदअली जिन्हांच्या मातोश्री सकीना बेगम ह्याहि आपल्या पतिप्रमाणेंच उच्च खानदानींतल्या, सुविद्य, धर्मपरायण व परोपकारी साध्वि होत्या. आज आम्हां हिंदी मसलमानांचे भाग्य थोर म्हणूनच ईश्वरी संकेतानुसार या सुशिक्षित व उच्च विचारसरणींच्या भाग्यशाली मातापितरांच्या पोटीं मोहम्मद अली जिन्हा सारख्या एका नामवंत राष्ट्रसेवकाचा जन्म झाला.

ज्या श्रीमंत घराण्यांत एकुलतें एक मूल जन्माला येतें, त्या घराण्यांतील वातावरण आनंदानें अगदीं धुंद होऊन गेलेलें असतें व त्या बालकाच्या जन्म दिवसानिमित्त मोठमोठें समारंभ साजरे करण्यांत येऊन, आपला श्रीमंती थाटाचा आनंद व्यक्त करण्यांत येतो. ही सर्व साधारण श्रीमंत लोकांतील प्रथाच आहे. पुढें जस जसें हें मूल मोठें होत जातें तस तसें पालका कडून त्याला मोठ्या लडिवाळपणानें वाढविण्यांत येऊन. त्या चिमुकल्या बालकाच्या हरएक प्रकारच्या हट्टाला व बाललिलांना उत्तेजन देण्यांत येतें. वास्तविक पाहतां पालकांच्या या फाजील लडिवाळपणामुळें व त्यांच्या अज्ञानरूपी अमूर्त प्रेमामुळें त्या बालकाच्या

कोंवळ्या हृदयावर निरनिराळ्या वाईट संवयींचा चांगलाच शिक्कामोर्तब होत असतो व त्यामुळें तीं बिघडण्याचा फारच संभव असतो; बाल हृदयावर उमटणारें हें वाईट संस्कार चिरंतर नि कायम टिकणारें असल्यामुळें, अशा कित्येक बालकांचें भावी जीवन निसत्व नि निर्माल्यवत् बनविण्यांत ह्या पालकांना कोणतें भूषण मिळत असेल हें कांहीं सांगतां येत नाहीं.

आमचें चरित्र नायक कायदे आजम मोहम्मद अली जिन्हा हे हीं एका सुसंपन्न व श्रीमंत अशा मातापित्यांच्या उदरीं जन्मास आले. त्यांच्या माता-पित्याकडून बालपणीं त्यांचेहि फारच कोडकौतुक करून लाड पुरविण्यांत आले. बालपणीं एकुलतें एक बालक या नात्यानें बाल जिन्हांना विशेष सवलती मिळत असल्यामुळें, त्यांचें बालपण एकंदरींत फारच सुखांत गेलेलें आहे. उपरिनिर्दिष्ट विवेचना वरून निष्कर्ष काढिला असतां, अशा प्रसगीं मुलाच्या कोमल अंतःकरणावर वाईट गोष्टींचा पगडा बसून, पुढें तीं बिघडण्याचा अधिक संभव असतो. तथापि " शुद्ध बीजा पोटीं फळें रसाळ गोमटीं " या संत उक्तीप्रमाणें वरील विवेचनांस जिन्हांचें बालपण सर्वस्वी अपवादात्मक ठरलेलें दिसून येईल.

"अमीरे सियासत"

# कायदे आजम मोहम्मद अली जिन्हा.

## जन्म-भूमि.

मुंबई बंदराशिवाय महत्वाचीं अशीं हिंदुस्थानांत जीं कांहीं बंदरें आहेत, त्यांत कराची बंदराची गणना मोठ्या प्रामुख्यानें केली जातें. कांहीं वर्षांपूर्वी तर मुंबई बंदरापेक्षांहि कराची बंदराला मोठें महत्व प्राप्त झालें होते. आणि हेंच एक असें महत्वाचें बंदर आहे कीं, ज्यामुळें युरोपचा प्रवास फारच सुखावह, सुलभ व कमी वेळाचा होऊं शकतो. ब्रिटनहून येणाऱ्या जाणाऱ्या जहाजांचीहि बहुतेक याच बंदरातून वहातूक होत असल्यामुळें दरवर्षी लाखो रुपयांचा व्यापारी माल या बंदरांतूनच आयात निर्यात होत असतो. या गुणवैशिष्ठ्यामुळें आज कराची बंदर हें एक हिंदुस्थानांतील प्रमुख व्यापारी केंद्र होऊन बसलें असून, एथील व्यापारी पेठ

निरनिराळ्या धर्मीय व्यापारी लोकांनीं बाराहि महिने नेहमीं गजबजलेल्या असतात. म्हणूनच येथें वैभवशाली इमारती, मोठमोठीं सेवासदनें, व प्रासादे नि् लौकिकवान श्रीमंत व्यापारी लोक स्थाईक झालेले दिसून येतात.

येथील लोकांचा मुख्य पेशा जरी व्यापारी असला; तरी त्यांनीं इतर बाबतींत आपल्यांत कौतुकास्पद प्रगति करून घेतली आहे. यावरून आचार विचारांनीं ते मोठें सुशील, सुशिक्षित, व सुधारणावादी असल्याचें दृष्टोत्पत्तीस येते .

मुस्लिम हिंदुस्थानांतील मुसलमानांचेच नव्हे तर सर्व अल्पसंख्यांकांचे एकमेव पुढारी म्हणून ज्यांचे नांव दुमदुमत आहे, असें आमचे " कायदे आजम मोहम्मदअली जिन्हा प्रेसिडेंट ऑल इंडिया मुस्लिम लीग " यांची पवित्र जन्मभूमि म्हणून मान पटकावण्याचे भाग्यहि कराची बंदरालाच प्राप्त झालें आहे. आणि ही गोष्ट कराची बंदरला मोठ्या भूषणास्पदच नव्हे तर गौरवास्पदहि आहे असेंच सर्वांना म्हटलें पाहिजे.

कायदे आझम मोहम्मद अली जिन्हा यांचा जन्म शनिवार तारीख २९ डिसेंबर १८७६ सालीं हिंदुस्थानचे प्रमुख व्यापारी केंद्र; कराची शहरांत झाला. कायदे आझम

बालपणीं जिन्हांना हरएक प्रकारचें स्वातंत्र्य उपभोगण्यांस मिळत होतें. तरी त्यांच्याकडून कोणत्याही गोष्टींचा दुरुपयोग करण्यांत येत नव्हता. बालपणीं त्यांच्या आंगीं दिसून येणाऱ्या गुणांपैकीं सौजन्य, आज्ञाधारकपणा व चौकसबुद्धि या त्रयींना प्राधान्य देणें योग्य होईल. या गुणामुळेंच ते कित्येकांची अंःतकरणें क्षणार्धांत आपल्याकडे आकर्षून घेत. बालपणीं मोहम्मद अली जिन्हांची मूर्ती मोठी सुरेख व सतेज तर होतीच; शिवाय बालपणींच त्यांच्या चेहऱ्यावर विलसत असलेली समंजसपणाची, कुशाग्रबुद्धीची झांक मूर्तिमंत त्यांच्या उज्वल भविष्यकाळाची साक्ष दर्शवीत असें यांत बिलकूल शंका नाहीं. त्यांच्या बाल्यावस्थेच्या प्रत्येक वागणुकींत व कृतींत दिसून येणारीं हुषारी व समयसूचकता पाहून; त्यांचे आईबापच नव्हे तर त्यांचे कित्येक शेजारीं पाजारीं त्यांचे प्रेमानें कोड कौतुक करीत असत. बालपणीं मोहम्मद अली जिन्हांना इस्लामी संस्कृतीनें नटलेल्या व वीरश्रीनें ओथंबलेल्या गोष्टी ऐकण्याचा विलक्षण नाद असल्यामुळें अशा गोष्टी सांगण्याकरितां त्यांचा आपल्या मातोश्रीकडे सारखा लकडा लागलेला असे.

बाल मोहम्मद अली जिन्हानां योग्य वळण लागावे, या करितां त्यांच्या पालकांनीं विशेष काळजी घेतली असली,

तरी ते जात्याच कुशाग्रबुद्धीचे असल्यामुळें कोणत्याहि वाईट संवयींच्या आहारी गेले नाहींत यांतच त्यांच्या मोठेपणाचें गूढ संकलित झालेलें होते. हें आज आपणांस पहावयास मिळतें कारण ईश्वरी संकेतच मुळीं असा होता कीं, हा पांच वर्षांचा चिमुकला बालक भविष्यकालीं, आपल्या जळजळींत राष्ट्रीयत्वाच्या दिव्य तेजानें प्रकाशमान होऊन,अल्पावधींतच-सर्व हिंदुस्थानचेंच नव्हे तर पाश्चिमात्य राष्ट्रांचेहि लक्ष आपणांकडे वेधावयास लावून परतंत्र मातृभूमीच्या स्वातंत्र्या-करितां आपलें सर्वस्व अर्पण करून, हिंदी जनतेचा एक प्रमुख नेता म्हणून गाजला जाईल.

ही भविष्यवाणी खरी होणार होतीं, म्हणूनच कीं काय लहानपणीं मोहम्मद अली जिन्हा मोठें सुशील सद्गुणी चिकित्सक विचाराचे नि करड्या स्वभावाचे बनले. या आदरणीय गुण वैशिष्ठ्यामुळें त्यांच्यावर सर्व लोक बेहद्द खूष असत. पालकांच्या कृपा छत्राखालीं लाडांत व श्रीमंती वातावरणांत सर्व बालपण गेलें असताहि, वरीलप्रमाणें परस्पर विरोधक गुण त्यांच्यांत सामावलेले दिसून येतात म्हणून अशा चरित्र नायकाचें जीवन चरित्रहि तितकेंच आकर्षक उद्बोधक नि मार्गदर्शक असणार यांत कांहीं शंका नाहीं.

# शिक्षण व कार्याचा ध्यास.

मोहम्मद अली जिन्हांचें सर्व शिक्षण बहुतेक निरनिराळ्या ठिकाणीं झालेलें आहे. लहान वयांतच त्यांना मुंबईस 'गोकुळदास तेजपाल प्रायमरीस्कूलमध्यें' पाठविण्यांत आलें होतें, प्रथम पासूनच त्यांना शिक्षणाविषयीं विलक्षण अभिरूचि लागलेली असल्यामुळें व ते जात्याच बुद्धीनें तरतरीत असल्यामुळें थोड्याच मुदतींत त्यांनीं तेथील सर्व शिक्षण पूर्ण केलें. तदनंतर त्यांना सिंध हायस्कूल कराची मध्यें दाखल करण्यांत आले. तेथेंहि थोड्याच मुदतीपर्यंत ठेवून त्याना मिशन-हायस्कूल कराचींमध्यें दाखल करण्यांत आले. मिशन हायस्कूल कराचीमध्यें त्यांनीं अल्पावधींतच आपल्या असाधारण बुद्धि-मत्तेनें व कौतुकास्पद स्मरण शक्तीनें 'एक नमुनेदार विद्यार्थी' ह्मणून आपल्या सर्व शिक्षक वर्गांकडून शाबासकी मिळविली. शिक्षकांच्या आज्ञेबरहुकूम वागणें व वेळच्यावेळीं नेमून दिलेला अभ्यास मन लावून करणें यामुळें सर्व शिक्षकांचें त्यांचेवर निर-तिशय प्रेम होते.

पुढें येथील सर्व शिक्षण पूर्ण होत असतांच त्यांच्या महत्वाकांक्षी मनानें विलायतेला जाऊन उच्च शिक्षण संपादन करण्याचें व कायद्याची परीक्षा देऊन एक उत्तम

प्रकारचे नावाजलेले कायदे पंडित होऊन यायचें योजिलें. ही योजना त्यांनीं आपल्या वडीलांच्या कानावर घातली. जिन्हांच्या वडिलांनाहि त्यांच्या बौद्धिक सामर्थ्यावर व विद्यार्जनाच्या उत्कट महत्वाकांक्षेवर पूर्ण विश्वास होताच. त्यांनीं बाल जिन्हांच्या पुढील शिक्षणाची तरतूद आपल्या मनामध्यें तत्पूर्वीच करून ठेवलेली होती. परंतु जिन्हांना तसें बोलून दाखविलें नव्हतें. जिन्हांनीं आपण होऊनच उच्च शिक्षणाची अपेक्षा त्यांच्या जवळ दर्शवितांच त्या भाग्यवान पित्यास आनंदातिशयानें वेडे होणेची पाळी आली.

प्रथम पासूनच त्यांच्या वडिलांना असें वाटत होतें कीं, "आपल्या मुलानें उच्च शिक्षणाच्या प्रेरणेनें जगांत पुढें येऊन पारतंत्र्याच्या शृंखलेनें जखडलेल्या आपल्या मातृभूमीस मुक्त करावें व गुलामीच्या संपर्कानें अठरा विश्वें दारिद्याच्या नरक कुंडांत खितपत पडलेल्या आपल्या देशबांधवांचा उद्धार करावा."

त्यांनीं मोठ्या आनंदानें जिन्हांना विद्यार्जनाकरितां विलायतेस जाण्यास संमति दिली. व आपले मनोरथहि बोलून दाखविलें अर्थात आनंदाच्या वातावरणांत कायद्याच्या शिक्षणाकरितांच नव्हे तर आपल्या ध्येय पूर्ततेसाठीं ह्मणून जिन्हांना विलायतेस रवाना व्हावें लागलें.

## विलायतेस प्रयाण.

सन१८९२मध्यें जिन्हांनीं आपला हिंदुस्थानांतील सर्व शिक्षणक्रम पूर्ण करून विलायतेस प्रयाण केलें. त्यावेळीं ते अवघ्या १६ वर्षांचे होते. एक १६ वर्षाचा तरुण व तो एक उत्कृष्ट बॅरिस्टर होण्याच्या महत्वाकांक्षेनें प्रेरित होऊन आज विलायतेस प्रयाण करीत आहे हें एक आपल्या राष्ट्राचें सुभाग्यच म्हटलें पाहिजे.

इंग्लंडमध्यें पोहोंचतांच मोहम्मद अली जिन्हांनीं कायद्याच्या शिक्षणाकरितां आपलें नांव 'लिंकन इन्' सारख्या एका प्रख्यात विश्वविद्यालयांत दाखल केलें. आणि आपला कायद्याचा अभ्यास मोठ्या दक्षतेनें व काळजीपूर्वक सुरूं केला. प्रत्येक विषयांचें चांगल्या तऱ्हेनें मनन करून घेऊन, तो आत्मसात करून घेण्याची कला लहानपणापासूनच त्यांना चांगल्या तऱ्हेनें अवगत असल्यामुळें, थोड्याच मुदतींत त्यांनीं आपल्या अभ्यासक्रमांत अगदीं उच्चांक गांठला आणि जसजसें त्यांच्या ज्ञानार्जनाच्या प्रगतीचें क्षेत्र विस्तृत होऊं लागलें, तसतसें त्यांनीं आपल्या अभ्यासक्रमांत यत्किंचिताहि उणीव भासूं दिली नाहीं.

सर्व चैनीच्या व सुख लोलुपतेच्या वस्तूंचे आगर जे इग्लंड शहर अशा ठिकाणीं मोहम्मद अली जिन्हांचे चार वर्षे वास्तव्य असतांही सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांचे लक्ष चैनीकडे व अतिरिक्त सुखांचा अस्वाद घेण्याकडे कधीही गेलें नाहीं; हें त्यांच्या संयमी नि आदर्श वागणुकीचें एक आचरणीय उदाहरण हिंदी ( जनतेला ) विद्यार्थ्यांना बोधप्रद होईल असें मला वाटते वेळेचा अपव्यय न होण्याकरितां नियमीत पणाच्या बाबतींत ते इतक्या दक्षतेनें व काटेकोर पणानें वागत कीं,ज्यामुळें त्यांच्यावर युरोपियन प्राध्यापक वर्ग व त्यांचें वर्ग बंधूही नेहमीं स्तूती सुमनांचा वर्षाव करीत मि.जिन्हानीं इंग्लंडला पोहोंचतांच प्रथम जर कोणतें कार्य केलें असेल तर तें शिक्षणाबरोबर ब्रिटीशांच्या स्वभाव निरीक्षणाचें होय. आणि तेव्हां पासून युरोपियनांच्या स्वभाव वैशिष्ठ्या विषयीं त्यांच्या मनांत कांहींशीं अढी उत्पन्न झालेली होती. युरोपियन मित्र-मंडळीकडून त्यांच्यावर नेहमी स्तुति सुमनांचा वर्षाव होत असतांहि ते त्यास कधींहीं भाळून गेले नाहींत.तर ब्रिटिशांच्या कडून आपल्या पोझिशनवर व स्वाभिमानावर कोणत्याहि प्रकारचा कमीपणा न येण्याकरितां ते त्यांच्याशी गोडी गुला-बीनें बोलत, परंतु शक्य तितका त्यांचा सहवास टाळण्याचा प्रयत्न करीत.

तत्कालीन सुधारणावादी युरोपियनलोकांची मनोवृत्ति पाहिली तर इंडियन लोकांना ब्लॅक मॅन, ( काळा मनुष्य ) म्हणून संबोधून ते त्यांचा द्वेष करीत, व त्यांचा संपर्क सुद्धां करून घेणें निषिद्ध मानीत, हीच इंग्लंड मधलि बेगडी स्वरुपाची सुधारणा त्यांना नको होती. हिंदी लोकांचा अपमान म्हणजे पर्यायानें आपल्या मात्रभूमीचा अपमान आहे असे त्यानां वाटत असे. आणि हें शल्य त्यांच्या अंतःकरणाला सारखे बोचत असलें तरी " सत्ते पुढें शहाणपण चालत नाहीं" हो साम्राज्यवादी उक्ति त्यानां माहीत असल्या मुळें, त्याला प्रत्युत्तर म्हणून काट्यानें काटा काढला पाहिजे,त्याशिवाय हिंदी लोकांना बरोबरीच्या दर्जाने वागविलें जाणार नाहीं हें तत्व त्यांना पूर्ण पटले,

या तत्वाचा प्रचार करण्या करितां म्हणून विद्यार्थ्यांच्या एका वार्षिक समारंभाच्या प्रसंगी शिक्षकांची परवानगी घेऊन "विश्वबंधुत्व" या विषयावर जिन्हानीं आपलें पहिलेंच वक्तृत्व-पूर्ण भाषण करून सांगितलें कीं नैसर्गिक दृष्ट्या मानव जात ही सर्व एक आहे. तेव्हां मानवानें मानवाला तुच्छता पूर्वक लेखून त्यानां हीन दर्जाचें मानणें म्हणजे आपल्या निर्बुद्ध मनोवृत्तीचें प्रदर्शन करणें होय.

सांप्रत इंग्लंड सारख्या पुढारलेल्या राष्ट्रांतहि गौर गौरेतरां सारखी प्रतिगामी स्वरूपाची भेदनीति दृष्टोत्पतीस येतें, ती मला वाटतें अत्यंत त्याज्य असमंजसपणाची व अज्ञानमूलक अशी आहे - तरी प्रत्येक सूज्ञ व विचारवंत मानवाचें कर्तव्य आहे कीं, त्यानें विश्वबंधुत्वाचे शाश्वत टिकणारें व आपलें इहलोकचें कर्तव्य पूर्णत्वास नेणारे असलेच आदर्श आपल्या दृष्टी समोर ठेवून. आपलें अंगिकृत कार्य करीत राहिलें पाहिजे.

इंग्लडमध्यें पहिल्या प्रथमच निर्भिडपणें भाषण करून जिन्हांनीं युरोपियनांवर आपल्या प्रखर बुद्धिमत्तेची अधिकच छाप पाडून व त्यांच्या सुधारणावादी बेगडी मनोवृत्तीवर प्रकाश पाडून तिला चांगल्याच प्रकारे शह दिला. ही गोष्ट मोठ्या अभिमानानें येथें नमूद करावीशी वाटते.

पहिल्या पासूनच जिन्हांच्या वाचनाच्या विलक्षण आवडीमुळें असें दिसून येतें कीं, त्यांनीं आपली दृष्टी फक्त शाळेतील अभ्यास क्रमापुरतीच ठेवलेली नव्हती. तर त्यांच्या आंखीव कार्यक्रमांतून व विशाल दृष्टी पंथांतून त्या काळच्या सार्वत्रिक राजकीय घडामोडीहि सुटत नसत. यावरून विद्यार्थी दशेतहि जिन्हांनीं स्वतःला विविधप्रकारच्या कार्यांत कसें गोवून घेतलें होते हें दिसून येतें.

## महर्षि दादाभाई नौरोजी.

याचवेळीं हिंदी स्वातंत्र्याचे जनक व हिंदुस्थानांतील राजकीय सामाजिक चळवळीचे आद्यपुरुष महर्षि डॉ. दादाभाई नौरोजी हें लंडन मधील इंडियन सोसायटीचे प्रेसिडेंट ह्मणून तेथें उपस्थित होते. डॉ. दादाभाई नौरोजी हें मोठें विद्वान, अनुभविक व राजकारण धुरंधर ह्मणून प्रसिद्ध आहेत. हें कांहीं हिंदी जनतेला सांगणे नकोच. हिंदी स्वातंत्र्याचें निशाण निर्भिडपणें फडकावणारे हेच पहिले स्वातंत्र्यवीर होत. ह्मणून त्यांचे विचार व आचार अगदीं उच्च व पुरोगामी पद्धतीचे असल्यास कांहींच नवल नाहीं.

पहिल्या भेटींतच जिन्हांच्या मनावर डॉ. महाशयांच्या उच्च विचार सरणींचा व जळजळीत देश भक्तीचा चांगलाच परिणाम घडून आला. या नंतर ज्या ज्या वेळीं जिन्हांची व म. दादाभाईंची मुलाखत झालेली आहे, त्या त्या वेळीं जिन्हांनीं त्यांच्या उच्च विचारसरणींचा योग्य तोच फायदा करून घेतला. म. दादाभाईंचा प्रत्येक अमौलिक शब्द ते सादर झेलीत व त्याला आपल्या अंतःकरणांत पुरेपूर बिंबवून ठेवित असत.

यापुढें दादाभाईचा परिचय जिन्हांशीं जसजसा वाढत गेला तसतसा त्यांच्या शिक्षणाच्या व्यवसायांत त्यांच्या देश-भक्तीची मंदपणानें तेवत राहिलेली ज्योत एकदम प्रज्वलित होऊं लागली. व त्यांना हिंदी स्वातंत्र्याविषयीं रात्रंदिवस ध्यास लागून राहिला. आणि त्यांनीं आपल्या मनामध्यें अशी खूण गांठ बांधून ठेविली कीं, आपणाला या पुढें दादा भाईच्या प्रत्येक विद्वत्ता प्रचुर मतप्रणालीनींशीं एकरूप होऊन आपले कार्य केले पाहिजे.

जिन्हा आजून आपल्या बॅरिस्टरच्या परिक्षेंत उत्तीर्ण होणाराहि होतें तोंच त्यांनीं आपल्या जळजळींत राष्ट्रभक्तिच्या प्रेरणेनें हिंदी जनतेच्या उन्नती प्रित्यर्थ स्वतःस वाहून घेतलें, ही गोष्ट प्रत्येक हिंदवासियांना भूषणास्पद वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

जसजशीं जिन्हांची हिंदुस्थानला परत येण्याची वेळ जवळ येऊं लागली तसतशीं त्यांची उत्सुकता द्विगुणित होऊं लागली व ते मोठ्या उत्सुकतेनें आपल्या मातृभूमीच्या दर्शनाची मार्गप्रतीक्षा करूं लागले. कारण त्यांना वाटत होतें कीं, केंव्हां एकदां आपण आपल्या पारतंत्र्यांत काळ कंठणाऱ्या दुर्दैवी मातृभूमीच्या व आपल्या दुर्बल अंतःकरणाच्या

हिंदवासियांच्या हांकेस ओ देऊन त्यांच्या साह्यार्थ मदतीस धावूं नि त्यांच्या गुलामीच्या निनादानें बद्ध झालेल्या कर्णेंद्रियांत मोठमोठ्यानें टाहो फोडून असें सांगू कीं," गुलामीच्या व दारिद्र्याच्या आठराविश्वे नरककुंडांत खितपत पडणाऱ्या माझ्या हिंदवासीय बांधवानों ! उठा स्वतःच्या स्वाभिमानीं व्यक्तित्वाच्या रक्षणाकरितां व हिंदभूमीच्या स्वातंत्र्याकरिता एक दिलानें प्रेरित होऊन न्यायमार्गानें खरा स्वातंत्र्याचा लढा उभारा ! व हिंदभूमीला पारतंत्र्यांतून मुक्त करण्यास संघटितपणें तयार व्हा ! तरच तुमची उज्वल भविष्यकालाची अपेक्षा फोल ठरणार नाहीं. या व अशा अनेक विचार तरंगांनीं जिन्हांचे अंतःकरण नेहमी भारावलेले असें. चार वर्षांच्या शेवटीं जिन्हांचा शिक्षण कोर्स पूर्ण होतांच ते बॅरिस्टरीच्या परिक्षेंत उच्च वर्गांत उत्तीर्ण झाले व १८९६ मध्यें म्हणजे वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी बॅरिस्टरीची पदवी घेऊन ते मोठ्या आनंदानें व उमेदीनें हिंदुस्थानांत येण्यास निघाले.

## परत हिंदुस्थानांत.

जिन्हांचा इंग्लंडमधील शिक्षणक्रम पूर्ण होण्या पूर्वीच त्यांच्या वडिलांच्या व्यापारी पेशास गतिमान कालानुसार कांहींशी उतरती अवकळा प्राप्त होऊन त्यांच्या घरांत चोहींकडे कांहींसें निराशेचे वातावरण निर्माण झालेलें होते. तथापि

त्यांच्या वडिलानीं स्वतःच्या बिघडलेल्या परिस्थितीकडे लक्ष न देतां आपल्या पितृधर्मास अनुसरून जिन्हांच्या शिक्षणांत कोणत्याच प्रकारचे व्यत्यय येऊं न देतां, त्यांना सढळ हातानें पैसा पुरवून, आपल्या परिस्थितीची यत्किंचितहि जाणीव होऊं दिली नाहीं. परंतु जिन्हा जेव्हां हिंदुस्थानांत येऊन पोहोंचले तेव्हां त्यांना आपल्या कौटुंबिक परिस्थितींत कांहीं निराळाच बदल झालेला दिसून आला.

पूर्वीचा तो अमीरी थाट नव्हता ! कीं, पूर्वीचें तें त्यांचें प्रासादतुल्य विश्रांति गृह राहिलें नव्हतें ! तर चोंहिकडे कारुण्याची मूर्तिमंत अवकळा पसरलेली दिसून येत होती. माता पित्यांचें तें कृत्रिम हास्य व केविलवाणें मुख पाहून तर त्यांच्या कोमल अंतःकरणांत भडभडून आलें. आणि जेव्हां या सर्व गोष्टींचा त्यांना नीट उलगडा झाला तेव्हां त्यांना वाटूं लागलें कीं, परदेशी उच्च शिक्षणाच्या प्रभावामुळें आपणच आपल्या वडिलांच्या खालावलेल्या आर्थिक परिस्थीतीला कांहीं अंशी कारणीभूत झालों आहोंत.

तथापि वेळ प्रसंग पाहून विचार करीत न बसतां त्यांनीं आपल्या माता पित्यांना धीराच्या चार गोष्टी सांगून, तात्पुरते का होईना त्यांना दुःखापासून परावृत्त केलें. पुढें माता पित्यांच्या सहवासांत कांहीं दिवस काढल्या नंतर बॅरिस्टरीच्या प्रॅक्टिसी करितां १८९७ मध्यें ते मुंबईस रवाना झाले.

# बॅरिस्टरीची प्रॅक्टिस व सार्वजनिक कार्यास प्रारंभ.

सरपर चढाओ फूल, जो चमनसे निकल गया ।
इज्जत मिली उसीको, जो वतनसे निकल गया ॥

ज्याप्रमाणें बागेचें स्थान सोडलेलें फूल मस्तकीं उच्चस्थानीं शोभतें तद्वत जन्मभूमी पासून दूरस्थळीं जाणारी व्यक्ती गौरवास पात्र होते.:---

प्रथम जिन्हांनीं कराचीचे प्रसिद्ध वकील कै. हरचंदरॉय विशनदास यांच्याकडे उमेदवारी करून तेथेंच वकीलीची प्रॅक्टिस करण्याचें योजिलें होते. परंतु कांहीं कारणास्तव त्यांची ही इच्छा पूर्ण न होतां, नाइलाजास्तव ह्मणून वरील उक्तीप्रमाणें त्यांना आपली मातृभूमि सोडून मुंबईस प्रयाण करावें लागलें. मुंबईमध्यें येऊन स्थायिक झाल्यानंतर प्रथम त्यांनीं कसोशीनें आपल्या धंद्याकडे लक्ष पुरविण्याचें ठरविलें. परंतु मुंबईसारख्या विख्यांत शहरांत त्यांचा विशेष परिचयाचा व मायेचा माणूस कोणीच नसल्यामुळें नुकतेच बॅरिस्टर होऊन आलेले एक १९ वर्षांचें उत्साही मुसलमान तरुण या नांवापलीकडे कोणतीहि लौकिक कमाई त्यांच्या कडून होऊं

शकली नव्हती. व उत्तरोत्तर त्यांची परिस्थिति अत्यंत खालावत चालली होती. तरीहि त्यांनीं आपली चिकाटी व धैर्य खचूं न देतां; आपल्या आत्मिक बलाच्या सामर्थ्यावर प्राप्त स्थितीशीं तीन वर्षेपर्यंत झगडत राहिले.

यानंतर चौथ्या वर्षाच्या आरंभी त्यांच्या वडिलांच्या एका वजनदार मित्राच्या साहाय्यानें बॅरिस्टर जिन्हांची व त्यावेळचे मुंबईचे अॅडव्होकेट जनरल मि. मॅकफर्सन यांची भेट झाली. मि. मॅकफर्सन हे एक सोशल मताचे उदार अंत:करणाचें व गुणी लोकांच्या कर्तृत्वाचें चीज करणारे असें एक सुप्रसिद्ध समाजवादी युरोपिन सद्गृहस्थ होते.बॅ.जिन्हांचे विनयशील परंतु अस्खलित वक्तृत्व, निर्भिड पण मोकळेपणाची वागणूक पाहून मि. मॅकफर्सन यांच्या मनावर फारच चांगल्या तऱ्हेचा परिणाम झाला.

त्यांनीं मोठ्या आनंदानें जिन्हांना आपल्या चेंबरमध्यें काम करण्याची परवानगी दिली. अद्याप पर्यंत सदर चेंबर मध्यें कोणाहि हिंदी इसमाला घेण्यांत आलेलें नव्हते. फक्त बॅ. जिन्हांच्या कर्तृत्व शक्तीमुळेंच त्यांना चेंबरमध्यें प्रवेश मिळ-वितां आला हें विशेष होय. यामुळें बॅ. जिन्हांचा उत्साह द्विगुणित होऊन ते मोठ्या उमेदीनें आपलें कार्य तडीस नेऊं

लागलें. अशा रीतीनें जिन्हांची सांपत्तिक स्थिति पूर्ववत सुधारली जाऊन, त्यांच्या वकीलीच्या धंद्यांतहि चोहींकडून त्यांना मान्यता मिळूं लागली.

बॅ. जिन्हांची कौटुंबिक परिस्थिती पूर्ववत होतांच त्या भाग्यशाली माता पित्यास जिन्हांच्या कार्यक्षमतेबद्दल किती अपूर्व आनंद झाला असेल, तो लिहूनव्यक्त करतां येत नाहीं. येथूनच जिन्हांच्या लोकोत्तर कारकीर्दीस आरंभ होऊन त्यांच्या व्यक्तित्वाची व वकिलीची प्रसिद्धी सर्वामुखी होऊं लागली. बॅ. जिन्हांची हुशारी व बुद्धिमत्ता मुंबईचे सिंह फेरोजशहा मेथांच्या गुणग्राहक व सर्वसंग्राहक दृष्टीला पडून, त्यांनीं जिन्हांना आपल्या कमिटीमध्यें दाखल करून घेतले. बॅ. जिन्हांहि फेरोजशहांचें व्यक्तित्व व त्यांची लोकोत्तर कीर्ति पाहून त्यांचेकडे आकर्षिले गेले. फेरोजशहांचे अनुयायित्व स्वीकारल्या नंतर त्यांच्या उत्तेजनानें जिन्हांनीं केलेली प्रगति व त्यांनीं अल्पकालांतच मिळविलेली मान्यता त्यांच्या कर्तबगारीची उत्कृष्ट साक्ष पटविते.

सन १९०७ च्या कॉक्स प्रकरणामुळें उद्भवलेले म्युनिसिपल निवडणुकीचें प्रकरण कोर्टांत गेल्यावर कॉक्सच्या खटल्याविरुद्ध आपल्या तर्फे काम चालविण्यासाठीं

मि. मेहेतांनी जिन्हांची नेमणूक केली. हा खटला स्मालकॉज कोर्टात चाळीस दिवस पर्यंत रंगला होता. या खटल्यांत कायदे आजम जिन्हांनीं आपल्या प्रभावशाली वक्तृत्वानें व सखोल बुद्धीमत्तेनें प्रतिपक्षाचे प्रत्येक म्हणणें मुद्देसूदपणें खोडून काढून दणदणींत विजय मिळविला. या खटल्यांत जिन्हांनीं बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुंबईत त्यांचा जाहीर गौरवहि पण करण्यांत आला.

जिन्हांच्या या उज्ज्वल कार्यकर्तृत्वामुळें व अगदीं अल्प काळांतच त्यांनीं हस्तगत केलेल्या या विलक्षण लोकप्रियतेमुळें वरिष्ठयुरोपियन अधिकाऱ्यानींहि त्यांच्या बद्दल धन्योद्गार काढलेलें आहेत. त्यांच्या वकिलीच्या या तीन वर्षाच्या कारकीर्दीनंतर इ. सन १९०६ मध्यें ते मुंबई हायकोर्टाचे अॅडव्होकेट जनरल बनले. तेव्हां पासून त्यांचें नांव मोठमोठ्या युरोपियन बॅरिस्टरांच्या सदरांत मोडूं लागलें.

एक उत्कृष्ठ कायदेपंडित या नात्यानें सांप्रत कायदे आजम जिन्हानीं कित्येक महत्वाचे व गुंतागुंतीचे असे कज्जे मोठ्या कोशल्यानें यशस्वी करून दाखविले आहेत. त्यांपैकीं लो. टिळक व हॉर्निमन या कज्जांचा विशेष प्रामुख्यान नामनिर्देश करण्यांत येईल.

# कॉंग्रेसमध्यें प्रवेश.

इ. स. १९०६ मध्यें कलकत्त्यास इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे एक प्रचंड अधिवेशन भरविण्यांत आले होतें. कॉंग्रेसचें हे अधिवेशन अत्यंत सुविख्यांत व चिरस्मरणीय म्हणून गाजलें गेले आहे. हिंदी राष्ट्रीय चळवळीचें प्रमुख नेते देशभक्त दादाभाई नौरोजी यांनीं या अधिवेशनामध्यें सरकारच्या दुटप्पी राजकारणाचा तपशीलवार पाढा वाचून, प्रथमच हिंदी स्वातंत्र्याची निर्भिडपणें घोषणा केली. त्यानीं आपल्या जहाल भाषणाच्या शेवटीं कायदे आजम बॅ. जिन्हांच्या कडे अंगुली निर्देश करून त्यांच्या कार्याची, उच्च ध्येयाची व जाज्वल्य देशभक्तिची मुक्त कंठानें स्तुति केली. यावेळीं बॅ. जिन्हा दादाभाईंचे प्रॉयव्हेट सेक्रेटरी ह्मणून उपस्थित होते. शेवटीं मि. बद्रुद्दीन तय्यबजी. व सर फेरोजशहा मेथा यांनीं कॉंग्रसची आवश्यकता व तिचें उच्च ध्येय या विषयावर भाषण करून प्रत्येक सुशिक्षितानें कॉंग्रेसमध्यें सामील होऊन कॉंग्रेसचे लक्षावधीनें सभासद वाढविणें कसें अवश्यकतेचें आहे, हें हृदयस्पर्शी निवेदनानें स्पष्ट केलें.

कायदे आजम जिन्हांनांही कॉंग्रेसच्या उच्च ध्येया-बद्दल व तिच्या कार्यक्षमते बद्दल निःसंशय आदर होतांच

परंतु अद्याप त्यांना आपल्या कार्य बाहुल्यामुळें व कांहीं कारणास्तव कॉंग्रेसमध्यें दाखल होता आले नव्हते. तथापि या प्रसंगी त्यांनीं आपण कॉंग्रेस मध्यें दाखल झाल्याचें जाहीर केले. व राष्ट्रहिताकरितां सर्वांनीं एक दिलानें प्रेरित होऊन एका प्लॅटफॉर्मवर जमणें किती आवश्यकतेचें आहे, हें आपल्या ओजस्वी वाणीनें निवेदलें. अधिवेशनास हजर असलेल्या सर्व मोठमोठ्या लोकांना जिन्हांची कार्यक्षमता व निस्सीम स्वातंत्र्यनिष्ठा अवगत असल्यामुळें त्यांनीं मोठ्या आनंदानें त्यांचे अभिनंदन केलें.

कॉंग्रेसमध्यें दाखल होतांच, जिन्हांनीं प्रत्येक कार्य मोठ्या उत्साहानें व धडाडीनें करण्यास आरंभ केला, व प्रत्येक अधिवेशनांत प्रामुख्यानें भाग घेऊं लागले. त्यांच्या या उत्साही व निरलस कार्यक्षमतेमुळें चोंहींकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होऊं लागला. अशा रीतीनें त्यांच्या कार्यप्रणालीनीचा उदयोन्मुखी तारा, जनतेचीं अंतःकरणें आकर्षून घेत असतां " सद्यस्थितीचा प्रश्न व हिंदी स्वातंत्र्य " या विषयांवर कॉंग्रेसमधील त्यांचे पहिलेंच परंतु तेजस्वी असें अस्खलित भाषण झालें. जिन्हांच्या या पहिल्याच प्रभावशाली नि चैतन्ययुक्त वक्तृत्वानें सभागृहातील सर्व श्रोतृवर्ग मंत्रमुग्ध

नागाप्रमाणें डोलत होता. जेव्हां त्यांचे हें अंतःकरण पिळवटून टाकणारे भाषण संपलें, तेव्हां प्रत्येकजण त्यांच्या चेहऱ्याकडे आश्चर्ययुक्त व आपुलकीच्या भावनेनें टकमकपणें पाहूं लागला. जणूं काय त्यांना असेंच ह्मणावयाचें होतें कीं, असलें प्रखर राष्ट्रभक्तीनें युक्त असें तेजस्वी भाषण अद्याप पावेतों आम्हीं कधींहीं श्रवण केलेलें नाहीं.

जिन्हांच्या राजकीय आयुष्याचा पुष्कळसा भाग काँग्रेसमध्येंहि खर्च झालेला आहे.काँग्रेसच्या बहुमोल तत्वाबद्दल त्यांच्या मनांत पहिल्या पासूनहि आदर होता, व अद्यापहि आहे. काँग्रेसचे एक जहाल कार्यकर्ते या नात्यानें त्यांनीं काँग्रेसची व जनतेची एकनिष्ठपणें सेवा केलेली आहे हे त्यांच्या कट्या शत्रुनाहि प्रांजलपणें कां होईना, मान्य करावे लागते. परंतु काँग्रेसला असहकारितेचा पुरस्कार करावा लागून; जसजसा तिला आपल्या उच्च ध्येयांत बदल करावा लागला, तसतसा जिन्हांचा व काँग्रेसचा निकटीचा संबंध दुरावूं लागला. व त्यानां काँग्रेस पासून पूर्णपणें अलिप्त रहावें लागले.

# सुप्रीम लेजिस्लेटिव्ह कौन्सिल मधील कामागिरी

सन १९१० हें साल कायदे आजम जिन्हांच्या आयुष्यांतील मोठें क्रान्तिकारक नि चिरस्मरणीय ह्मणून समजलें जातें. यावर्षी मुंबई प्रांतीय सर्व मुस्लिम नागरिकांनीं जिन्हांची जाज्वल्य राष्ट्रभक्ति व निःसीम स्वातंत्र्यनिष्ठा पाहून, त्यांना मुसलमानांचे प्रतिनिधि ह्मणून वरिष्ठ कायदे कौन्सिलांत निवडून दिले. आणि या सालापासूनच त्यांच्या कार्यक्षम अशा आदर्श महत्वाकांक्षेची पूर्तता होऊन, कौन्सिलसारख्या विस्तृत कार्यक्षेत्राच्या ठिकाणीं त्यांनीं बजावलेल्या निस्पृहतेच्या कामगिरीमुळें खरा देशसेवक म्हणून चमकण्याचेंहि भाग्य त्यांना मिळालें. एक कडवे देशभक्त व कट्टे काँग्रेसमन या नात्यानें जिन्हांनीं स्वीकारलेलें मुसलमान जमातीचें नेतृत्व कांहीं मत्सरग्रस्त देशभक्तांना पसंत न पडून ते त्यांच्या विरुद्ध उघड उघड प्रचारबाजीचें शो (Show) करूं लागले. जिन्हांनीं मुसलमान जमातीचे प्रतिनिधी म्हणून कौन्सिलमध्यें प्रवेश करण्यापूर्वीच त्यावेळचें राजकीय आंदोलनांचें सूक्ष्मतेनें अवलोकन केलेले असल्यामुळें, आपल्या विरोधकांच्या कारवायाना विशेष महत्व देण्याची त्यांना गरज भासली नाहीं.

यानंतर कौन्सिल मधील त्यांच्या महत्तम अशा लोकोपयोगी कार्यामुळें त्यांच्या विरोधकांची तोंडें आपोआपच बंद पडली व जनतेलाहि त्यांच्या जाज्वल्य देशभक्तीची व लोकोपयोगी कार्याची पूर्णपणें कल्पना येऊन, जो तो त्यांच्या कार्याशीं एकरूप होण्याकरितां अहमहमिकेने अपेक्षा करूं लागला. कौन्सिलमध्यें असतां, जेणेकरून हिंदवासियांत एक वाक्यता निर्माण होऊन, आपला देशोन्नत्तीचा मार्ग सुकर होईल अशाच बिलांना तें प्रामुख्यानें पाठिंबा देत व तीं अंमलांत येण्याकरितां आटोकाट प्रयत्न करीत.

नामदार गोखले यांचें ( **Elementary Education Bill** ) प्राथमिक शिक्षण बिल व मि. बसू यांचे मॅरेज बिल (**Marriage Bill**) या बिलांना निरनिराळ्या पक्षाकडून कसून विरोध होत असतांहि जिन्हांनीं या बिलांची खरी उपयुक्तता लक्षांत घेऊन, केवळ लोक कल्याणार्थ म्हणून तितक्याच जोरानें या बिलांना पाठिंबा दिलेला होता. यानंतर जेव्हां इंडियन शिपिंग बिल (**Indian Shipping Bill**) कौन्सिल मध्यें मांडण्यांत आले. त्यावेळीं या बिलावर भाषण करीत असतां त्यांनीं सांगितले कीं, " खरोखर हें बिल सर हबीबुल्लाह यांच्या म्हणण्याप्रमाणें सर्वस्वी आपल्या इस्लाम धर्माला विघातक असेंच आहे. म्हणून या बिलाला प्रथम

विरोध करणें हें मी माझे पवित्र कर्तव्यकर्म समजतों. जर साम्राज्यशाही लोकांकडून जाणून बुजून अन्यायी मार्गाचा अवलंब करण्यांत येऊन, मुसलमानांना नुकसान पोहोंचविण्याचा प्रयत्न करण्यांत आल्यास ते मलाच नव्हे तर कोणत्याही सद्सद्विवेकी मनुष्यास सहन होणें शक्य नाहीं. म्हणून माझ्या कडून मुस्लिम विघातक व देशहितास मारक ठरणाऱ्या गोष्टींचा जरूर प्रतिकार झाल्याशिवाय राहणार नाहीं हे प्रत्येकानें निश्चित जाणावें.

यानंतर १९१३ मध्यें जिन्हांनीं स्वतःच परिश्रम पूर्वक तयार केलेलें "वक्फ बिल" कौन्सिलमध्यें दाखल केलें. व या बिलाला एक "उत्कृष्ट कायदा" या नात्यानें पास करून घेण्यांतहि त्यांना पूर्णपणें यश मिळालें. एका हिंदी माणसाच्या वतीनें लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमधून पास करून घेण्यांत आलेलें हें एक पहिलेंच बिल असल्यानें मुसलमानांबरोबर सर्व हिंद वासीयांच्या अंतःकरणांत जिन्हांच्या अहर्निश कार्यक्षमतेविषयीं आदर नि विश्वासाचें बीजारोपण झाल्यास कांहींच नवल नाहीं. पुढें हें बिल उत्तमोत्तम कायद्यांच्या सदरांत मोडूं लागल्याचें पाहून, लॉर्ड हार्डिंग यांनीं जिन्हांच्या कार्याविषयीं आनंद व्यक्त करून, त्यांना आपल्या कौन्सिलचे सभासद म्हणून घेतल्याचें जाहीर केले.

# विलायतेस प्रयाण.

सन १९१३ पर्यंत मिळविलेल्या जिन्हांच्या यशस्वी कारकीर्दींत त्यांच्या अंत:करणांत देशभक्तीची तीव्र ज्योत प्रकाशमान होऊं लागली. यापुढें त्यांनीं आपलें सर्व आयुष्य देशकार्य व समाजकार्य याकरितां सर्वस्वी वहाण्याचें ठरविलें. वाढत्या वयाबरोबर त्यांचा उत्साहहि द्विगुणित होऊन, ते प्रत्येक कार्यांत मोठ्या अहमहमिकेने भाग घेऊं लागले.

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांत कायदे आजम जिन्हा प्रकृती स्वास्थ्याकरितां ना. गोखले यांच्या समवेत पुन्हा विलायतेस रवाना झाले. परंतु तेथेंहि त्यांना मिळावी तितकी विश्रांति व स्वास्थ्य मिळूं शकले नाहीं; कारण भारतमातेचे हे दोघे सुपुत्र प्रकृतीस्वास्थ्या करितांच कांहीं इंग्लंडला रवाना झाले नव्हते! तर स्वतंत्र इंग्लंडप्रमाणेंच आपल्या जन्मभूमीचाहि उज्वल भविष्यकाळ पहाण्याच्या दृष्टीनेंच ते इंग्लंडला येऊन दाखल झाले होते.

आपल्या प्रिय मातृवत देशाचें स्वातंत्र्य हाच आपला व आपल्या भावी पिढीचा आनंद, हेंच ध्येय आपल्या पवित्र दृष्टीसमोर ठेवून, त्यांनीं आपल्या कार्याची आंखणी केली होती. हर प्रयत्नानें आपण आपल्या देशाच्या गुलामीच्या

शृंखला तटातट तोडून, स्वातंत्र्याकरितां सतत झगडत राहूं व वेळ प्रसंगी आपला प्राणहि पणाला लावूं, हीच त्यांच्या देशभक्तीची अंतःकरणांमधील खरी ऊर्मि होती. ज्याप्रमाणे खरा देशभक्त नाइलाजास्तव आपल्या मातृभूमीपासून हजारों मैल दूर वास्तव्य करीत असतों, व तेथें त्याला एकादा आपला अनोळखी पण स्वदेशबंधु दृष्टीस पडतांच त्याला आकाश ठेंगणें होऊन जाते; त्या इसमाला आपल्या देशाचा क्षेम समाचार केव्हां एकदां विचारूं व आपल्या मातृभूमीविषयीं हृदयांत दडपून ठेवलेली उत्कट प्रेमाची भावना, त्याच्या समोर केव्हां एकदां ओकूं असें त्याला होऊन जाते त्याचप्रमाणें कायदे आजम मोहम्मद अली जिन्हा जरी त्यावेळीं आपल्या जन्मभूमीपासून हजारों मैल दूर होते तरी त्याचें अंतःकरण [ ज्यामध्यें आपल्या देशाच्या आत्यंतिक प्रेमाची चैतन्ययुक्त ज्योत तेवत होती. ] हिंदुस्थानांतच होतें. व या करितां ते नेहमी अस्वस्थ व बेचैन रहात असत.

## इंडियन असोसिएशन.

इंग्लंडला पोहोंचल्यानंतर कायदे आजम जिन्हांनीं मोठ्या प्रेमानें आपल्या हिंदी विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्याशीं सामाजिक, राजकीय व धार्मिक बाबतींत चर्चा

केली. यावेळीं त्यांना आपल्या विद्यार्थी जीवनाची आठवण होऊन, चलत चित्रपटाप्रमाणें त्यांच्या दृष्टीसमोर हिंदी विद्यार्थ्यांचें जीवन व शिक्षणाच्या प्रत्येक बाबतींत होत असलेल्या त्यांच्या गळचेपीचें मूर्तिमंत दृश्य उभें राहिलें. आणि आतांहि विद्यार्थ्यांच्या बाबतींत ब्रिटिशांनीं स्वीकारलेली ही वक्रनीति पाहून त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिलें. हजारों मैलाहून, शिक्षणासारख्या पवित्र हेतूची पूर्तता करण्याकरितां आलेले आमचे हे देशबांधव आणि त्यांच्यावर प्रत्येक बाबतींत युरोपियनांच्या कडून होत असलेला अन्याय पाहून त्यांना या कृत्याची एकदम चीड आली तेथील सर्व विद्यार्थ्यांशीं वाटाघाटी करून झाल्यानंतर त्यांनीं थोड्याच मुदतींत ना. गोखले यांच्या साहाय्यानें त्यांनीं तेथें " इंडियन असोसिएशन" या संस्थेची स्थापना केली.

ज्यामुळें इंग्लंडमध्यें वास्तव्य करणाऱ्या सर्व हिंदी लोकांवरील अन्याय दूर होऊन त्यांना खरें जीवन मिळालें गेलें या नंतर लौकरच त्यांना हिंदी विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी व योग्य गरजांची दाद लावून घेण्याकरितां एका कमिटीची सुद्धां स्थापना करावी लागली. यामुळें हिंदी विद्यार्थ्यांचा शैक्षणिकमार्ग निर्विघ्न होऊन ते जिन्हांच्याकडे अगदीं अभिमानानें व दयार्द्र अंतःकरणानें पाहूं लागले. या दोन्ही

संस्था स्थापन करण्याचा मुख्य उद्देश हाच होता कीं,त्यावेळीं इंग्लडमध्यें अमलांत येणाऱ्या कांहीं कायद्यापासून हिंदी लोकांची व विद्यार्थ्यांची जी कुचंबणा होत होती ती नाहींशी करणें हा होय. खरोखर आज इंग्लडहून येणारा प्रत्येक हिंदी विद्यार्थी कायदे आजम जिन्हांच्या कार्य प्रणालीनीबद्दल धन्योद्गार काढीत असतो. आणि या कार्यप्रवण संस्था, सांप्रतहि पहिल्या प्रमाणेंच सुस्थितींत आहेत.

## कॉंग्रेस डेप्युटेशनमध्यें.

सन १९१४ च्या मे महिन्यांत ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या डेप्युटेशनमध्यें सामील होऊन जिन्हानां तिसऱ्यांदा इंग्लंडला जावें लागलें. हें डेप्युटेशन फक्त या करितां इंग्लंडला रवाना करण्यांत आले होते कीं, ब्रिटिश पार्लमेंटचें लक्ष, हिंदुस्थानांतील प्रचलित घटनाकायद्याकडे वेधण्यांत येऊन हिंदुस्थानाला पोषक अशा घटनाकायद्यांत कांहीं सुधारणा घडवून आणाव्या, व सरकारलाहि हिंदुस्थानच्या सद्यास्थितीवर विचार करण्यास भाग पाडावे.

# मुस्लिम लीगमध्यें प्रवेश.

कायदे आजम जिन्हां हें ज्याप्रमाणें काँग्रेसचे एकनिष्ठ सेवक नि उत्साही कार्यकर्ते म्हणून नावाजलेलें आहेत, त्याचप्रमाणें सर्व साधारण गरीब जनतेचे एक चाहाते नि त्यांचे एक खरेखुरें मार्गदर्शक पुढारी म्हणूनहि ते सांप्रत ओळखले जातात. सर्वस्वी जातीय वादासारख्या भ्रामक समजूतीस गौण लेखून, जातीय दादासारख्या क्षुल्लक गोष्टींच्या विचारविनीमयांत आपला अमौलिक वेळ न दवडतां जेणें करून देशोन्नति होईल व आपल्या हिंदी जनतेला सद्गती मिळेल हेंच प्रमुख ध्येय त्यांनीं आपल्या मनःश्चक्षूपुढें ठेवून आपल्या कार्याची दिशा आंखलेली आहे.

प्रथम पासूनच जातीयतेचे कट्टे विरोधक म्हणून त्यांची ख्याती असल्यामुळें कित्येक वेळां त्यांना आपल्या अंगीकृत कार्यांत आतोनात मानसिक त्रास सहन करावा लागलेला आहे. देश हितास सर्वस्वी विघातक ठरणाऱ्या अशा जातीय वादाचे समूळ उच्चाटन करण्याकरितां त्यांनीं जे अहर्निश प्रयत्न केले आहेत, ते खरोखर स्तुत्य असेंच आहेत. जिन्हांच्या जातीयता विरोधी तत्वनिष्ठेचें प्रत्यंतर म्हणून पुष्कळशीं उदाहणें देण्यासारखीं आहेत. परंतु त्यापैकीं खालील एकच उदाहरण वाचकांच्या निर्दशनास आणीत आहे.

सन १९०६ सालीं हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांच्या मुलाखतीला ना. आगाखान यांच्या नेतृत्वाखालीं जें हिंदी मुसलमानांचे शिष्ठ मंडळ, जातीय मतदार संघाची पहिल्या प्रथमच मागणी करण्याकरितां म्हणून सरकारच्या गुप्त प्रेरणेनें गेलें होतें. त्या शिष्ठ मंडळांत सामील होण्याकरितां मोठमोठ्या लोकांकडून जिन्हांना आमंत्रणे आली असतांहि त्यांनीं त्या आमंत्रणांचा स्वीकार केला नांहीं. यावरून जातीय वादाकडे ते किती तुच्छतेनें पहात असत याची वाचकांना पुरेपूर कल्पना येण्यासारखी नाहीं काय ?

जिन्हांच्या या निस्पृहतेच्या धोरणामुळेंच आज त्यांना सर्व हिंदी जनतेमध्यें बहुमानाचे स्थान प्राप्त झालें आहे. त्यांची दृष्टीच मुळीं व्यापक, न्यायप्रिय, व तर्कशुद्ध असल्यामुळें राष्ट्रीय स्वातंत्र्याबरोबरच सर्व साधारण मागासलेल्या व अल्पसंख्यांक वर्गांचीहि प्रथम सुधारणा होणें अत्यावश्यक आहे हें ते आपल्या भाषणांतून वारंवार ध्वनित करीत असतात.

आणि ज्यावेळीं ते इंग्लंडहून परत आले त्यावेळी मुस्लिम लीगचे सूत्रधार मौलाना मोहम्मद अली [एडिटर कॉम्रेड] व सर सय्यद हसन हें होते त्यांच्या आगमनाची वार्ता समजतांच स्पेशल ह्मणून लीगतर्फे त्यांना आमंत्रण देण्यांत येऊन

त्यांचा योग्य तो आदर सत्कार करण्यात आला. व लीगमध्यें सामील होण्यानें सर्व मुस्लिमांचेंच नव्हें तर इतर सर्व अल्प संख्यांक वर्गांचेंहि कसें हित होणार आहे हें त्यांना सोदाहरण कॉंग्रेसची भेद नीति निदर्शनास आणून पटवून देण्यांत आलें.

या शिवाय जिन्हांना लीगमध्यें सामील होण्याकरितां त्यांच्या इच्छेप्रमाणें लीगची पुनर्घटनाहि करण्यास पूर्ण मुभा देण्यांत येऊन, इतःपर आपण सर्वजण एक दिलानें प्रेरित होऊन, आपल्या राष्ट्राकरितां व मुस्लिमांच्या न्याय हक्का करितां सदैव झगडत राहूं, असेंहि पण त्यांना आश्वासन देण्यांत आलें.

राजकारणांतील सतत वास्तव्यामुळें त्यांनीं आपल्या समानतेच्या दूरदर्शी चष्म्यांतून हिंदी मुस्लिमांच्या परिस्थितीचें अवलोकन तत्पूर्वींच केलेलें असल्यामुळें, मौ. मोहम्मद अली व सर सय्यद हसन यांच्या म्हणण्यास त्यांनीं आढे वेढे न घेतां खुल्या अंतःकरणानें अनुमोदन दिलें. शेवटीं मुस्लिमांच्या न्याय हक्कांचे संरक्षण करावयाचे असेल तर प्रथम आपणाला लीगमध्यें सामील व्हायावला पाहिजे, हा पूर्ण विचारांती निष्कर्ष काढून, ते मोठ्या खुषीनें मुस्लिमलीगला मिळाले. या नंतर लवकरच जिन्हांनीं निष्क्रीय देशभक्तीच्या घमेंडीची झूल

परिधान केलेल्या काँग्रेसी मुस्लिमाना दाखवून दिले कीं " सक्रीय " (Active) देशाभिमानाशिवाय देशोन्नती कधींहि व्हावयाची नाहीं. म्हणून प्रत्येक स्वातंत्र्यवादी मुस्लिमानें हिंदी स्वातंत्र्याबरोबर मुस्लिम लीगच्याही महत्तम कार्याशीं एकरूप होऊन मुस्लिम समाजांत पुनरुपी संघटना व लोकोत्तर गुणांचा विकास होईल अशी शिस्त निर्माण करून आपल्या कर्तव्याची पूर्तता करून घेतली पाहिजे.

मु. लीगमध्यें दाखल होण्यापूर्वी लीग सदस्यांच्या अमंत्रणावरून जरी कित्येकवेळां ते हिंदी मुस्लिमांची एकमेव संस्था म्हणून लीगच्या अधिवेशनास हजर राहून, लीगच्या कार्यातहि प्रत्यक्ष भाग घेत होते तरी आपल्या मनाप्रमाणें लीगमध्यें राष्ट्रीय सुधारणा घडवून आणल्या खेरीज लीगमध्यें सामील झाले नव्हतें. आणि त्यांच्या मनाप्रमाणें जेव्हां लीगच्या घटनेंत संपूर्ण बदल करण्यांत येऊन, तिच्यांत खऱ्या-खुऱ्या राष्ट्रीय सुधारणा करण्यात आल्या तेव्हांच ते लीगचे सभासद झाले.

## मुस्लिम लीगचे पुनरुज्जीवन.

मुस्लिम लीगमध्यें प्रवेशकरतांच लीग आणि काँग्रेसमध्यें समेट घडवून आणून, लीगला संपूर्ण राजकीय पातळीवर

आणण्या करितां जिन्हानीं अविश्रांत प्रयत्न केले आहेत. याचे अविस्मरणीय दृश्य म्हणून लीग आणि काँग्रेसच्या संयुक्त अधिवेशनांकडे अंगुलीनिर्देश करण्यांत येईल. १९१३ पासून १९२१ पर्यंत मुस्लिम लीगमध्यें संपूर्ण राष्ट्रीय सुधारणा घडवून आणण्याकरितां जिन्हांनीं आपल्या जिवाचे रान केले होते खरे, परंतु लीगमधील मूठभर राजनिष्ठ मुसलमानांच्या कारवायामुळें त्यांच्या कार्याचे चीज होईना, तेव्हां ते लीगपासून सर्वस्वी आलिप्त राहूं लागले.

सन १९३० मध्यें मुसलमानांच्या वतीनें राऊंड टेबल कॉन्फरन्सला हजर राहण्याकरितां कायदे आजम जिन्हा इंग्लंडला गेले होते. त्यांनीं आणि इतर मुसलमान पुढाऱ्यांनीं जिन्हांच्या चौदा मुद्यांचा पुरस्कार केला. कॉन्फरन्स नंतर बरेच दिवस कायदे आजम हिंदी मुसलमानांच्या भवितव्ये विषयीं विचार करीत, इंग्लंडमध्यें वास्तव्य करून राहिले होते. मुस्लिम लीगमध्यें विस्कळितपणा निर्माण झाल्याचे पाहून, हिंदुस्थानांतील जबाबदार मुस्लिम पुढाऱ्यानीं जिन्हांना तातडतोब पाचारण करण्यांकरितां आपल्या सह्यानिशीं तार केली. तेव्हां १९३४ च्या सुमारास ते हिंदुस्थानांत परत आले.

सन १९३४ च्या सुमारास हिज हायनेस सर आगाखान हिंदुस्थानांत पोहोंचले. त्यांच्या आगमनाने मु. लीगमध्यें जी पार्टी बाजी बोकाळली होती ती नाहींशी होऊन, मुं. लीगला पुनरपी नवजीवन मिळाले. लीग मधील दोन्ही पार्ट्यांच्या पुढाऱ्यानीं त्यांच्या अध्यक्षतेखालीं कॉन्फरन्स बोलावली. हिज हायनेस आगाखान यानीं दोन्हीं पार्ट्यांतील मतभेद दूर करून त्यांच्यांत दिलजमाई केली. व लीगची सर्व सूत्रें हातीं घेण्याविषयीं जिन्हांना विनंती केली. या नंतर पुष्कळ वाटाघाटी होऊन लीगमध्यें संपूर्णतया : एक वाक्यता निर्माण झाली. व कायदे आजम मोहम्मद अली जिन्हा यांना मु. लीगचे एकमेव अध्यक्ष निवडण्यांत आले. १९३४ सालीं कायदे आजम जिन्हां यानीं लीगची सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतली आणि तेव्हांपासून ते आजतागायत पर्यंत जिन्हा मु. लीगचेच नव्हे तर मुस्लिम हिंदुस्थाचे एकमेव अध्यक्ष म्हणून चमकत आहेत.

ता. ४ मार्च १९३४ मध्यें खान बहादूर हाफीज हिदायतुल्लाह यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथें मु. लीगचे अधिवेशन भरविण्यांत आले. या वेळीं जिन्हांना मु. लीगचे एकमेव अध्यक्ष म्हणून निवडण्यांत आले. " सर्व हिंदुस्थानांस

स्वीकारावयास योग्य अशी भावी राज्यघटना मिळविण्या-करितां दुसऱ्या जातींशीं व राजकीय पक्षांशी संपूर्ण सहकार्य करावयास लीग तयार आहे." असा ठराव पास करण्यांत आला. या वेळीं कायदे आजम म्हणाले "हिंदुस्थानचें कल्याण साधण्याकरितां मुसलमान इतर जमातीमागें कधींहि राहणार नाहींत. हिंदु आणि मुसलमानांमध्यें संपूर्ण एकवाक्यता व स्नेहभाव निर्माण करण्यांत जी मला खुषी होईल ती दुसऱ्या कशानेहि होणार नाहीं." याच बैठकींत त्यांनीं श्वेतपत्रिकेच्या "अमाणुसकीय योजना" असे निषेधपूर्ण वक्तव्यांत उल्लेख केला.

आज जिन्हा लीगचे सर्वाधिकारी बनले आहेत. लीगची सर्वसूत्रें हातीं घेतांच यक्षिणीची कांडी फिरवावी तद्वत जिन्हांनीं हिंदुस्तानांलाच नव्हेतर पाश्चिमात्य राष्ट्रानांहि लीगचे महत्व पटवून दिले आहे, हें आज आपणांस पहावयास मिळते.

# मुस्लिम लीग व
# ' मुस्लिमांचे उज्ज्वल भवितव्य '

ज्या जमातींत शिक्षणाचा, ऐक्याचा व एक सूत्रीपणाचा अभाव असतो, ती जमात विस्कळित झालेली, मागासलेली व बहुधा आज्ञांधकाराच्या वातावरणांत पूर्णपणें गुरफटलेली दिसून येतें.

अर्थात " **Ignorance is the root of all evils** " ' अज्ञान हाच अनर्थाचा मूळ पाया आहे. ' या उक्तिप्रमाणें त्या मागासलेल्या व सर्वस्वीं आज्ञांधकाराच्या खोल दरींत खितपत पडणाऱ्या अशा जमातींवर सर्वत्रकडून ओढवले जाते व तिचे अस्थित्व बव्हंशीं नाहींसे होते. हीच दारूण परिस्थिति १८५७ सालाच्या बंडानंतर हिंदुस्थानांतील मुसलमान जमातीवर ओढवलेली होती.

त्यावेळीं हिंदी मुस्लिमानां मार्गदर्शक नेता कोणीच नसल्यानें त्यांची सर्वत्रबाबतींत पूरेपूर अधोगती झालेली होती. त्यानां राजकारण कळत नव्हेंत, स्वहक्कांची जाणीव नव्हती, संघटना माहिती व एक सूत्रीपणाचा तर संपर्कही नसल्यानें ते विस्कळित झाले होते व त्यांच्यांत कारूण्याची मूर्तिमंत आवकळा निर्माण झाली होती. एकतर नेते (सार्वभौम राज्यकर्ते )

म्हणून सरकारचा प्रथम पासूनच त्यांच्यावर डोळा होता, व दुसरे १८५७ सालच्या बंडामुळें तर, मुस्लिम जनता, सरकारच्या रोषांस पूर्णपणें पात्र झाली. यामुळें दैन्यावस्थेंत काळ कंठणाऱ्या मुसलमानानां सरकारकडून नानातऱ्हेनें छळण्यांत येऊन, त्यांना " दे माय धरणी ठाय " करून सोडण्यांत आले. आणि जसजसें सरकारकडून मुसलमानांवर अधिकाधिक दडपण येऊं लागले, तसतसे भीतीग्रस्त झालेले मुसलमान, राजकीय चळवळी तर राहोच, पण सरकारच्याहि थाऱ्यास उभे राहिनासे झाले.

याचा परिणाम व्हायचा तोच झाला, शिक्षणाच्या अभावी मुसलमानानां नोकऱ्या मिळेनाशा झाल्या, उलट हिंदु-जमातीनें सरकारशीं सहकार्य करून मोठमोठ्या पदाधिकारांच्या जागा पटकावण्यांस प्रारंभ करून, हळूहळू मुसलमानांवर दद्दरव बसविण्याचा प्रयत्न सुरूं केला. यामुळें मुसलमान, शैक्षणिक, औद्योगिक व राजकीय बाबतींत मुसलमानेतरापेक्षां एकदम पन्नास वर्षांनीं मागें राहिले

अशावेळीं सर सय्यद अहमदखान व नबाब महसिनुलमुल्क यांच्या सारखे पुढारी जर वेळेवर मुसलमान समाजाला लाभले नसते तर मुसलमान समाजाची स्थिती कोणत्या थराला पोचली असती हें कांहीं सांगवत नाहीं.

सर सय्यद अहमदखान यांच्या नेतृत्वानें मुसलमानांची शैक्षणिक व राजकीय परिस्थिती सुधारली गेली. त्यांना शिक्षणाची गोडीं लागली व त्यांना आपल्या न्याय हक्काची तीव्रतेनें जाणीव होऊं लागली.

## मुस्लिम लीगची स्थापना.

मुसलमानांत राजकीय, सामाजिक, व शैक्षणिक सुधारणा घडवून आणून, त्यांच्यात पुनरपी ऐक्य निर्माण करण्याकरितां व त्यांच्या न्याय हक्कांचे संरक्षण करण्याकरितां डाक्का येथें ३० डिसेंबर १९०६ सालीं भरलेल्या एज्युकेशन कॉन्फरन्समध्यें नबाब विकारूल मुल्क यांच्या अध्यक्षतेखालीं ऑ. इ. मुस्लिम लीगची स्थापना करण्यांत आली.

## " स्वतंत्र मतदार संघाची मागणी. "

सर्व साधारण मनुष्य मात्राची प्रवृति असते कीं,एकाद्या भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्याला भरपूर पैसा मिळत असला व कर्मधर्मसंयोगानें जर दुसरा ' वन् मॅन वन् व्होट ' या प्रचलित सुधारणेच्या अनुरोधानें त्याच्या संपत्तींत भागीदाराचे हक्क सांगू लागला तर तो पहिला मनुष्य त्या दुसऱ्या मनुष्याच्या न्याय हक्काची जाणीव असतांहि, हा हक्क केव्हांही मान्य करण्यांस तयार नसतो.हीच परिस्थिती प्रचलित स्वतंत्र मतदार

आला

संघाच्या बाबतींत दिसून येते. १९०७ सालीं लीगने स्वतंत्र मतदार संघाची व राखीव जागांची मागणी केली. तेव्हां ही मागणी अन्यायी आहे, लोक शाही विरोधी आहे असें कांहीं भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्याकडून सांगण्यांत येऊं लागले.

• खरोखर ही मागणी अन्यायी व लोक-शाही विरोधी आहे काय ? आणि त्यावेळीं मुसलमानांची स्थिती काय होती व तिचा त्या वेळेच्या राजकीय परिस्थितीशीं कोणता संबंध होता याचे परिशीलन केल्यावरच आपणांस उत्तर मिळेल. हिंदुस्थानांत ब्रिटिश राज्याची स्थापना झाल्यानंतर सुरवातीला कलकत्ता, मुंबई व मद्रास या विभागांतच, औद्योगिक व्यापारी व शैक्षणिक प्रगती ज्यास्त जोरानें झाली. या मानानें बहुसंख्य मुसलमान वस्ती असलेला भाग बराच मागासलेला होता. (पंजाब, पूर्व बंगाल, वायव्य सरहद्दप्रांत, सिंध व बलुचिस्तान हें प्रांत या भागांत मोडतात.) तसेंच इतर ऐतिहासिक कारणामुळें आधुनिक शिक्षणाच्या बाबतींतहि मुसलमानांची प्रगती फारशी झालेली नव्हती. १८९३ सालीं मुसलमान पदवीधरांची संख्या ९४६ होती. तर हिंदु पदवीधरांची संख्या ४९८७ होती. हें आंकडे सर सय्यद अहमद खान यानीं दिलेले आहेत.

त्यावेळीं मतदानाचा हक्क मालमत्तेवर अवलंबून होता व फक्त शिकलेल्या लोकानांच निवडणुकीला उभे राहतां येत असे,

या दोन गोष्टी लक्षांत घेतल्या ह्मणजे केवळ स्वतंत्र मतदार-संघाच्याद्वारेंच त्यावेळच्या मध्यम वर्गीय सुशिक्षित मुसलमानांना आपल्या बांधवांची सेवा करणें शक्य होतें हें उघड आहे. या दृष्टीनें विचार केला तर मुस्लिमलीगनें स्वीकारलेली स्वतंत्र मतदारसंघाची मागणी ही न्याय्य मागणी होती असें दिसून येईल. अर्थात ही कल्पना आमच्या हिंदुबांधवानां कशी पटणार ! त्यांना आपल्या भरपूर प्रमाणांत मिळणाऱ्या नोकऱ्या टिकवावयाच्या होत्या, खोट्या धर्मभावनेनें प्रेरित होऊन, त्यांना आपला स्वार्थ साधावयाचा होता, आपल्या सर्वस्वाचें रक्षण करावयाचें होतें. यामुळें त्यांच्याकडून 'स्वतंत्र मतदारसंघासारख्या लोकशाही मागणीस विरोध होऊन मुस्लिमलीग जातीय आहे, अराष्ट्रीय आहे, असा या कांगावखोरांनीं प्रचार करण्यास सुरवात केल्यास कांहींच नवल नाहीं.

## 'साम्राज्य-विरोधी जागृती.'

१९१३ मध्यें जिन्हांनीं लीगमध्यें प्रवेश केला व त्यांनीं लीगच्या घटनेंत संपूर्ण बदल करवून तिची संपूर्ण राष्ट्रियत्वाच्या पार्श्वभूमीवर प्रतिष्ठापना केली. "यापूर्वी हिंदुस्थानच्या परिस्थितीशीं एकरूप होईल अशा तऱ्हेचे ब्रिटिश-साम्राज्यांतर्गतस्वराज्य" हें मुस्लिम लीगचें ध्येय ठरविण्यांत आलें होतें. तुर्कस्थानचें शकलीकरण, झारशाही रशियाची

इराणवरील स्वारी, मलायामधील मुसलमानांचे हाल यामुळें हिंदी मुसलमानांत साम्राज्यविरोधी भावना जागृत होऊं लागल्या होत्या. मौ. अबुल कलाम आझाद यांच्या " अल्-हिलाल " या उर्दू पत्रांतून व मौ. मोहम्मद अली यांच्या ' कॉम्रेड ' या इंग्रजी पत्रांतून, मुसलमानांनीं स्वातंत्र्यासाठीं झगडलें पाहिजे. असा प्रचार सुरूं करण्यांत आला होता.

## " सुप्रसिद्ध लखनौ पॅक्ट. "

कायदे आजम जिन्हा मौ. मोहम्मद अली वगैरे मुस्लिमलीगच्या पुढाऱ्यांच्या अहर्निश प्रयत्नामुळें लीग आणि कॉंग्रेसमध्यें समेट घडून आला व १९१५ सालीं कॉंग्रेसचे व मुस्लिम लीगचेंहि अधिवेशन एकाचवेळीं भरलें. त्यावेळीं मुस्लिमलीगचे अध्यक्ष बिहार प्रांतातले प्रसिद्ध कॉंग्रेसभक्त मि. मझहरूलहक हे होते. हिंदुमुस्लिम प्रश्नावर समेट करण्यासाठीं या दोन संस्थांत वाटाघाटी सुरूं झाल्या. या वाटाघाटीनां यश येऊन कॉंग्रेस-लीग समेट झाला व लखनौ येथें दोन्हीं संस्थांचीं खुलीं अधिवेशनें भरून त्यांत या समेटाला मान्यता देण्यांत आली. हा समेट सुप्रसिद्ध लखनौ कराराच्या नांवानें प्रसिद्ध आहे. या कराराकडे पाहिलें असतां आपणाला काय दिसून येते ? बंगालच्या व पंजाबच्या जागृत मुसलमानांचे हक्क, मध्यवर्ती सरकारांत योग्य जागा व मुस्लिमेतर भागांतल्या

अल्पसंख्य मुसलमानांचे संरक्षण, हें मुद्दे त्यात प्रामुख्याने आहेत. मुसलमानांचे स्वतंत्र मतदार संघ असावे, व प्रांतिक काय. मंडळातल्या त्यांच्या जागा निश्चित कराव्या असें त्यांत मान्य करण्यांत आलेले आहे. पंजाबमध्यें त्यानां एकंदर नियुक्त जागां पैकीं अर्ध्या जागा मिळणार होत्या व बंगाल मध्यें त्यानां ४०टक्के जागा मिळणार होत्या मध्यवर्ती कायदे मंडळांतल्या एकंदर जागांपैकीं एकतृतीयांष जागा त्यानां मिळाव्या असे ठरलें होतें व मुसलमानांच्या हितसंबधाबद्दलचे कोणतेहि बिल एकंदर मुस्लिम सभासदापैकीं तीन चतुर्थांश मते मिळाल्या-शिवाय पास करण्यांत येऊं नये ही गोष्ट मान्य करण्यांत आली होती. अर्थात लखनौ पॅक्ट मुळें मुसलमानावर अतिक्रमण करूं पाहाणाऱ्या जात्यधांची तोंडे पहाण्यासारखी झाली व मुसलमानांच्या स्वयंनिर्णय हक्कांचे संरक्षण केले गेले. याचे सर्व श्रेय मुस्लिम लीगलाच द्यावयाला पाहिजे म्हणून मु. लीगची शक्ति वाढवून, तिला कार्यप्रवण बनवणें हें सूज्ञांचे कर्तव्य ठरत नाहीं काय?

मोर्ले मिंटो सुधारणा यावेळीं अमलांत आल्या होत्या, कायदेकौन्सिलातील ज्ञातीय प्रतिनिधींचे तत्व या सुधारणा योजनेंत सामील करण्यांत आले होतें, आणि आपणांस मिळालेल्या या हक्का बद्दल मुसलमानलोक हर्षित झाले

होते. अशा वेळीं उच्च हेतूनें व अंतःकरणपूर्वक विश्वासाने बोलणारा मार्गदर्शक पुढारी पाहिजे होता व ते काम कायदे आजम जिन्हा व मौ. मझहरूलहक्क सारख्या राजकारण धुरंधर मुस्लिम नेत्यानीं पार पाडले. परंतु कांहीं आपमतलबी लोकांकडून मुसलमानानां मिळालेला हा विजय, दोन्ही जमातींच्या हितसंबंधाला विघातक आहे अशी ओरड करण्यांत येऊं लागल्यामुळें जिन्हांनीं स्वतंत्रपणें यांत लक्ष घालून मुसलमानानां इतरेतर लोकांच्या बरोबरीनें वागविणेंच कसें, राष्ट्रहिताच्या दृष्टीनें पोषक होणार आहे हें सर्वांच्या नजरेस आणून दिले.

या नंतर १९२१ पर्यंत मु. लीग व कॉंग्रेसमध्यें संपूर्ण एकवाक्यता नांदत होती. परंतु याच सुमारास ठिकठिकाणीं हिंदुमुसलमानांचे दंगे सुरू झाल्यामुळें व हिंदु वर्तमानपत्रांच्या असंयमी, असत्य व अदूरदर्शीय लिखाणामुळें हिंदुमुसलमानांतील आदर्श ऐक्याला कायमचीच जी ओहोटी लागली, ती अद्यापर्यंत टिकून राहिली आहे. जिन्हांनीं व त्यांच्या सहकाऱ्यानीं हर प्रयत्नानीं घडवून आणलेले हे ऐक्य अशा रितीनें भंगले गेले व सर्वत्र दुहीचे वातावरण पसरले. यामुळें जिन्हानां अत्यंत वाईट वाटले व ते राजकारणापासून सर्वस्वी अलिप्त राहूं लागले.

१९२८ ते १९३४ पर्यंत लीगमध्यें पक्षभेद माजून लीगला उतरती कळा प्राप्त झाली होती. अशावेळीं जिन्हांनी लीगचीं सर्व सूत्रें हातीं घेऊन तिला पुनरपी बलशाली केले.

१९३७ सालीं ऑक्टोबर महिन्याच्या १९ ते १८ तारखेपर्यंत कायदे आजम जिन्हा यांच्या अध्यक्षतेखालीं लखनौ एथें मुस्लिम लीगचे चिरस्मरणीय असे अधिवेशन झालें, या अधिवेशनांत कायदे आजम जिन्हा यांनीं अत्यंत आवेशपूर्ण भाषण करून " हिंदुस्थानचें संपूर्ण स्वातंत्र हे मुस्लिम लीगचें ध्येय आहे असें घोषित केले." आपल्या राष्ट्रांत नाजूक राष्ट्रीयपरिस्थिति निर्माण झाली आहे. बहुसंख्यांक जमात, मुसलमान जमातीचें अस्तित्व देखील मावनायास तयार नाहीं आणि राष्ट्राच्या प्रगतीकरितां मुसलमान पुढाऱ्यांशीं सहकार्य करावयास, ती स्पष्टपणें इन्कार करीत असल्याचें दिसून येत आहे असें उद्गार काढून काँग्रसनें नवीन घटना धिक्कारावयाची ठरविले असतां तिने ती घटना राबविली याबद्दल त्यानीं तीव्रतेने नापसंति दर्शविली १९३७ मध्यें काँग्रेस मंत्रीमंडळे बनल्यानंतर मुसलमानांवर जो अन्याय जो जुलूम झालेला होता तो अद्याप मुस्लिम जनतेच्या स्मरणातून गेलेला नाहीं. ज्या राज्यसत्तेमध्यें मुसलमानांच्या हक्कांना व हितसंबधाला पुरेसे संरक्षण मिळतत नाहीं, ती राज्यसत्ता

मुस्लिमानां कुचकामाची वाटल्यास कांहींच नवल नाही. सांप्रत हिंदी मुसलमानांना फारच भयंकर दिव्यांतून जावे लागत आहे. ज्या हिंदुस्थानांकरितां वारंवार त्यांना आपल्या रक्ताचे पाट वाहावे लागले, त्या हिंदुस्थानांत त्यानां सुखा-समाधानानें व एकनिष्ठपणें जीवन कंठण्यासही अत्यंत वाताहात पडूं लागली आहे. मुसलमानांवर आक्रमण करून त्यानां कायमच्यां गुलामीच्या सदरांत ओढण्याकरितां मोठ मोठ्या पक्षांकडून अहर्निश प्रयत्न करण्यांत येत आहेत. एकीकडून त्यानां हिंदुस्थानातून चालते व्हा! असा इषारा देण्यांत येतो, तर दुसरीकडून मुसलमानाशीं मुकाबला करण्यां करितां नेपाळ नरेशांचे एकलाख सुसज्ज्य सैन्य तयार आहे असें सांगण्यांत येत आहे. या वरून सध्या हिंदी मुसलमानांना कसल्या परिस्थितीतून जावे लागत आहे याची परिपूर्ण कल्पना कोणासही आल्या सारखी आहे. सध्या हिंदुस्थानांत लोकशाही व समाजवादाचा जोरांत प्रसार होत आहे. अशावेळीं मुसलमानानींच तेवढें गुलामीत व दारिद्र्यांत कां राहवे! इतर जनतेप्रमाणें त्यानांही इच्छा, आकांक्षा आहेत. म्हणून इतर जमाती प्रमाणें त्यानांहि, योग्य रितीने वागविणे शहाणपणाचे ठरणार नाहीं काय?

इस्लामनें सर्व जगाला विश्वबंधुत्वाचा व समतेचा संदेश देऊन, गुलामी ही गोष्टच मुळीं त्याज्य ठरवलेली आहे. अर्थात सच्चा मुसलमान केव्हांही गुलामीत राहूं इच्छिणार नाहीं, तर उलट इस्लामच्या महान तत्वाप्रमाणें त्याला इतर जमातींशी सौजन्याने, प्रेमपूर्वक व बंधुभावानेंच रहावे लागणार आहे हें प्रत्येकानें निश्चित जाणावे. काँग्रेसने हिंदुमहासभेचे प्रतिगामी स्वरुपाचे अनुकरण करावयाला सुरवात केल्यापासून मुसलमानानां लीगचे महत्व पटूं लागले आहे व ते मोठ्या प्रमाणांत लीगच्या झेंड्याखालीं संघटीत होऊं लागले आहेत. खरोखर मुसलमानानां जर आपल्या उज्वल भवितव्याची निश्चितपणे अपेक्षा असेल, तर त्यांनीं लीगमध्यें सामील होऊन, मुसलमान जमातीची एकमेव राजकीय संस्था म्हणून लीगची शक्ति वाढविणें शहाणपणाचें ठरणार नाहीं काय? आज सर्व मुसलमान एकदिलानें प्रेरित होऊन लीगच्या झेंड्याखाली संघटीत होत आहेत हें मुस्लिम राष्ट्राचे सुभाग्यच म्हटलें पाहिजे.

# होमरूल लीगची चळवळ.

मिसेस ॲनीबेझंट व लो. टिळक यांच्याप्रमाणें कायदे आजम जिन्हानींही होमरूल लीगचे एक प्रमुख कार्यकर्ते म्हणून मान्यता मिळविलेली आहे. मिसेस ॲनीबेझंट बाईनीं १९१७ मध्यें होमरूल लीगची स्थापना केली.

" हिंदी जनतेवरील अन्यायांचा प्रतिकार करून त्यांच्यांत ऐक्य नि बंधुभाव निर्माण करणें व कोणत्याही विरोधास न जुमानता आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्याकरितां सतत झगडत राहाणें या सत्य पण राष्ट्रीय भूमिकेवर होमरूल लीगची प्रतिष्ठापना झालेली असल्यामुळें या लीगकडे का. आ. जिन्हांसारखे मोठमोठें राष्ट्रधूरीण आकर्षिले गेल्यास कांहींच नवल नाहीं.

लो. टिळकांच्या खांद्यास खांदा लावून का. आ. जिन्हांनीं होमरूल लीगच्या चळवळीची लाट सर्व देशभर पसरविली होती. परंतु याची झळ " साम्राज्यशाहीच्या तटबंदीस " लागल्यामुळें कीं काय सरकारनें कोणत्याहि आरोपाची दखलगिरी न घेतां मिसेस बेझंटबाई, लो. टिळक व इतर राष्ट्रीय पुरुष यानां स्थानबद्ध करून ठेवलें. अर्थात देशांत चोहींकडे खळवळ माजली जाऊन, जो तो सरकारचा निषेध करूं लागला.

का. आ. जिन्हा प्रथमच न्यायप्रीय व सत्याचे एकनिष्ठ सेवक असल्यामुळें त्यांनीं सरकारच्या या अन्यायी धोरणांबद्दल क्षणाचीही उसंत न घेतां होमरूल लीगची सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतली व सरकारच्या या अन्यायी धोरणाचा सर्वत्र-कडून निषेध करविला. आणि जनतेच्या आग्रहास्तव म्हणून त्यांना होमरूल लीगचे अध्यक्षपदही स्वीकारावे लागले.

बेझंटबाईच्या पश्चांत होमरूल लीगचे अध्यक्षपद का. आ. जिन्हांनीं स्वीकारल्यामुळें होमरूल लीगच्या चळवळीला पुन्हां जोरांत चालना मिळून, होमरूल लीगबरोबर कायदे आजम जिन्हांचेही नांव चोहींकडे चमकूं लागलें. या नंतर कायदे आजम जिन्हा यांनीं होमरूल लीगच्या पुढाऱ्यांच्या सुटकेकरितां जे अविश्रांत प्रयत्न केलेलें आहेत तें आम्ही कदापि विसरणें शक्य नाहीं.

## मुस्लिम लीग व कॉंग्रेसची संयुक्त सभा.

होमरूल लीगच्या स्थानबद्धांनां मुक्त करण्याबद्दल निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ करण्याचें बेत हिंदुस्थानांत यावेळीं सुरू होते. ऑल इंडिया मुस्लिम लीग व कॉंग्रेस या देशांतील प्रमुख पक्षांची एक संयुक्त सभा २८ जुलै १९१७ रोजीं भरली व पहिला ठराव पितामह दादाभाई नौरोजी यांच्या मृत्यू बद्दल

करण्यांत आला.शिवाय कायदे आजम जिन्हा, सी.पी.रामस्वामी अय्यर, सप्रु व सर वझीर हसन यांचे एक शिष्टमंडळही इंग्लंडला पाठविण्यांचे ठरले. निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीचाही विचार या सभेत करण्यांत आला. ठिकठिकाणच्या प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यानीं व मुस्लिम लीगच्या कौन्सिलनें या प्रश्नाचा विचार करावा व आपली मतें सहा आठवड्याच्या आंत कॉंग्रेस सेक्रेटरीकडे पाठवावी असें ठरलें.

एकोणीस सभासदांच्या अर्जामधील मुद्या संबंधानें लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं जे विचार प्रदर्शित केले होते त्याच्यावर एका पत्रकाद्वारें टीका करण्यांत आली व हिंदुस्थानांतील परिस्थिती निवळण्याकरितां पुढील उपाय करण्यांत यावें असें त्यांत सुचविण्यांत आलें.

( १ ) हिंदुस्थानला ब्रिटिश साम्राज्यातील एक स्वतंत्र घटक बनविण्यांत येईल असा अधिकृत जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत यावा. ( २ ) लीग व कॉंग्रेसनें केलेली सुधारणांची योजना ताबडतोब मंजूर करण्यांत यावी. (३) सरकारी अधिकाऱ्यानीं ज्या सूचना केल्या आहेत त्या जाहीर करण्यांत याव्या. ( ४ ) दडपशाहीचे धोरण रद्द करण्यांत यावे. अशा रीतीनें मुस्लिम लीग व कॉंग्रेसच्या एकदिली कार्याचा

परिणाम सरकारवर योग्य तोच होऊन, सरकारला त्यांच्या योग्य व रास्त गाऱ्हाण्यांकडे लक्ष पुरवावे लागले. आणि आपल्या परीणत कार्याला मूर्तस्वरूप येत असल्याचे पाहून हिंदी जनतेंत आनंदाचे व उत्साहाचें वातावरण निर्माण होऊं लागले. परंतु सात हजार मैलावरून आलेले, राजकारणी सरकारही कांहीं दुधखुळें नव्हतें, कीं ज्यामुळें मुस्लिम लीग व काँग्रेसच्या सहकाऱ्यानें देशांत फैलावलेले हिंदु–मुस्लिम जागृतीचे व ऐक्याचे मनोरम दृश्य पाहून गप्प बसूं शकेल ! या नंतर साम्राज्यवाद्यानीं हिंदु मुस्लिम ऐक्यांत कायमचे बिघाड उत्पन्न करण्यांकरितां वेळ प्रसंगीं फोडा आणि झोडा या नीतिचा अवलंब करून हिंदीं जनतेशी कसकसे राजकीय डाव खेळले, हे आपणांस पुढील प्रकरणांवरून दिसून येईलच.

## जिन्हांचा अंतर जातीय विवाह.

का. आ. जिन्हा यांचा विवाह मुंबईचे सुप्रसिद्ध पारशी धनिक सर दिनशा पेटिट यांच्या सुविद्य कन्या कुमारी रतनबाई पेटिट यांच्याशी १९१८ मध्यें इस्लाम धर्मानुसार झाला. विवाहप्रसंगीं जिन्हांच्या चेंबरमध्यें अगदीं साधेपणानें म्हणजे कोणताही अनावश्यक विधी न करतां चार चांदीची भांडी व एक काझी या साधन सामुग्रीवर मिसेस जिन्हा यांना इस्लामची दीक्षा देऊन उरकण्यांत आला.

एकंदरींत जिन्हांचा हा अंतरजातीय विवाह सर्व मुंबई शहरभर फारच गाजला गेल्यामुळें त्याची थोडी माहिती एथें देणें अत्यावश्यकतेचें झालें आहे.

एरवीं पारशी समाज सुधारलेला खरा, परंतु जिन्हांच्या या विवाह समारंभाची कर्णोपकर्णी बातमीं पसरतांच पारशी समाजांत एकदम खळबळ माजली जाऊन, हा अंतरजातीय विवाह न होण्याकरितां कित्येकानीं आटोकाट पयत्न करून विरोध दर्शविला. तर कांहींनी कायदे आजम जिन्हांनां खुनाच्या धमकीची पत्रेंही पण लिहिली. अशा नाजूक प्रसंगी यत्किंचितूही न डगमगतां जिन्हांनीं आपल्या विरुद्ध उद्भवलेले क्षणैक अशांततेचे वातावरण मोठ्या धिरोदात्तवृत्तीनें शांत केलें. व आपला कार्यभाग मोठ्या कौशल्यानें तडीस नेला. शेवटीं कट्टर मनातन्यांच्या जात्यंधतेची भूमीका घेणाऱ्या पारशी समाजाला अगदीं खेदपूर्वक विषाद वाटून गप्प बसावे लागले.

तरी पुढें हें विवाह प्रकरण हायकोर्टांत जाऊन, जिन्हांना त्याकरितां बराच त्रास सहन करावा लागला. परंतु 'हिंदु-मुस्लिम ऐक्याचे प्रतिनिधि 'अशी जिन्हांना पदवी देणाऱ्या देवी सरोजिनी नायडू व म. गांधी यांनीं या नवदांपत्याच्या मार्गातील

कायदेशीर अडचणी दूर करण्यासाठीं जी खाजगी मध्यस्ती करून, अत्यंत परिश्रमपूर्वक मदत केली आहे. तिचा मात्र एथें नामनिर्देश केल्याविना रहावत नाहीं.

पुढें सर्व कायदेशीर अडचणी दूर होऊन, मिसेस् जिन्हा आठ लाख रुपयासह आपल्या पतींच्या निवासस्थानीं येऊन राहिल्या. मिसेस जिन्हा या एक सुशिक्षित, सुसंस्कृत व अद्यावत् विचारसरणींच्या विदुषी असून, त्यांना राष्ट्र-कार्याची अत्यंत आवड आहे आणि खरोखर जिन्हांचें भाग्य थोर म्हणूनच त्यांना आपल्या योग्यतेप्रमणें सुशील, कर्तबगार व उच्च विचारसरणींच्या अशा एकनिष्ठ पत्नी लाभल्या.

पतींच्या प्रत्येक कार्याशीं एकरूप होऊन त्यांना चैतन्य व उत्साह देणाऱ्या मिसेस् जिन्हा आज जरी पैगंबर-वासी झालेल्या असल्या, तरी त्यांच्या राष्ट्रकार्याची मधुर स्मृति आजहि कायदेमिल्लत जिन्हांना उत्साहित व कर्तव्य-तत्पर बनवत असते यांत शंका नाहीं.

# मानपत्र व पीपल्स जिन्हा-हॉल.

आपल्या मातृभूमीच्या उज्वल स्वातंत्र्याकरितां निर्भीड पणें व निरपेक्ष बुद्धीनें झगडून आपल्या आत्माहुतीची यत्किंचितहि क्षिती न बाळगणाऱ्या अशा थोर देशभक्तांच्या मालिकेंत, कायदे आजम जिन्हांचे नांव गोवण्यांत येतें. त्यांची उत्कट महत्वाकांक्षा हींच होती कीं, आपल्या अज्ञ गरीब हिंदुमुस्लिम बांधवानीं आपापसांत बंधुभावानें राहून कोणत्याहि जमातीवर अतिक्रमण न करतां स्वतंत्र हिंदुस्थानांत स्वातंत्र्याचें जीवन निर्विघ्नपणें उपभोगावे, या सद्हेतु करितांच त्यांनीं आपल्या हजारो रुपयांच्या प्रॅक्टिसीची यत्किंचितहि पर्वा न बाळगतां आपल्या आयुष्यांतील महत्वाचा भाग देशसेवेकरितां खर्ची घातलेला आहे. जर त्यांनीं मनांत आणलें असतें तर उच्च दर्जाची अधिकारपदाची जागा व मोठ्याहून मोठी पदवी केव्हांच मिळविली असती. परंतु ते या क्षणैक नि कर्तव्यभ्रष्ट आमिषांच्या आहारी यासाठींच केव्हांहि जाऊं शकले नाहींत. आपल्या राष्ट्राचें हित तेंच आपलें हित व आपल्या देशाचें दुर्दैव तेंच आपलें दुर्दैव ह्मणून आपल्या मातृ-भूमीवर परकीय सत्तेकडून अतिक्रमण होण्याची वेळ आली असतां, प्रत्येक स्वातंत्र्यवादी हिंदी सुपुत्रानें आपल्या देशाकरितां कोणतेंहि दिव्य करण्यास मागें पुढें न पहातां उभे राहिलें

पाहिजे अशी त्यांची मतप्रणाली आहे. हिंदुस्थानचे राजप्रतिनिधी ना. व्हाईसरॉय लॉर्ड विलिंग्डन हे ज्या वेळीं मुंबई प्रांताचे गव्हर्नर होते. त्यावेळीं सर्व देशभर हिंदुमुसलमानांत स्वातंत्र्यचळवळीची प्रचंड लाट उसळलेली होती. शिवाय १९१६ सालीं लीग आणि कॉंग्रेस मधील झालेल्या लखनौच्या समेटामुळें तर हिंदु मुसलमानांतील स्वातंत्र्य–चळवळीच्या वातावरणानें अगदीं तीव्र स्वरूप धारण केलें होते.

यामुळें लॉर्ड विलिंग्डन साहेबांचें धाबे दणाणलें जाऊन त्यांना कांहीं एक सुचनासें झालें. लीग आणि कॉंग्रेसच्या चळवळीचे पडसाद म्हणून त्यांनीं स्वातंत्र्याच्या निनादाला दडपून टाकण्याकरितां आपल्या हस्तकांकरवी नाना तऱ्हेच्या कलहत्या लढवून लीग आणि कॉंग्रेसमध्यें फूट पाडण्याचा आटोकाट प्रयत्न करून पाहिला. तरीही त्यांना मुग गिळून गप्प बसावे लागल्यामुळें त्यांच्या क्रोधाग्नीनें जास्तच पेट घेतला व त्याचे पर्यवसान म्हणजे त्यांनीं आपल्या मदांध हुकूमतीच्या जोरावर भाक दडपशाहीचा अवलंब करून कित्येक देशभक्तांची अनन्वित प्रकारें मुस्कटदाबी सुरूं केली. लॉर्ड विलिंग्डन साहेबांच्या या अत्याचारी धोरणाचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. सर्व देशभर अशांतते बरोबर नव चैतन्याचेंहि वारें संचारू

लागलें व अत्याचारी धोरणाचे पडसाद म्हणून चळवळीच्या अग्नि स्फुलिंगानें चोहींकडे तीव्रतेनें पेट घेण्यास सुरवात केली. यामुळें लॉर्ड विलिंग्डन साहेबांचा प्रत्येक डाव हुकला जाऊन त्यांना शेवट पर्यंत " यशस्वी माघारच " घ्यावी लागली. आणि तेव्हां पासून हिंदी पुढाऱ्यांवर विशेषत:लोकमान्य टिळक, कायदे आजम मोहम्मद अली जिन्हा व श्रीमती ॲनीबेझंटबाई यांच्यावर त्यांची नेहमींच वक्र दृष्टी राहूं लागली.

१९१८ च्या जून महिन्यांच्या ११ त्या तारखेला राजनिष्ठेचा ठराव पास करून घेण्याची शक्कल, कांहीं ब्रिटिशांच्या देशभक्त हस्तकांकडून काढण्यांत येऊन, मुंबईच्या टाऊन हॉलमध्यें (**Bombay Town Hall**) एक प्रचंड जाहीर सभाहि भरविण्यांत आली होती. त्या प्रसंगी कायदे आजम जिन्हांनीं लॉर्ड विलिंग्डन यांच्याशीं दोन हात करून त्यांच्या कुटिल नीतीचा डाव हाणून पाडला. कायदे आजम जिन्हांची ही लढावूवृत्ती नि स्पष्टोक्ति पाहून सर्व जनता आश्चर्यानें अगदीं दिङ्मूढ होऊन गेली. आणि खरोखर या प्रसंगापासून जिन्हा ही काय चीज आहे हें सर्व जनतेला चांगल्या प्रकारें समजून आलें. राजनिष्ठेचा ठराव सुखासुखी पास होऊ न देतां एका उपसूचनेच्या द्वारा हिंदी आकांक्षांचें प्रतिबिंब या

ठरावांत मांडण्याचा, होमरूल लीगच्या कांहीं पुढाऱ्यांचा गुप्त बेत एका प्रसिद्ध सनातनी पगडी बहाद्दर कॉंग्रेस वाल्याच्या फितुरीमुळें गव्हर्मेंट हाऊसमध्यें कळला. व त्याप्रमाणें लॉर्ड विलिंग्डन यांचे भाषण बदलण्यांत येऊन, हिंदी पुढाऱ्यांच्या धोरणावर तो बेत ओळखून टीका करणारी ल्हानशीं दुरुस्तीही. या भाषणांत करण्यांत आल्याचें दिसते या टीकेला उत्तर देण्यास लो. टिळक उभे राहिलें. परंतु त्यांचा जाणून बुजून उपमर्द करण्यांत आल्यामुळें ते सभेंतून निघून गेले. त्यांच्या इतर अनुयायांनीहि त्यांचेच अनुकरण केलें. तथापि कायदे आजम जिन्हांनीं मात्र आपल्या मुत्सद्दी बाण्यास अनुसरून गोंगाट व विरोध यानां भीक न घालतां मागें राहून, विलिंग्डन साहेबांच्या भाषणांत आपल्या हिंदी पुढाऱ्यांवर केलेल्या टीकेचा जाब विचारला. भाषणांतील दुरुस्तीची कल्पना नसल्यामुळें, आक्षिप्त भाग दाखवून देण्याचे लॉर्ड विलिंग्डन यांनीं आव्हान देतांच कायदे मिल्लत मोहम्मद अली जिन्हांनीं तावडतोब तो प्यारा वाचून दाखवून लॉर्ड विलिंग्डन यांना अगदीं निरूत्तर करून सोडले. या प्रसंगापासून कायदे आजम जिन्हा विलक्षण लोकप्रिय झाले आणि त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांवरहि त्यांचा विलक्षण दरारा बसला.

चार चांदीच्या तुकड्यांना भाळणाऱ्या कांहीं स्वार्थ-लोलुप व पळपुऱ्या स्वातंत्र्यवीरांप्रमाणें अराष्ट्रीय न ध्येयभ्रष्ट न होतां, कोणत्याहि आणीबाणीच्या प्रसंगीं न डगमगतां सत्याचें निशाण घेऊन, असत्याचें निर्मूलन करण्याकरितां प्रतिस्पर्ध्यांना पेचांत पकडून त्यांची त्रेधा तिरपीट उडवून देण्याची निर्भय वृत्ति कायदे आजम जिन्हांच्या रोमरोमांत भिनलेली आहे. हें यावरून चांगल्या प्रकारे दिसून येते.

या प्रसंगानंतर पांचच महिन्यांनीं म्हणजे नोव्हेंबर १९१८ मध्यें जिन्हांच्या आयुष्यांत एक क्रांतिकारक नि त्यांच्या निर्भीडतेच्या कसोटीची व ब्रिटिश मुत्सद्यांच्या कुटिल नीतीचा परिस्फोट करणारा प्रसंग घडून आला; ज्यामुळें कायदे आजम जिन्हांचें नांव हिंदुस्तानच्या इतिहासांत सुवर्णाक्षरानीं लिहिलें गेलें आहे. लॉर्ड विलिंग्डन यांची मुदत संपताच ते जावयास निघाले, तेव्हां त्यांच्या कांहीं चहात्या-कडून त्यांना पुन्हां मानपत्र देण्याकरितां मुंबई टाऊन हॉलमध्यें एक प्रचंड सभा बोलावण्यांत आली होती. टाऊन हॉल श्रोत्यानीं अगदीं फुलून गेलेला असल्यामुळें चोहोंकडे कडेकोट बंदोबस्त ठेवण्याचीहि व्यवस्था करण्यांत आली होती. परंतु सभेचें काम काज चालू होतांच " नदींत राहून सुसरीशीं वैर "

या न्यायानें कायदे आजम मोहमद अली जिन्हा यांनीं पुन्हां एकदां लॉर्ड विलिंग्डन यांना मानपत्र देण्याच्या योजनेस आपले प्राण धोक्यांत घालूनहि तीव्रतेनें विरोध केला. व सभागृहांत जमलेल्या जनतेकडून मानपत्र देण्याच्या योजनेस विरोध करून, त्यांच्या कडून मानपत्राविरुद्ध रेज्युलेशन पास करून घेतले. यामुळें सर्व सभागृहांत मानपत्रास प्रतिकूल व अनुकूल या शद्बानीं गोंगाट माजला जाऊन सर्व सभेंत खळबळ नि आरडा ओरडीनें प्रक्षुब्धता फैलावली गेली. आणि ही संधी साधूनच आपल्या मनांतील उद्दे काढण्याकरितां ह्मणून, विलिंग्डन साहेबांकरवीं कायदे आजम जिन्हांच्यावर कांहीं भाडोत्री गुंडांनीं अमानुषपणें हल्ला करून, त्यांना बेशुद्ध केलें. परंतु आपल्या मातृभूमीचे व आह्मां हिंदवासियांचे नशीब बलवत्तर ह्मणून वेळींच प्रसंगावधान राखून यांच्या मित्रांनीं त्यांना योग्य स्थळीं पोहोंचते केलें. यामुळें जिवावरच्या नाजूक अशा प्रसंगांतूनहि ते बचावले जाऊन मात्रभूमीची पुनरपी सेवा करण्यास त्यांना सुसंधीच नव्हे तर मातृभूमीच्या नितांत प्रेमाची त्यानां खरी खुरी स्फूर्ति मिळाली.

शेवटीं सभेंतील सर्व लोकांची पांगापांग झाल्यामुळें लॉर्ड विलिंग्डन साहेबांच्या चहात्याकडूनहि मानपत्र देण्याचें

तसेंच राहिलें गेलें. लॉर्ड विलिंग्डन साहेबांनाहि पण हा स्वतःचा झालेला पराभव मान्य करावा लागून त्यांना कबूल करणें भाग पडलें कीं, हिंदुस्थानांत जोंपर्यंत कायदे आजम जिन्हांमारखे कट्टे देशभक्त हयात आहेत, तो पर्यंत तरी आपल्या साम्राज्यवादी कुटिल कारवायांचा कांहींहि उपयोग होणार नाहीं. या घडलेल्या विलक्षण प्रकरणापासून जिकडे तिकडे जिन्हांच्या नांवाचा जयघोष होऊं लागला. आणि त्यांची लोकप्रियता अत्यंत पराकोटीस पोहोंचली गेली. यावरून जिन्हांची लोकप्रियता केवळ त्यांच्या निर्भीडपणामुळें नि त्यांच्या बेडरवृत्तीमुळें झालेली दिसून न येतां. त्यांच्या अंगीं बाणलेल्या सच्चेपणामुळें नि निष्काम लोकसेवेमुळे झालेली आहे. हें आतां सर्वांना दिसून आलेंच आहे.

ज्या प्रमाणें दगडाचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाहीं. त्या प्रमाणें आपल्या देशभक्तीची खडतर तपश्चर्या करून जनतेचा पूर्णपणें विश्वास संपादन केल्याखेरीज, कोणतीही व्यक्ति आदर्शवत् नि पुढारीपणाच्या योग्यतेस चढू शकत नाहीं. सदर प्रसंगीं कायदे आजम जिन्हा आपल्या देशभक्तीच्या तपश्चर्येंत शंभर टक्के तावून सुलाखून निघाल्यानें व जनतेच्या विश्वासास पात्र झाल्यानें सूज्ञ जनता त्यांच्यावरील आपलें प्रेम व्यक्त करण्यास वेळ कां दवडील ?

## जिन्हा–हॉल.

मुंबईच्या नागरिकानीं आपला " जिन्हांच्या " वरील विश्वास प्रगट करण्याकरितां ह्मणून तावडतोब फंड गोळा करून जिन्हांच्या खऱ्या देशभक्तीचें व शौर्याचें स्मारक ह्मणून जिन्हा-हॉल उभारण्याचें जाहीर केले. फंड उभारल्यानंतर जवळ जवळ दहा आकरा वर्षांच्या शेवटीं ह्मणजे १९३१ सालीं जिन्हा-हॉल बांधून पूर्ण झाला. जिन्हा हॉलच्या दरवाज्यावर खालील अर्थाचे वाक्य कोरलेले आहे. " हिंद-भूचे एक सुपुत्र या नात्यानें, ज्यांनी आपले प्राणहि धोक्यांत घालून, आपल्या देशभक्ती बरोबर आपल्या मातृभूमीचेंहि नांव उज्वल केलें. अशा मोहम्मद अली जिन्हांच्या देशभक्तीचें खरें प्रतीक म्हणून हा जिन्हा-हॉल उभारण्यांत येत आहे."

जिन्हा हॉलचा ओपनिंग समारंभ देवी सरोजिनी नायडू यांच्या हस्ते झाला. त्यावेळीं सरोजिनी नायडू यांनीं जिन्हांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल व प्रखर देशभक्तीबद्दल साभिमान पूर्वक आपल्या अध्यक्षीय भाषणांत जे धन्योद्गार काढलेले आहेत. तें खरोखर मननीय व चिंतनीय असेंच आहेत. त्यांच्या भाषणांचा थोडासा सारांश येथें देत आहोंत त्यावरून जिन्हांच्या सत्य नि आदर्श मनोभूमिके विषयीं कांहीं अपमत-

लवी व कारस्थानीं देशभक्तांकडून जो विपर्यस्त अर्थ करण्यांत येत आहे तो किती असंमजसपणाचा व स्वार्थमूलक आहे हें यांवरून दिसून येईल.

## देवी सरोजिनी नायडू यांचे भाषण.

' बंधूनो, आज मोहम्मद अली जिन्हासारख्या एका थोर देशभक्ताच्या स्मारकाचा उद्घाटन समारंभ माझ्या हस्तें होत आहे हें पाहून मला अत्यंत समाधान वाटत आहे. माझ्या आयुष्यांतील आजचा हा अविस्मरणीय प्रसंग मी कदापि विसरणें शक्य नाहीं. इतकेंच नव्हें तर आज मला माझ्या सर्व देशसेवेच्या इच्छा, आकांक्षा पूर्णत्वास पोहोंचल्याचें निश्चितपूर्वक समाधान वाटत आहे. माझ्या कांहीं बांधवांनीं आजच्या या उद्घाटनसमारंभाच्या प्रसंगीं अध्यक्ष-पदावर एकनिष्ठपणें माझी निवड करून मला उपकृत केलें आहे याबद्दल प्रथम मी त्यांचें अंतःकरणपूर्वक आभार मानते. खरोखर जिन्हा हे एक कर्तबगार असामान्य राष्ट्रीय पुढारी असून, हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थ त्यांनीं मोठमोठ्या जबाबदारीच्या कामगिऱ्या मोठ्या कौशल्यानें यशस्वी करून दाखविल्या आहेत. देशसेवा व जनसेवा हेंच प्रधान तत्त्व दृष्टिसमोर ठेवून त्यांनीं आपल्या निस्वार्थप्रणित कर्तव्य तत्पर-

तेनें अल्पावधींतच जनतेमध्यें जी पराकोटीची लोकप्रियता संपादन केलेली आहे ती निसंशय प्रशंसनीय व विचारार्ह आहे. त्यांची जळजळीत देशभक्ती निष्काम लोकसेवेची आत्यंतिक तळमळ व प्रगतिपर उच्च विचारसरणीचें प्रतिक असें सुंदर वक्तव्य वगैरेंचे समानतेच्या भूमिकेवरून परिशीलन केलें असतां कोणाहि खऱ्या देशभक्ताला त्यांच्या या आदर्शवत् उच्च राष्ट्रीयत्वाला प्रामाणिकपणें कां होईना मान्यता द्यावीच लागेल अशी माझी खात्री आहे.

देश हिताच्या दृष्टीनें हिंदू मुसलमानांच्या ऐक्याप्रीत्यर्थ वेळोवेळीं त्यांनीं जे अहर्निश परिश्रमपूर्वक प्रयत्न केलेले आहेत ते खरोखर अपूर्व व स्तुत्य असेंच आहेत. आपल्या सर्वांच्या दृष्टीनें कायदे आजम जिन्हा हे एक उत्कृष्ट कायदे पंडीत नमुनेदार मार्गदर्शक व कट्टे देशभक्त म्हणून सुप्रसिद्ध आहेतच. शिवाय " हिंदू मुसलमान ऐक्याचे एकनिष्ठ प्रतिनिधि " म्हणूनहि ते नांवारूपास आलेले आहेत हें आपण विसरतां कामा नये.

तल्लख बुद्धि व अचूक निर्णय देण्याची असामान्य न्यायप्रियता व एक निष्ठावंत राष्ट्रसेवक तसेंच राजकारणांतील एक निर्भीड वृत्तीचे व मुत्सद्दीबाण्याचे राष्ट्रधूरीण म्हणूनहि

त्यांची बहुजन समाजास ओळख आहे. त्यांच्या या परस्पर विरोधी गुणवैशिष्ठ्यामुळें ते जितके लोकप्रिय झालेले आहेत तितकेच त्यांचा वाढत असलेला लौकिक न पाहवल्यामुळें त्यांना कांहीं विघ्नसंतोषी असे हितशत्रुहि निर्माण झालेले आहेत हेंहि पण तितकें खरें आहे. परंतु राजकारणांतील त्यांचे हे हितशत्रु त्यांच्या उज्वल मार्गांतील जरी कांटेरी कुंपण होऊन बसले असले तरी त्यांच्याकडून या विरोधकांना यत्किंचितहि महत्व दिलें जात नाहीं तर त्यांचें प्रत्येक कार्य निर्विघ्नपणें यशस्वी होत असतेंच कारण सत्याचा नेहमीं विजय असतो. आणि मोहम्मद अली जिन्हांतर आपल्या राष्ट्राच्या पवित्र कार्याकारितां निस्वार्थ बुद्धीनें प्रेरित होऊन " सन्मार्गाचें प्रवर्तक ह्मणून " सत्याचें निशाण घेऊन सतत झगडत राहणारे एक लढवय्ये सेनानी आहेत यांत शंका नाहीं.

या अलौकिक पण निस्वार्थ गुणवैशिठ्यामुळेंच आज त्यांच्या देशभक्तीचें भव्य पण जिवंत स्मारक उभारलें जात आहे ही गोष्ट प्रत्येक हिंदवासियांना साभिमानपूर्वक इभ्रतीची वाटल्याशिवाय राहणार नाहीं असें मला वाटतें. शेवटीं मी कायदे आजम जिन्हांचे अंत:करणपूर्वक अभिष्टचिंतून जिन्हा हॉल उघडल्याचें जाहीर करते. " या वरून आपणास काय दिसते?

निष्क्रीय देशभक्तीची झूल परिधान करून समाजाच्या अंतर्भागांत साव म्हणून वावरणाऱ्या आपल्या विघ्नसंतोषी टीकाकारानां जिन्हांनीं तितक्यांच जोरानें व कृतीनें प्रत्युत्तर दिलें आहे हें सिद्ध होत नाहीं काय ?

ज्या प्रमाणें म्हातारीनें कोंबडी झाकण्याचा कितीहि हास्यास्पद प्रयत्न, केला तरी सूर्य उगवण्याचा थांबत नाहीं. त्याप्रमाणें एक मुसलमान म्हणून जिन्हांच्या जात्यंध टीकाकारानीं व स्वतःस पुरोगामी समजणाऱ्या अद्यावत लेखकांनीं जिन्हांच्या सत्य आयुष्यावर पडदा घालून, त्यांच्या विषयीं जनतेंत गैरसमज पसरविण्याचा कितीही कारस्थानी प्रयत्न केला असला तरी जिन्हांचे महत्व कमी न होता उलट त्यांचे सत्य चारित्र्य पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें तळपतच रहाणार आहे. हें जिन्हांच्या टीकाकारानीं निश्चित जाणावें. आज जिन्हा मुस्लिम संघटनेचे व मुस्लिम हिंदुस्थानचे एकमेव नेते म्हणून वावरत आहेत, पण जिन्हांची ही लोकप्रियता त्यांच्या हितशत्रुनां पाहवत नाहीं म्हणूनच ते त्यांच्यावर टीका करण्यास उद्युक्त होतात पण विचारी चष्म्यातून पाहिले असतां त्यांची ही टीका गैरवाजवी व हास्यास्पदच ठरत नाहीं काय ?

## " राजकारण व समाजकारण "

पहिल्यापासूनच का.आ. जिन्हांचा, राजकारण व समाजकारण या कडे विशेष ओढा असल्यानें राजकारणांत प्रवेश करण्यांपूर्वी त्यांनीं वेळोंवेळीं महर्षि दादाभाई नौरोजी, ना. गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी दे. भ. चित्तरंजनदास या सारख्या राजकारणानिपुण व अनुभविक राष्ट्रधुरीणांच्या सहवासांत राहून, आपला राजकीय शिक्षणक्रम पूर्ण केलेला आहे. या राष्ट्र नेत्यांच्याबद्दल त्यांच्यामनांत प्रथम पासूनच आत्यंतिक प्रेम नि आदर वसत असल्यामुळें ते त्यांना आपल्या गुरूंच्या ठिकांणीं मानत व त्यांच्या अलौकिक गुणांचा योग्य तोच फायदा करून घेत. आज आह्मां हिंदवासियांचें भाग्यथोर ह्मणूनच जिन्हांना उपरिनिर्दिष्ट राष्ट्रगुरु लाभले.

ना. गोखले यांच्या विषयीं बोलतानां एकदां त्यांनीं ह्मटलें कीं " **It is my ambition to became The Muslim Gokhale**" मी मुस्लिम गोखले बनावें हीच माझी महत्त्वाकांक्षा आहे.

या नंतर आपल्या राजकारणा विषयीं बोलतांना त्यांनीं सांगितलें कीं, " राजकारणाच्या बाबतींत मी माझा पहिला धडा सुरेन्द्रनाथ बॅनर्जी यांच्याकडे शिकलों हे सांगण्यांस

मला यत्किंचितहि संकोच वाटत नाहीं.मी त्यांना मित्र या नात्याने भेटलों व आतां त्यांना एक आदर्श पुढारी या नात्यानें मानतों. या वेळीं हिंदुस्थानांतील मोटमोठ्या पक्षावर त्यांचे अप्रतिम असें वजन आहे; ज्यांच्या बरोबर मीं कित्येक वर्षें देशकार्य केलें आहे ते देशभक्त चित्तरंजनदास यांच्याशीं जोपर्यंत विशेष मित्रत्वाचें नातें आहे तों पर्यंत ते ( सुरेंद्रनाथ ) माझे मित्रच राहतील. या क्षणीं असें म्हणणे चुकीचे होणार नाहीं कीं, या दोन्ही पुढाऱ्यांबद्दल हिंदु समाजाबरोबर मुसलमान समाजांतहि पराकोटीचा आपलेपणा दिसून येतो. खरोखर या दोन व्यक्ति हिंदु-मुसलमानांचे पुढारी बनण्यांस निःसंशय पात्र आहेत. या वरून कायदे आजम जिन्हांचे मुसलमानेतर पुढाऱ्यांच्या बद्दल काय मत आहे व ते त्यांना किती आपुलकीच्या दृष्टीनें पहात हें दिसून येणार आहे.

देश हिताच्या दृष्टीनें सर्व जमातींत ऐक्य नि बंधु-भाव निर्माण होणें अत्यावश्यकतेचे वाटल्यावरून. सर्व जमातींत ऐक्य निर्माण करण्याकरितां त्यांनीं स्वखर्चानें ठिकठिकाणीं दौरे काढून, अविश्रांत प्रयत्न केलेले आहेत व अद्यापहि करीत आहेत.

शैक्षणिक, औद्योगिक, राजकीय व आर्थिक बाबतींत मुसलमान जनतेची खुंटलेली प्रगति पाहून, कौन्सिल असेंब्लीच्या

ठिकाणीं जरी त्यांनीं वेळोंवेळीं मुसल्मान जमातीची तरफदारी केलेली असली तरी आपल्या समतोल न्यायदानानुसार पक्षपात न करतां हिंदूच्या न्याय हक्काकडे यत्किंचितही दुर्लक्ष केलेलें नाहीं.

जो पर्यंत कॉंग्रेसने मुसल्मानाशी सावत्र आईच्या नात्यानें वागणूक ठेवलेली नव्हती व तिचें राजकारण शुद्ध नैतिक पायावर आधारलेलें होतें तों पर्यंत तरी जिन्हांना मुसल्मानांच्या बाबतींत " स्वतंत्र मतदार संघाची " गरज भासली नव्हती व त्यांनी प्रत्येक वेळेस संयुक्त मतदार संघाचाच पुरस्कार केला होता. परंतु महासभिष्टांच्या गुप्तचरानीं कॉंग्रेसमध्यें प्रवेश मिळवून आपल्या प्रतिगामी स्वरूपाचें राजकारण सुरूं करतांच दैवगतीनें कां होईनां कॉंग्रेसला आपल्या ध्येया पासून परावृत्त व्हावें लागलें. अर्थात् जिन्हांनाहि स्वतंत्र मतदार संघाचा पुरस्कार करावा लागून, त्यांना मुसल्मानांच्या न्याय हक्कांचें संरक्षण करणें भाग पडले.

दामने दीन हाथसे छोडा तो जमीयत कहां ।
और जमीयत होई रूखसत तो मिल्लतभी गई ॥

अर्थः—धर्माचा त्याग केल्या नंतर ऐक्य कोठून प्राप्त होणार, आणि ऐक्य नाहिंसे झाल्यावर तर संघटनाहि आपोआपच नाहिशी होते.

या तत्वानुसार जिन्हा कॉंग्रेस, होमरूललीग, नॅशनॅलिस्टपार्टी, स्वतंत्रपक्ष व मु.लीग या पक्षाच्या कार्यक्षेत्रांत निरनिराळ्यावेळीं सामील होऊन, त्यांनीं त्या त्या पक्षांच्या राजकारणाचा कायदे मंडळांत पुरस्कार केला. ज्या राजकीय पक्षांशीं आपलीं मतें जुळलीं, त्या पक्षाला कार्यक्षम बनवावयाचें या बाण्यानें गेल्या ३२ वर्षांत मध्यवर्ति कायदेमंडळांत जिन्हांनीं आपल्या उच्च राष्ट्रीयत्वाला अनुसरून देशकार्य केलें आहे. होमरूल लीगच्या चळवळींत बॅ. जिन्हा मिसेस बेझंट बाईच्या होमरूल पक्षाला मिळाले व त्या पक्षाचे अध्यक्ष झालें. असहकार समंत नसल्यानें त्यांनीं असहकारितेला विरोध केला; पण असहकारितेची चळवळ मागें घेण्यांत आल्यानंतर कॉंग्रेसभक्त मुसलमानांनीं पुन्हा ब्रिटीश सरकारच्या मोहजालांत फसून माघार घेण्याचें धोरण स्वीकारलें तें धोरण जिन्हांना मानवलें नाहीं गया-कॉंग्रेसनंतर कायदेमंडळांत सरकारला संघटित विरोध करण्यासाठीं निघालेल्या दासबाबूंच्या स्वराज्य पक्षानें आपलें कार्यक्षेत्र व्यापक करून कॉंग्रेस बाहेरील स्वतंत्रवृत्तीच्या पुढाऱ्यांचा या पक्षांत समावेश करून घ्यावा ह्मणून, मुंबईला जे प्रयत्न करण्यांत आले त्यांत जिन्हांनीं प्रामुख्यानें भाग घेतला;

पण हा प्रयत्न फसल्यामुळें १९२६ सालीं जिन्हांनीं नॅशनॅलिस्टपार्टीची स्थापना केली, पुढें या पक्षांतर्फे निवडणुका

लढविण्यांत आल्या. त्या वेळीं जिन्हांनीं मुसलमान समाजाची करण्यांत येत असलेली गळचेपी पाहून, स्वतंत्र मतदार संघाचा पुरस्कार केल्यानें त्यांना जात्यंध ठरवून, त्यांचा पाणउतारा करण्याचा डाव स्वराज्य पक्षांतील कांहीं ज्ञातिनिष्ठ लोकांनीं टाकला, पण हा डाव स्वराज्य पक्षियांच्याच अंगावर उलटवून जिन्हांनीं नॅशनॅलिस्ट पक्षांतील सभासदांना ज्ञातीय धोरणांवर स्वातंत्र्य देऊन असेंब्लीतील मुसलमान सभासदांचा स्वतंत्र पक्ष स्थापन केला व मुसलमान सभासदांप्रमाणें इतर हिंदु सभासदांचाहि त्यांत समावेश करून विघ्नसंतोषी प्रतिस्पर्ध्यांना फजीत केले, ज्ञातिविषयक धोरणापुरतें वैयक्तिक स्वातंत्र्य देऊन इतर राष्ट्रीय प्रश्नावर एकवाक्यता व संघटना करण्यासाठीं जिन्हांनीं स्वीकारलेलें हें धोरण जेवढें सहिष्णु होते. तेवढेंच तें मुत्सद्दीगिरीचेहि होतें.

नॅशनॅलिस्टपार्टी स्थापन केल्यानंतर जिन्हांनीं हिंदुस्थानाला संपूर्ण स्वयंशासित वसाहतींचें स्वराज्य देण्याबाबत अत्यंत तेजस्वीपणें भाषण करून पंडित मोतीलाल नेहरू यानां पाठिंबा दिला.सर मुडिमन यांच्या अध्यक्षतेखालीं जी रिफार्म्स इन्क्वायरी कमिटी नेमण्यांत आली होती, त्या कमिटीमध्यें कायदे आजम जिन्हा होते. द्विदल राज्यपद्धति अयशस्वी व निराशजनक वाटल्यावरून ती बंद करण्यांत यावी असें त्यांनीं स्पष्ट मत दिले, सर तेज बहादूर सप्रू. सर शिवस्वामी

अय्यर व डॉक्टर परांजपे यानीं त्यांना दुजोरा दिला.

स्वतंत्र मतदार संघाच्या बाबतींत बहुसंख्य मुसलमानेतरांच्या इच्छेविरुद्ध घडलें असलें तरी त्याचा फायदा जिन्हांनीं साम्राज्यशाहीच्या हस्तकांना घेउं दिला नाहीं. हें सायमन कमिशन वरील बहिष्काराच्या वेळीं मु. लीगमध्यें फूट पाडण्याची पाळी येउं देऊनहि, जिन्हांनीं आपले मतभेद विसरून कट्टर जात्यंधाना जो विरोध केला त्यावरून दिसून येईल.

ऑल इंडिया मुस्लिम कॉन्फरन्स भरवून सायमन कमिशनला विरोध नाहीं असा देखावा निर्माण करण्याचा प्रयत्न ना० आगाखान व सर इब्राहिम रहिमतुल्ला यांनीं केला. पण लाहोर व कलकत्ता येथें दोन प्रतिस्पर्धि मु. लीग निर्माण झाल्याचें दाखवून केवळ देशहिताकरितां म्हणून, या मुसलमान पुढाऱ्यांच्या प्रतिष्ठेखालीं सुरुंग लावण्यासहि जिन्हांनीं कमी केलें नाहीं.

ना. गव्हर्नरांकडून अश्वासनें मागण्याच्या सर्वस्वी बालिश मुद्यावर मंत्रिमंडळ बनविण्याचे कॉंग्रेसनें नाकारले असतां, मुंबईत राज्यकारभार हातीं घेण्यासाठीं उत्सुक असलेल्या आपल्या अनुयायांशीं चार तास युक्तिवाद करून, त्यांच्याकडून ना. गव्हर्नरांना नकार देउं लावण्यांत स्वातंत्र्य वादी जिन्हांनीं आपलें राष्ट्रीयत्व व राष्ट्रीयत्वाचा लौकिक निष्कलंक राखण्याचें धोरणच स्वतःपुढें ठेवलें होतें.

# ऐक्याचे अपूर्व दृश्य व शुद्धि संघटन.

युद्ध समाप्त झालें, ब्रिटिशांना विजय मिळाला, आतां सरकारकडून संपूर्ण जबाबदारी राज्यपद्धतीच्या दिलेल्या अश्वासनांची परिणति होऊन आपणांस आपलें पुनश्च स्वातंत्र्य प्राप्त होणार, या आशेनें सर्व हिंदी जनताहि आनंदित झालेली दिसत होती. परंतु काय ? सरकार कडून हिंदी लोकांना कसलें स्वातंत्र्य देण्यांत आलें जे स्वातंत्र्य त्यांना पूर्वी होतें. तेहि सरकार कडून हिरावून घेण्यांत येऊन रौलेट बिलरूपी "काळा कायदा" पास करण्यांत आला. या बिलाची अंमल बजावणी करण्याकरितां ह्मणून सरकारनें दडपशाहीचें धोरण स्वीकारून निर्दोषी लोकांना जबरदस्तीनें कारावासांत डांबण्यास आरंभ केला. हिंदी लोकांवर निरनिराळें खोटे आरोप ठेवून त्यांना अनान्वित प्रकारें छळण्यांत आलें. सुधारणेच्या बावतींत मुसलमानांचीहि प्रतारणा करून. जालियनवाला

बागेंत निर्दयपणें गोळीबार करण्यांत आला. अर्थात यावेळीं हिंदुमुसलमानांना कळून चुकलें कीं, सरकारनें आज पावेतों जबाबदार राज्यपद्धतीचीं जितकीं अश्वासनें दिलीं तितकीं बव्हंशी निरर्थक अशीच होतीं.

अशा तऱ्हेनें सरकारकडून काम चलावूं राजकारणाचा अवलंब होत असतां, कोणता स्वाभिमानी हिंदी मनुष्य या कृत्याचा निषेध व प्रतिकार करणार नाहीं. अर्थात जिन्हानींहि "रौलेट ॲक्टाचा" निषेध करण्यांसाठीं " सध्यांच्या परिस्थितींत कौन्सिलमध्यें राहून, जनतेची माझ्याकडून कांहीं एक सेवा घडणार नाहीं असें मला वाटतें. कारण कौन्सिल मधील जनतेच्या प्रतिनिधींच्या मतांची व कौन्सिल बाहेरील जनतेच्या इच्छाआकांक्षांची ज्या सरकारकडून धडधडीत उपेक्षा करण्यांत येते; त्या सरकारशीं स्वाभिमान राखून सहकार्य करणें हें मला केव्हांहि शक्य होणार नाहीं, " अशा सडेतोड शब्दांचे पत्र हिंदुस्थानचे व्हॉईसराय लॉर्ड चेम्सफर्ड यांच्याकडे पाठवून त्यांनीं इंपिरियल कौन्सिलचा राजिनामा दिला.

सरकारची ही कारवाई ब्रिटिशांच्या राजनैतिक परंपरेला अनुसरून होती; ह्मणूनच त्यावेळेस हिंदी जनतेचे पूर्णपणें डोळे उघडले गेले व देशांत हिंदु–मुस्लिम ऐक्याची एकच

जबरदस्त लाट उसळली गेली. आणि सर्वत्र ‘ No Swaraj without Hindu Muslim unity’ या वाक्यांचें निनाद वातावरणांत दुमदुमू लागले. हिंदुमुसलमानांच्या ऐक्याच्या या अपूर्व दृश्यानें सरकारला असह्य अशा वेदना होऊ लागल्या व हिंदु मुसलमानांत कायमचे बिघाड उत्पन्न करण्याकरितां म्हणून सरकारकडून जारीचे प्रयत्न सुरू झाले. परंतु तें सर्व निष्फळ ठरलें जाऊन उत्तरोत्तर. हिंदु-मुस्लिम ऐक्यांत अभूतपूर्व अशी वाढच होत गेली. ती इतकीं कीं, दिल्लींत मुसलमानांनीं ‘ जामे मशिदीच्या मेंबरवर स्वामी श्रद्धानंदासारख्या एका कट्टर सनातनी हिंदूस उभे करून ’ हिंदु-मुस्लिम ऐक्याचें भाषण करविलें. अमृतसर मधील मुसल्मान, रामनवमीच्या सणांत सामील झाले, व पंजाबमधील हिंदु—मुसलमानांनीं आपलें मतभेद विसरून अंत:करणपूर्वक एकमेकांस दृढ आलिंगन दिलें इतकेंच नव्हे तर प्रेमाचें प्रतिक म्हणून एकमेकांनीं एकमेकांचें उष्टे पाणी सुद्धां प्यावयास कमी केले नाहीं. अशा तऱ्हेची उच्च राष्ट्रीय स्वरूपाची संघटना देशांत जोरानें फोफावत असतां, ब्रिटिश सरकारहि कांहीं सुखासुखी गप्प बसले होते. अशातला मुळींच भाग नाहीं. तर जेणे करून हिंदु-मुस्लिम ऐक्यांत बिघाड उत्पन्न करून त्यांच्यात आपापसांत कलह माजतील अशा

प्रकारच्या योजना सरकारकडून सतत चालू होत्या. आणि याचे प्रत्यंतर म्हणून शुद्धि संघटन चळवळीचा प्रामुख्यानें नामनिर्देश करण्यांत येतो. *

मु. लीग व काँग्रेसची संयुक्त बेठक व लीगचें चौदावें अधिवेशन डिसेंबर १९२१ मध्यें अहमदाबादेस मौ. फजलुल-हसन हसरत मोहानी यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आले होते संयुक्त बैठक या नात्यानें काँग्रेसच्या बरोबर झालेली ही बैठक सातवी पण शेवटचीच अशी ठरली. या अधिवेशनास काँग्रेसच्या

---

* शुद्धि नि संघटन या दोन निरनिराळ्या बाबी आहेत. हिंदुस्थानात कांहीं मुसलमान असे आहेत कीं, ते आपल्याला मुसल-मान ह्मणवितात परंतु आचार हिंदुंचेच आचरीतात. अशा मुसलमानानां शुद्ध करून हिंदू करणे, त्याच प्रमाणें कांही ख्रिस्ती आहेत, त्यानां शुद्ध करून हिंदू (आर्य) बनविणें यास शुध्दि ह्मणतात. व संघटन ह्मणजे हिंदूंच्या स्पृश्य अस्पृश्य सर्व समाजास एकत्र करणें यांस संघटना म्हणतात. शुद्धीचे कार्य आर्य समाजी यानी सुरूं केले. व ते प्रथमतः दिल्लीच्या आजुबाजूस मलकाना म्हणून संबोधिल्या जाणाऱ्या परंतु मुस्लिम म्हणविणाऱ्या लोकांत सुरूं करण्यांत येऊन, लांचलुचपत धाक दडपशाही अशा अनेक क्लृप्त्यानीं त्यानां हजारोनी शुद्ध केले परंतु सुदैवानें हीं बातमी मुस्लिम तबलीग संस्थांस लागताच त्यांनी ( विशेषतः जमाते अहमदीया ) वगैरे संस्थानीं त्यानां पुनश्च मुस्लिम बनविलें.

जबाबदार लोकांपैकीं म. गांधी, विजय राघवाचार्य, वल्लभभाई पटेल, हकीम अजमलखां, डॉ. अन्सारी इत्यादी प्रतिष्ठित मंडळी हजर होती. हिंदु-मुस्लिम ऐक्याच्या दृष्टीनें हें अधिवेशन अत्यंत यशस्वी व अविस्मरणीय असें ठरलेलें आहे. यामुळें बिचकून जाऊन सरकारला आपला पवित्रा बदलावा लागला व हिंदु-मुसलमानांत पद्धतशीर फूट पाडण्याकरितां म्हणून फक्त हिंदूनांच तेवढ्या राजकीय व शैक्षणिक सुधारणांच्या सवलती मिळूं लागल्या व मुसलमानांची उघड उघड गळचेपी करण्याचा प्रकार सरकारनें सुरूं केला. तथापि या पासूनहि कांहींच निष्फळ होण्याचें चिन्ह दिसेना, तेव्हां सरकारनें हिंदु-मुस्लिम ऐक्याची पाळें मुळेंच खणून काढण्याकरितां म्हणून देशांत सर्वत्र दडपशाहीचें सत्र चालूं ठेविलें. परंतु आश्चर्य हें कीं, जों जों सरकार कडून दडपशाहीचे प्रकार जोरांत सुरूं झाले तों तों प्रात:काळच्या उदयोन्मुखी सूर्याप्रमाणें हिंदु-मुस्लिम ऐक्याचीं किरणें सर्वत्र फोफावतच गेलीं. अशा तऱ्हेची हिंदु मुस्लिमांत एक अपूर्व एकवाक्यता निर्माण झाली असतां साम्राज्य सरकारनें १९०८ चे हिंदी राष्ट्रीयत्वाचे खरे पुरस्कर्ते व सध्याचे शंभर टक्के हृदय पालट झालेले असे एका प्रतिगामी पक्षाचे नेते श्री. सावरकर यांना जेल मधून बोलावून त्यांच्याशीं १९२२ मध्यें गुप्तपणे वाटाघाटी केल्या. या

वाटाघाटीची हकीकत अर्थात "गुलदस्तांत" राहिली असल्यास कांहींच नवल नाहीं. या नंतर म्हणजे १९३७ पर्यंत सावरकरानां रत्नागिरीस स्थानबद्ध करून ठेवण्यांत आले होते. १९३७ मध्यें काँग्रेस मंत्रिमंडळ येतांच त्यांची सुटका करण्यांत आली. + सुटका होतांच त्यानीं हिंदु-मुस्लिम ऐक्यासच नव्हे तर हिंदी राष्ट्रीयत्वास सर्वस्वी विघातक ठरणाऱ्या अशा शुद्धिसंघटनेच्या चळवळीस प्रारंभ करून ठिकठिकाणी दौरे काढले व मुसलमानांच्या विरुद्ध हिंदुना चिथावणी देणारी अशीं भाषणें केली. अशा तऱ्हेनें शुद्धि संघटनेचें देशांत विषारी

---

+ बॅ. सावरकर यांची सुटका काँग्रेस मंत्रिमंडळ स्थापन झाल्या नंतर मंत्रिमंडळाच्या शिफारसीनें झाली आहे. तो पर्यंत ते रत्नागिरी येथे नजरबंद होते. त्या अवधितहि त्यानीं 'मुसलमानांतील पंथोपपंथ परिचय' या मथळ्याखाली किर्लोस्कर मासिकांत लेख लिहून इस्लाम व मुस्लिम समाजाचे आपण कट्टर शत्रु आहोत हे सिद्ध केले आहे. ते आपणास सनातन धर्मिय सुधारक म्हणवितात परंतु त्यांची आर्य समाजास व त्याच्या शुद्धीकार्यास पूर्ण सहानुभूति आहे. मात्र शुध्दीकार्याचे ते प्रवर्तक नसून आर्यसमाजाचे सहाय्यकर्ते आहेत. शुध्दि कार्य मुख्यत्वे करून आर्यसमाजच करित असतो याचेच थोडे फार अनुकरण ममुरी येथील एक आश्रम करू लागला आहे.

लोण फैलावत असतां ' इकडे आड नि तिकडे विहीर ' या न्यायानें देशांतील दोन प्रमुख जमातींत अशांततेबरोबर शंका कुशंकेचे वातारण निर्माण झालें व असह्य मानसिक वेदनाने मेटाकुटीस आलेल्या मुसलमानांना शेवटीं ना इलाजानें कां होईना पण ' तबलीग ' व ' तंजीमचें ' कार्य हातीं घेऊन आपल्या विरोधकांच्या कृष्णकारवायांना पायबंद घालणें भाग पडलें. आपल्या स्वार्थांध दृष्टी बरोबर शुद्धि कार्याचा पूर्ववृत्तांत गुलदस्तांत ठेवण्याकरितां कांहीं अराष्ट्रीय व प्रतिगामी विचारसरणींच्या लोकांनीं पूर्णपणें दक्षता घेतली असली तरी शुद्धिकार्याचें मूळ जनक इंग्रजच आहेत व कांहीं अराष्ट्रीय लोक हे त्यांच्या तंत्रानें वागणारे केवळ पाळीव गुलाम आहेत. हें आतां न समजण्याइतकी हिंदी जनता कांहीं दूधखुळीं राहिलेली नाहीं. अशा तऱ्हेच्या देशांत दोन परस्पर विरोधी संस्था निर्माण झाल्या असता हिंदु-मुसलमानांतील आदर्श ऐक्याचा बुर्जा उडाला गेल्यास कांहींच नवल नाहीं. कारण शुद्धि कार्यद्वारें हिंदु-मुस्लिमांत फूट पाडून ब्रिटिश मुत्सद्यांनींच आपला अिच्छित हेतू साध्य करून घेतला असें नव्हें तर आपल्या मातृभूमिची यत्किंचितहि पर्वा न बाळगतां इंग्रजांच्या हातांतील बाहुलें बनलेल्या कांहीं अपमतलबी देशद्रोह्यांनींहि हिंदुत्वाच्या प्रतिगामी विचारसरणीनें प्रेरित होऊन व मुसलमानांवर नानातऱ्हेचें गडांतर आणवून

आपला अमानुष कावा प्रगट करून दाखविला, हें सर्वश्रुतच आहे. यामुळें हिंदु मुस्लिम ऐक्याकरितां निरपेक्ष बुद्धीनें अहर्निश प्रयत्न करणाऱ्या कायदे आजम जिन्हासारख्या व्यक्तींचे प्रयत्न निष्फळ ठरत गेले व देशांत सर्वत्र अशांततेची घनदाट छाया पसरली गेली. ह्मणून याला मुख्य कारण शुद्धि संघटने सारख्या राष्ट्रविघातक चळवळीच मुख्यत्वेंकरून कारणीभूत झाल्या आहेत. हे आतां सर्वांस पूर्णपणें कळून चुकलें असेलच.

शुद्धि कार्या सारख्या जात्यंध चळवळीच्या बाबतींत वाटाघाटी करण्याकरितां १९३८ मध्यें म. गांधींनी सावरकरांची भेट घेऊन त्यांच्याशीं शुद्धि संघटनेच्या बाबतींत चर्चा केली त्यावेळीं त्यांनीं सावरकरांचे सर्व म्हणणें ऐकून घेऊन, सावरकरांना धन्यवाद दिलें व सांगितलें कीं आपल्या शुद्धि कार्याच्या चळवळीच्या बाबतींत माझेंहि मत आपल्या प्रमाणेंच आहे. ईश्वर आपल्या कार्यांत लवकरच यश देवो.

यावरून हिंदु-मुसलमान हें मातृभूमीचे दोन डोळे आहेत. एकास दुखापत झाली असतां नैसर्गिक नियमानुसार दुसऱ्या डोळ्यांत खळकन् पाणी उभें राहिलेंच पाहिजे व "हिंदु-मुस्लिम ऐक्याशिवाय स्वराज्य मिळणें कदापि शक्य नाहीं" असें वारंवार आपल्या भाषणांत सांगणाऱ्या म. गांधी सारख्या जबाबदार नेत्यांनींहि शुद्धि कार्या सारख्या जात्यंध चळवळीला अनपेक्षितपणें मान्यता द्यावी हें राष्ट्रांचें दुर्दैवच नव्हे काय ?

# “ ऑल पार्टीज कॉन्फरन्स. ”

जानेवारी १९२९ सालीं दिल्लीमध्यें फक्त हिंदु मुस्लिमांत एकवाक्यता निर्माण करण्याकरितां ह्मणून म. गांधीच्या अध्यक्षतेखालीं “ ऑल पार्टीज कॉन्फरन्स ” भरविण्यांत आली होती. या कॉन्फरन्समध्यें कायदे आजम जिन्हांनी प्रामुख्यानें भाग घेऊन, हिंदु मुस्लिम ऐक्यावर अंतःकरण पिळवटून टाकणारे असे वक्तृत्वपूर्ण भाषण करून सांगितलें कीं, “ बंधूनो, सध्यां यःकश्चित मतभेदानें हिंदु-मुसलमानांतील भांडण तंटे विकोपास जाऊन त्यांच्यांत जी दुहीची यादवी फैलावत आहे; ती खरोखर गर्हणीय व निषेधार्ह अशीच आहे. या यादवीमुळें ना हिंदुमुस्लिमांचे कल्याण होणार आहे, ना आपल्या मातृभूमीच्या पायांतील दास्य शृंखला निखळणार आहेत. उलट आपल्या या क्षुल्लक बखेड्यामुळें तर गुलामीच्या शृंखलेनें मातृभूमीला जास्तच जखडल्यासारखें होऊन. हिंदी जनतेलाहि दारिद्र्याच्या व गुलामीच्या पकडीतून मुक्त होतां येणार नाहीं. आणि “दोघांचे भांडण व तिसऱ्याचा लाभ ” या न्यायानें आपल्या शत्रूला मात्र हिंदुस्थानांत

आपलें प्रचंड बस्तान बसविण्याची सुसंधी मिळेल, व मग आपणाला अतिशय पश्चात्ताप भोगणें प्राप्त होईल.

जो पर्यंत आपणाला या तात्पुरत्या झगड्याला मिटवितां येणार नाहीं, तों पर्यंत कोणत्याहि तऱ्हेनें आपणाला उर्जितावस्था प्राप्त होणार नाहीं. तेव्हां आज आपण हिंदु–मुसलमान बांधव, या प्लॅटफॉर्मवर या करितां संघटितपणें जमा झालों आहोंत कीं, आपण आपल्यांतील पुर्वीचें क्षुल्लक वैरंभाव विसरून जाऊन, आपल्यांतील बुद्धिमान समंजस व्यक्तींच्या उच्च शिकवणुकीनुसार आपापली विचारसणी उच्च दर्जाची व बंधुभावाची ठेवून, एकमेकाशीं निःसंकोचपणें मित्रत्वाच्या व बंधुभावाच्या वाटाघाटी सुरू करून, मातृभूमीचे एक ललामभूत सुपुत्र म्हणून जगण्यांतच अभिमानपूर्वक आनंद मानुया, कीं, ज्यामुळें आपल्या देशांत चोहींकडे आनंदाचें व मानवतेचें खरें सुराज्य नांदू शकेल, व हिंदवासियांना स्वातंत्र्याची व स्वाभिमानतेची खरी चाड आहे हें जगालाहि पटू शकेल" या विचारसरणीवरून कायदे आजम जिन्हांचें हिंदुमुसलमानां–संबंधीं काय धोरण आहे हें स्पष्ट नाहीं कां होत?

## प्रांतिक असेंब्लीतील कामकाज.

२१ जानेवारी रोजीं असेंब्लीच्या कामकाजास

सुरवात झाली. तोपर्यंत श्वेतपत्रिकेची (White Paper) बेडकी जॉइंट पार्लमेंटरी कामिटीची रिपोर्ट होण्या इतकी फुगली होती. आणि तो रिपोर्ट दोन्ही सभांतून पास होऊन तो कायदे बुकांत नोंदला गेला होता. त्या रिपोर्टावर असेंब्लींत झालेल्या वाटाघाटी (चर्चा) व ठराव थोडक्यांत खालील-प्रमाणें आहे:— —

प्रांतिक कौन्सिलानीं जॉ. पा. कमिटी रिपोर्टावर ज्या पद्धतीची चर्चा केली त्यापेक्षां निराळ्याच पद्धतीनें असेंब्लींत झाली. प्रांतिक कौन्सिलांत सरकारी सभासदांनीं चर्चेत मुळीच भाग घेतला नाहीं. त्या मुळें फक्त हिंदी मतेंच व्यक्त झाली होती. असेंब्लींत वाद्विवादांत भाग घेण्याचे व रिपोर्टाविषयीं आपण मांडलेल्या ठरावांच्या उपसूचना व दुरूस्त्या यांच्या विरूद्ध मतें देण्याचें सरकारी सभासदानीं ठरविलें होते. सरकारी धोरण हें प्रथम ठरले नसते, तर मात्र या योजनेच्या आधारावर कायदे करण्याचें काम बंद करावे, ही कॉंग्रेसची उपसूचना पास झाली असती.

परंतु मु० लीगचे नेतृत्व बॅ. जिन्हांच्याकडे असल्यामुळें त्यांनीं आणलेली उपसूचना असेंब्लींत बहुमतानें मान्य झाली. मतासाठीं त्या सूचनेचे दोन भाग केले होते. पहिला भाग

कम्युनल ॲवार्ड स्वीकारण्याविषयीं होता. जिन्हांच्या सूचनेला उपसूचना म्हणून काँग्रेसनें तटस्थपणाची सूचना पुढें आणली ती नापास झाली. ही उपसूचना नापास झाल्यावर काँग्रेसला तटस्थच रहावे लागले. जिन्हांच्या सूचनेचा पहिला भाग सरकारी सभासद व मुसल्मान सभासद यांची मतें पडून पास झाला.

का. आ. जिन्हा यांच्या सूचनेचा २ रा व ३ रा भाग खालीलप्रमाणें होता. तो ७४ विरुद्ध ९८ मतानीं पास झाला, काँग्रेसनें अनुकूल मतें दिली व सरकार पक्षानें विरुद्ध मतें दिली.

जिन्हांच्या उपसूचनेतील पहिला भाग असा होता:-

(१) जो पर्यंत निरनिराळ्या जमातींमध्यें मतैक्य होऊन नवीन योजना निर्माण झाली नाहीं तो पर्यंत जातीय निवाडा या कायदेमंडळाला मान्य आहे.

(२) प्रांतिक सरकार विषयींची योजना अतिशय असमाधानकारक व निराशजनक आहे. सेकंड चेंबर्स, गव्हर्नरांचे खास व असामान्य अधिकार, पोलीस, गुप्तपोलिस यांच्याबद्दलचे खास नियम या गोष्टींवरच एक्झिक्यूटिव्ह व कायदे मंडळें यांचे

नियंत्रण व जबाबदारी अवलंबून असते. आणि या विषयींचे वरील योजनेतील नियम अत्यंत आक्षेपार्ह आहेत. आणि ते आक्षेपार्ह स्वरूप दूर झाले नाहीं तो पर्यंत वरील योजनेस हिंदी प्रजेची मतें अनुकूल होणार नाहींत.

(३) मध्यवर्ती सरकार किंवा ज्याला ऑल इंडिया फेडरेशन असें नांव दिलें आहे; त्यांचे स्वरूपही मूलतःच त्याज्य व हिंदुस्थानातील ब्रिटिश प्रजाजनानां तें सर्वस्वी अग्राह्य असेंच आहे. हिंदुस्थान सरकारला ही सभा असें सुचवीत आहे कीं, या योजनेंप्रमाणें कायदे करण्याचा सल्ला त्यांनीं बादशाही सरकारला द्यावा. ब्रिटिश हिंदुस्थानांत खरी जबाबदार राज्यपद्धति स्थापन करण्याविषयीं अत्यंत कसोशीनें तातडीचें प्रयत्न व्हावेत; व त्यासाठीं आज हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या सर्व पक्षांची सल्लामसलत घेऊन, सर्व परिस्थितीचे पुन्हा निरीक्षण करावें.

या नंबर २ व ३ च्या उपसूचना वर सरकारनें अगदीं निराळ्या दृष्टीनें विचार केला. त्या सूचना पूर्वींच्या योजने ऐवजीं एक स्वतंत्र योजना सुचविणाऱ्या आहेत असें सरकारनें प्रतिपादन केलें, व लॉ–मेंबरच्या द्वारें असें सांगितलें कीं,

कॉंग्रेस प्रमाणें याही सूचना जॉ. पॉ. कमिटीच्या रिपोर्टाला नकार देणाऱ्या आहेत. लॉ—मेंबर म्हणाले कीं, श्री. भुलाभाई देसाई यांनीं प्रामाणिकपणें प्रत्यक्षच आघाडीवर हल्ला केला, आणि कायदे आजम जिन्हा हे तोच प्रकार आपल्या राजकारण धुरंधर व मुत्सद्दीपणाच्या प्रभावानें करीत आहेत. अर्थात दोघांचाहि हेतू एकच आहे. तेव्हां कॉंग्रेस पुढाऱ्यांचा विरोध व बॅ. जिन्हांचा विरोध यांत कांहींच फरक नाहीं.

# सायमन कमिशन व नेहरू रिपोर्ट.

मॉंटेग्यु चेम्सफर्ड रिपोर्टानें ज्या सुधारणा हिंदुस्थानला मिळाल्या त्यांत असें एक कलम होतें कीं, सुधारणा अमलांत आल्यापासून दहा वर्षांनीं हिंदुस्थाननें त्या सुधारणांचा कसा उपयोग केला, त्या योग्य प्रकारें राबविल्या कीं नाहीं, याची चौकशी करण्यासाठीं एक कमिशन नेमण्यांत येऊन, त्या कमिशननें हिंदुस्थानच्या भावी सुधारणाविषयीं योजना सुचवावी. याप्रमाणें सन १९२७ अखेर ब्रिटिश पार्लमेंटांत हिंदी सभासदांना वगळून फक्त युरोपियनांचेंच एक कमिशन सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखालीं नेमण्यांत आलें.

हिंदुस्थान स्वराज्याला पात्र आहे कीं नाहीं, हें ठरविण्यासाठीं परकीय लोकांनीं सर्वस्वी परकीय लोकांचें कमिशन नेमावें ही गोष्ट हिंदी राष्ट्राच्या स्वाभिमानास प्रचंड धक्का देणारी असल्यामुळें राष्ट्रांतील प्रत्येक स्वाभिमानी व्यक्तीस व संस्थेस ब्रिटिशांच्या या सत्ताभिलाषी राजकारणाची अत्यंत चीड आल्यास नवल नाहीं. कारण सरकारकडून

जबाबदार राज्यपद्धतींची आतांपर्यंत दिलेल्या अश्वासनांची परिणति सायमन कमिशनरूपी सर्वस्वी फसवणुकीच्या व अन्यायी मार्गाच्या अवलंबनानें होत असल्याची वार्ता द्रुत-गतीनें सर्व हिंदी जनतेंत फैलावल्यामुळें सर्वत्र अशांततेचें व निराशेचें वातावरण दृगोचर होऊन, कमिशनवर बहिष्कार घालण्याचें निषेधार्ह ठरावहि पण पास होऊं लागले व देशांत बहिष्कार नि निषेध यांची एकच लाट उसळली गेली.

हिंदुस्तानची राजकीय उन्नति झाली कीं नाहीं, हें ठरविण्याचा हक्क ग्रेटब्रिटनचा आहे ही गोष्टच मुळीं कोणाहि स्वाभिमानी हिंदी मनुष्याच्या इभ्रतीस धक्का देणारी असल्यामुळें देशांतील प्रमुख पक्षांकडून या गोष्टीचा तीव्रतेनें प्रतिकार करण्यांत येत होता.

अर्थात कायदे आजम जिन्हांनींहि आपल्या उच्च राष्ट्रीयत्वाला अनुसरून चालू अंदोलनावर आपलें योग्य तेंच मत बनविलें व कमिशनवर सर्वत्र बहिष्कार घालण्याकरितां पुढाकार घेऊन, त्यांनीं ठिकठिकाणीं सभा भरविल्या, भाषणें दिलीं व सरकारचा अत्यंत कडक शद्बांत निषेध कराविला.

लेजिस्लेटिव्ह असेंब्लींतहि हा प्रश्न वाटाघाटींस निघाला असतां कायदे आजम जिन्हा, जयकर, नेहरू प्रभृति

लोकांनीं सरकारचा स्पष्ट शब्दांत निषेध केला. व ले. असेंब्लींत आपलें प्रतिनिधी नेमण्याचें नाकारलें अशा परिस्थितींत ११ आक्टोबर १९२८ ला हें कमिशन हिंदुस्तानांत अवतीर्ण झालें असतां, हिंदी जनतेकडून त्याचें कोणत्या प्रकारें आगत स्वागत झालें असेल हें कांहीं सांगणेंच नको. सरकारच्या बाजूला कॉंग्रेसच्या दुतोंडी राजकारणानें रुष्ट झालेले कांहीं मुसलमान पुढारी व कांहीं सरकार जमा झालेले नोकरीवाले पेन्शनर लोक या शिवाय कोणीच नसल्यानें जेथें जेथें हें कमिशन गेलें तेथें तेथें या कमिशनवर काळ्या निशाणांनीं स्वागत करून घेण्याची पाळी आली. शेवटीं लोकमताच्या संघटित विरोधापुढें आपली मान तुकवून त्रस्त अंतःकरणानें अपयशाचें खापर डोक्यावर घेऊन या कमिशनला परत विलायतेस परतावे लागले. हें सर्व श्रुतच आहे. तथापि यांत हिंदी राष्ट्रीयत्वासच नव्हे तर हिंदी जनतेच्या स्वाभिमानास तारक अशी जर प्रामुख्यानें कोणती गोष्ट झाली असेल तर ती हिंदु-मुस्लिमांतील ऐक्याची व बंधुभावाची ही होय. यामुळेंच हिंदी जनतेला ब्रिटिश मुत्सद्यांच्या राजकारणीय डावाला तिलांजली देतां येऊन आपल्या सर्वस्वाचें रक्षण करतां आलें.

राष्ट्रहिताच्या दृष्टीनें प्रथम हिंदु-मुसलमानांतील तात्पुरत्या मतभेदाला मूठ माती देणें आवश्यकतेचें वाटल्यावरून का. आ. जिन्हांनीं हिंदुमुस्लिमांत ऐक्याचें बीजारोपण करण्याकरितां अहर्निश प्रयत्न करून, आपल्या मुत्सद्दी बाण्यानें सायमन कमिशनला सर्वस्वी विरोधक असें लोकमत बनविलें. यांतच त्यांच्या कर्तृत्वाबरोबर चिकाटीची, उच्च राष्ट्रीयत्वाबरोबर उच्च विचारसरणीची आणि निष्काम लोक सेवेबरोबर राजकारण धुरंधर मुत्सद्दी बाण्याचीच झांक दिसून येत नाहीं काय? खरोखरच सायमन कमिशन वरील बहिष्काराच्या वेळीं हिंदु मुसलमानांच्या एकीचें जें दृश्य दिसलें तें अनेक दृष्टीनें स्पृहणीय व आशादायक असें असल्यामुळें त्याचें सर्व श्रेय कायदे आजम जिन्हांच्या निष्काम लोक सेवेलाच देणें योग्य होईल.

सायमन कमिशनचा अशा रितीने बोजवारा उडतो न उडतो तोंच कायदे मिल्लत जिन्हांना मुस्लिमांच्या स्वयंनिर्णित न्याय हक्कांची जाणून बुजून उपेक्षा करणाऱ्या व त्यांच्या स्वयंसिद्ध नैसर्गिक स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या अशा देश विघातच नव्हे तर हिंदु-मुस्लिम ऐक्यास सर्वस्वी बाधक ठरणाऱ्या नेहरू रिपोर्टाचा मुकाबला करावा लागला.

५०३

हिंदुसभेच्या अशुद्ध व प्रतिगामी विचारसरणीस बळी पडून निवळ "रामराज्याच्या" भावनेनें उद्दीपित झालेल्या कांहीं जबाबदार हिंदु काँग्रेस कार्यकर्त्यांनीं नऊ करोड मुस्लिमांच्या जीविताबरोबर त्यांच्या न्याय हक्कांची यत्किंचितहि क्षिति न बाळगतां नेहरू रिपोर्टाद्वारें हिंदु मुस्लिमांत द्वेशाचें बीजारोपण मात्र केलें. एक बहुसंख्य जमात दुसऱ्या अल्पसंख्य मुस्लिम जमातीला सर्वस्वी नुकसानकारक असा नेहरू रिपोर्ट प्रसिद्ध करून, त्या अल्पसंख्य मुस्लिम जमातिला गुलामिच्या बंधनांत जखडण्याचें कारस्थान करीत असतां देश स्वास्थ्याकरितां कोणता सुविचारी राष्ट्रपुरुष या अन्यायाचा प्रतिकार करणार नाहीं ?

कायदे आजम जिन्हांनीं मौ. मोहम्मद अली यांच्यां समवेत नेहरू रिपोर्टाला विरोध करण्याकरितां ह्मणून चळवळीला प्रारंभ केला व ठिकठिकाणीं भाषणें देऊन, नेहरू रिपोर्ट मुसलमानांना कसे नुकसान कारक आहे हें सर्व जनतेला पटवून दिलें.

इतकेंच नव्हे तर डिसेंबर १९२८ ला कलकत्त्यास महाराजा ऑफ महेमुदाबाद यांच्या अध्यक्षतेखालीं अ. भा. मुस्लिम लीगचें अधिवेशन भरलें असतां मौ. मोहम्मद अलींच्या

साहाय्यानें बॅ. जिन्हांनीं केवळ मुसलमानांच्या न्याय हक्कांचें संरक्षण करण्याकरितां ह्मणून नेहरू रिपोर्टीच्या प्रतिकारार्थ आपलें सुप्रसिद्ध असें पंधरा मुद्दे जे सर्व साधारण चौदा मुद्यांच्या नांवानें प्रसिद्ध आहेत ते जाहीर केलें.

याबद्दल कांहीं कॉंग्रेस कार्यकर्त्यांना जिन्हांच्या वरील चौदा मुद्या विषयीं जरी उदासीनता दर्शवावी लागली, तरी त्या शिवाय जिन्हांना दुसरा कोणताच मार्ग नसल्याने नाइलाजानें कां होईना त्यांना इच्छित कार्य तडीस न्यावें लागलें. आणि याचा सुपरिणाम ह्मणूनच कीं काय २५ डिसेंबर १९२८ ला जिन्हांच्या प्रतिपक्षांना नेहरू रिपोर्ट परत घ्यावा लागला.

## जिन्हांच्या सुप्रसिद्ध अशा चौदा अटी.

या नंतर तीन महिन्यानीं कलकत्ता अधिवेशनांतील कार्याची पूर्तता करण्याकरितां म्हणून मार्च १९२९ सालीं जिन्हांच्या अध्यक्षतेखाली ऑल इंडिया मु. लीगची एक खास बैठक भरविण्यांत आली. या बैठकीमध्यें सायमन कमिशनच्या मतभेदावरून मुस्लिम लीगची फुटून वेगळीं झालेली पंजाबच्या शाफि मु.लीगनेहीं भाग घेतला होता. या बैठकींत जिन्हांच्या सुप्रसिद्ध अशा चौदा अटी सर्वानुमते पास करण्यात आल्या त्या येणें प्रमाणें:—

१ हिंदुस्थानचा भावी नवीन कायदा कायम स्वरुपाचा झाला पाहिजे, ज्याच्यांत बाकीचे सर्व हक्क प्रांताना मिळाले पाहिजेत. फक्त सार्वजनीक हिताच्या सर्व कामावर नियंत्रण घालण्याचा अधिकार मध्यवर्ती सत्तेच्या हाती असावा.

२ प्रांतांना बरोबरीचें पूर्ण स्वातंत्र्य मिळावें.

३ अल्पसंख्यांकांना प्रत्येक प्रांतांत योग्य व परिणामकारक प्रतिनिधित्व प्राप्त व्हावें. परंतु एकाद्या जास्त संख्येस कमी करून बरोबरीच्या किंवा कमी संख्येच्या योग्यतेस आणता कामा नये. याप्रमाणें देशाच्या सर्व कायदे कौन्सिलांचें स्वरूप ठरलेलें असावे.

४ मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत मुसलमानांचे प्रतिनिधित्व एक तृतियांष पेक्षां कमी असूं नयेत.

५ निरनिराळ्या जातीची निवडणूक हल्लींच्या स्वतंत्र मतदार संघाप्रमाणें व्हावी. परंतु आपल्या इच्छेप्रमाणें या पासून निराळे होण्याचा अधिकार प्रत्येक जातीस देण्यांत यावा.

६ ठरलेल्या प्रांतात कोणतीही अशा प्रकारची फाळणी केली जाऊं नये कीं, जिचा परिणाम बंगाल, पंजाब आणि सरहद्दप्रांतांच्या मुसलमान बहुसंख्यांकांवर घडेल.

७ प्रत्येक जातीस संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्याची खात्री देण्यांत यावी.

८ कोणतेहि बिल किंवा ठराव अगर त्याचा कोणताहि पोटभाग त्याच्याशीं हितसंबंध असलेल्या जातीचें तीन चतुर्थांश सभासद त्याला आपल्या जातीच्या हितास नुकसान पोहोंचविणारा समजत असतील तर, कायदे कौन्सिलांत आणला, अगर पास केला जाऊं नये.

९ सिंध एक स्वतंत्र प्रांत बनविला जावा.

(१०) सरहद्दप्रांत व बलुचिस्थानांत इतर प्रांताप्रमाणें सुधारणा सुरूं केल्या जाव्यात. कौन्सिले कायम केलीं जावींत.

११ प्रत्येक प्रांतांत सरकारी नोकरी वगैरे बाबतींत इतर हिंदुस्थानीं लोकांच्या बरोबरीचा फायदा जरूरी प्रमाणें योग्य देण्यांत यावा.

१२ इस्लामी संस्कृतीच्या सुधारणा व पुरातन चालत आलेल्या गोष्टी मातृभाषा लिहिण्याची लिपि, धार्मिक पर्सनल लॉज आणि इस्लामी केंद्राचें संरक्षण, मुस्लिम शिक्षण व संस्कृति उत्कर्ष व वाढीसाठीं गव्हर्नमेंट व इतर दुसऱ्या स्वतंत्र: कचेऱ्यांतील मदतीच्या रकमांतून योग्य हिस्सा मिळाला पाहिजे.

१३ मध्यवर्ती किंवा प्रांतिक वादविवादांत कमीत कमी एक तृतिआंश मुसलमान सभासद आसावेत.

१४ देशांतील सर्व प्रांतांनीं व संस्थानानीं मान्यता दिल्याखेरीज या अटींत कोणताहि बदल केला जाऊं नये.

# " नमुनेदार मार्गदर्शक "

हिंदुस्तानांतील मुसल्मान समाजाचें पुढारीपण मिळविणें ही एक कठीणच नव्हे तर दुराराध्य गोष्ट आहे. हिंदी राजकारणाचा अधुनिक इतिहास पाहिला असतां, डॉ. अन्सारी, हकीम अजमलखान यांना मुसलमान जमातीचें नेतेपण मिळवितां आलें नाहीं. असें आपणांस दिसून येते. खिलाफत चळवळीचें अर्ध्वर्यू अलिबंधूंनीं मुसलमान जमातीचें नेतेपण. कांहीं काळ मिळविलेलें दिसून येते. पण ही त्यांची लोकप्रियता अल्पायुषी ठरली गेली. ह्मणून मुस्लिम समाजाच्या वृत्तीचें निदान सहज करतां येण्यासारखें नाहीं. किंवा ती सुलभतेनें मिळविण्याजोगी नाहीं. हेच निश्चित.

विद्वत्ता, कर्तबगारी, कार्यकुशलता व सामाजिक दर्जा या गुणामुळेंच मुसलमान समाजाचें नेतेपण मिळेल असें कांहीं नाहीं. तर प्रामाणिकपणा, ध्येयनिष्ठा व निष्कलंकित चारित्र्य याच गुणांना मुस्लिम जनता वश होण्यासारखी आहे. पुढारी ह्मटला कीं तो सर्व दृष्टीनीं श्रेष्ठ असला पाहिजे. जर त्याच्या

ध्येयानिष्ठेविषयीं कोणत्या कीं हेतूनें अगर कारवाईनें असेना यत्किंचितहि शंका मुस्लिम समाजास आली कीं अशा सर्वमान्य पुढाऱ्याच्या लोकप्रियतेला ओहोटी लागलीच म्हणून समजावें. आणि एकदां कां त्यांचा विश्वास डळमळला तर तो पुनरपि संपादन करणें अशक्यच.

गेल्या आठ नऊ वर्षांत कायदे आजम जिन्हा हे मुस्लिम जनतेचे एकमेव पुढारी म्हणून सर्व हिंदुस्थानांतच नव्हे तर पाश्चिमात्य राष्ट्रांतहि ओळखले जात आहेत. हीच गोष्ट त्यांच्या कर्तबगारीचा व सामर्थ्यवान चारित्र्याची निदर्शकच नाहीं काय ?

समाजांत पूर्वापार चालत आलेल्या रूढीमध्यें व वहि-वाटीमध्यें बदल करणें जसें अशक्यप्राय असतें त्याचप्रमाणें किंबहुना त्याहून जास्त मनुष्यमात्राच्या चालीरीतींत, दैनं-दिनींत व ठराविक कार्यक्रमांत एकदम बदल करणें, अशक्यच नव्हे तर अवघडहि असते. परंतु कायदे आजम मोहम्मद अल्ली जिन्हा मात्र या गोष्टीस सर्वस्वी अपवादात्मक ठरलेले आहेत.

१९३४ पासून त्यांनीं आपल्या चालीरितींत, सवयींत, पेहेरावांत व रोजच्या ठराविक कार्यक्रमांत एकसमयावच्छेदेंकरून परिवर्तन केलेलें दिसून येते. नेहमींच सूट-हॅटमध्यें वावरणारे जिन्हा

ज्यांना दररोज चार सूट बदलावे लागत असत, ते जिन्हा आज इस्लामी पेहरावांत वावरतांना दृष्टीस पडतात. मातृभाषा या दृष्टींनें ऊर्दू भाषेचें संरक्षण होणें जरूरीचे आहे असें वाटल्यावरून त्यांनीं उर्दू भाषा हस्तगत करून घेतली व १९३४ मध्यें त्यांचें पहिलेंच अस्खलित असें उर्दूंत भाषण झालें. इतकेंच नव्हें तर त्यांनीं नमाज, रोजा, जकात वगैरेसारख्या धार्मिक विधींचा आपल्यामध्यें पूर्णपणें अंतर्भाव करून घेऊन, आपल्या खऱ्या राजकारणाबरोबर खऱ्या धार्मिक जीवनासहि सुरवात केली आहे.

मौ. मोहम्मदअलीच्या पश्चांत विस्कळीत आणि फुटीर झालेल्या मुस्लिमांची सर्व दिशेनें होत असलेली वाताहत व अवहेलना पाहून, विलायतेहून येतांच मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या सांगण्यावरून बॅ. जिन्हांनीं मु. लीगची सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतली व यक्षणीची कांडी फिरवावी तद्वत त्यांना सर्व मुस्लिम हिंदुस्थानांत आशा, आकांक्षा, स्वातंत्र्य व जागृतीचें बीजारोपण करून दहा कोट मुस्लिमांना संघटितरीत्या मु. लीगच्या एकमेव प्लॅटफॉर्मवर जमा केले.प्रचलित राजकारणाच्या दृष्टीनें कायदे आजम जिन्हांच्या आयुष्याचा विचार करावयाचा झाल्यास आजला ते पाकिस्तानद्वारें हिंदी राजकारणाची तुफान नौका चालविण्याला लायख असे कुशल कर्णधार

ऐनवेळीं मुस्लिम समाजास लाभले आहेत. कोणतेही राष्ट्र अर्थिक दृष्ट्या सामर्थ्यवान व संघटित झाल्याशिवाय कोणत्याही क्षेत्रांत त्याची प्रगती होणे शक्य नाहीं. " अर्थिक बाजू हाच राष्ट्राचा पाया आहे " असें उद्गार कायदे आजम जिन्हानीं कराची मुस्लिम चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे त्यांना देण्यांत आलेल्या मानपत्रास उत्तर देतांना काढले. व्यापार धंद्याचें बाबतींत मुस्लिम व्यापारी संघानीं स्वावलंबी झाले पाहिजे असें सांगून त्यांनीं म्हटले " इतर व्यापारी संघास जे हक्क आणि सवलती आहेत. तें हक्क आणिं त्या सवलती मुस्लिम व्यापारी संघांनीं मिळविल्या :पाहिजेत. कार्यांत एकसूत्रीपणा असल्यासच आपले ध्येय गांठण्यास सामर्थ्य प्राप्त होईल. एरव्ही नाहीं. "

कराची मुस्लिम व्यापारी संघाचे अध्यक्ष मि. एस्. एच्. गझदार यांनीं सदरहू मानपत्र वाचून दाखविलें " व्यापार आणि उद्योग धंद्याच्या क्षेत्रांतील आपलें स्थान व महत्व गेल्या तीन शतकांत मुसलमानांनीं गमाविले: आहे. परंतु कायदे आजम जिन्हांच्या नेतृत्वाखालीं मुसलमान जनता आतां व्यापार धंद्याकडे पुन्हा जोरानें लक्ष घालीत असून त्यांच्यांतील अपूर्व जागृती बरोबर त्यांची व्यापारी वृत्तीही वाढत आहे. "

सध्याच्या जीवन कलहाचा उगम आर्थिक पुनर्घटनेंत आहे. आणि पवित्र कुरआनेशरीफ मध्यें लोकशाही व समाजवादाची अर्थिक पुनर्घटना. यांना प्राधान्य दिलेले असल्यामुळें आजला मुस्लिम समाजांतील आडून मारा पुढारलेला तरुण वर्ग कायदे आजम जिन्हांच्या व्यक्तित्वाकडे आकर्षून मु. लीगच्या झेंड्याखालीं जमा होत आहे, आणि यांतच मुस्लिम राष्ट्राचा तरुणोपाय आहे.

एक मुस्लिम कार्यकर्ते ह्मणून कॉंग्रेसमध्यें राहून कायदे आजम जिन्हांनीं हिंदी स्वातंत्र्याकरितां जी अपूर्व कामगिरी बजावलेली आहे; ती सांगणे त्यांच्या पक्षांध हितशत्रुंना कमीपणाची वाटत असली, तरी घडलेला इतिहास कांहीं पुळदस्तान गाडूं शकणार नाहीं. एवढें मात्र निश्चित.

म. गांधी आफ्रिकेंत होते तेव्हांपासून जिन्हांनीं स्वतःस राष्ट्रकार्यास वाहून घेतले होते. आणि म. गांधी जेव्हां आफ्रिकेहून १९१४ मध्यें परत हिंदुस्तानांत आले त्यावेळीं गांधीजींनां राष्ट्रकार्यांत प्रथम जर कोणत्या व्यक्तीनें प्रामुख्यानें मदत केली असेल तर ते कायदे आजम जिन्हा हे होत. एक मुसलमान या दृष्टीनें कायदे आजम जिन्हांच्या सार्वजनिक कार्याबद्दल पक्षपाताच्या द्वेशबुद्धिनें प्रेरित होऊन

विरोध करणारे पुष्कळ निघतील. पण त्यांच्या निष्कलंक व उदात्त वैयक्तिक कार्याविषयीं बोलतांना " अमीरे सियासत व कायदे आजम " ही त्यांची लोकोत्तर उपाधी त्यांच्या विरोधकांनाही मान्य होतें हे निःसंशय.

## मौ. मोहम्मद अलींची इच्छा.

सन १९३० मध्यें राऊंडटेबल कॉन्फरन्स करितां मौ. मोहम्मदअली अजारी असतांही जेव्हां त्यांना स्ट्रेचरवरून इंग्लंडला जाणाऱ्या बोटीवर ठेवण्यांत आले, त्यावेळीं त्यांच्या कांहीं कळकळीच्या अनुयायांनीं त्यांना विचारले कीं, आपल्या नंतर मुस्लिम राष्ट्राची व मुस्लिम राजकारणाची धूरा खांद्यावर घेऊन मुसलमानांना सध्याच्या आणीबाणीच्या पेंचप्रसंगातून कोण मार्ग दाखवणार ? तेव्हां त्यांनीं आपल्या वेदनायुक्त प्रेमळ, सद्गतित व प्रार्थनापूर्ण आवाजांत सांगितले. " फक्त मोहम्मद अली जिन्हा " आणि कोणीहि नाहीं. फक्त त्या अल्लाह पाकनें जिन्हांच्या डोक्यांत हे विचार मात्र घातले पाहिजेत. "

हिंदी मुस्लिमांचें नशीब बलवत्तर ह्मणून कायदे आजम जिन्हा मध्यें मौलानांची ही अंतिम आणि अर्थपूर्ण इच्छा आज पूर्ण स्वरूपांत वास करीत असल्याचा दिसून येते.

विधीघटनेनुसार हे असे घडावयाचे होते म्हणूनच कीं काय, कायदे आजम काँग्रेसच्या बरोबर साम्राज्यशाहीच्या राजकीय डावपेचास बळी न पडतां, मुस्लिमांच्या न्यायहक्क संरक्षणाच्या लढ्यांत मुस्लिमांचे एक यशस्वी व आदर्श मार्ग-दर्शक म्हणून गाजले जात आहेत.

## अतातुर्क व कायदे आजम.

गेल्या मार्चमध्यें " बझमे-इकबाल " या वार्षिक समारंभाचे वेळीं कायदे आजम अध्यक्षस्थानीं असतां डॉ. इकबाल यांनीं आपल्या एका मित्राला पाठवेलल्या पत्रांतील उतारा सर अब्दुल कादर यांनीं वाचून दाखविला त्यांत डॉ. इकबाल यांनीं खालीलप्रमाणें विचार प्रगट केले होते.

" माझा संदेश योग्य वेळीं देण्यांत आला आहे. आतां समय आला आहे. तेव्हां माझ्या साठीं प्रार्थना करण्या ऐवजीं तुम्हीं कायदे आजम जिन्हा व केमाल अतातुर्क ह्यांच्या आयुष्यासाठीं प्रार्थना करा ! कारण त्यांना त्यांचे महत्तकार्य पार पाडावयाचे आहे. "

## ' विद्यार्थी आणि राजकारण '

आजचे विद्यार्थी हेंच उद्याच्या स्वतंत्र हिंदुस्थानचे आधारस्तंभ होणार आहेत. त्यानां योग्य मार्गदर्शन करणें हें

प्रत्येक सूज्ञ नेत्याचे पवित्रतम कर्तव्यकर्म आहे. सांप्रत जिन्हांच्या राजकारणांत मुस्लिम विद्यार्थ्यांनां अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे हे मुस्लिम विद्यार्थ्यांच्या सभेंत जिन्हांनीं केलेल्या भाषणावरून दिसून येते.

" विद्यार्थ्यांनीं राजकारणांत भाग घ्यावा कीं, नाहीं. या बाबत विद्यार्थ्यांनां संदेश देतानां मार्च १९४१मध्यें जिन्हांनीं म्हटलें कीं इंग्लंडचे मोठमोठे मुत्सद्दी ऑक्सफर्ड–केंब्रीजच्या कॉलेज विद्यार्थ्यांच्या संघापुढें नेहमीं जातात व प्रचलित राजकीय विषयांवरील विद्यार्थ्यांच्या चर्चेत मनमोकळे पणानें भाग घेतात. विद्यार्थ्यांनीं चालू राजकारणावर जरूर मत प्रदर्शीत करावे. मतप्रदर्शनानें चळवळींत भाग घेतला असें होत नाहीं. विद्यार्थ्यांनीं या देशाच्याच नव्हे तर जगाच्याहि घडामोडींच्या माहितीची आपल्यापाशीं पूर्ण जय्यत तयारी ठेवावी. "

# " गोलमेज कॉन्फरन्स "

गोलमेज कॉन्फरन्समध्यें कायदे आजम जिन्हांनीं ' भावी हिंदी राज्य शासनासंबंधीं भाषण करतांना सांगितलें.

पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभीहि आम्ही स्पष्टपणें जाहीर केले होते कीं, हिंदी राष्ट्राच्या राज्यशासन उन्नतीच्या मार्गामध्यें आम्ही केव्हांहि विरोध करणार नाहीं आणि कोणतीहि राज्यशासन योजना तयार होण्यापूर्वी ' हिंदु-मुस्लिम ' ऐक्य होणें अवश्यक आहे. खरोखर माझे असें निश्चित मत आहे कीं, जो पर्यंत मुसलमानांच्या स्वहिताचें रक्षण केले जात नाहीं आणि त्यांचे सहकार्य घेतले जात नाहीं तोपर्यंत कोणतीहि हिंदी राज्यशासन योजना चोवीस तास सुद्धां चालूं शकणार नाहीं. आज हीच स्थिती आहे. मुसलनमान समजत असतील कीं, भारतीय पक्षतेने केवळ प्रांतिक स्वातंत्र्याचें समर्थन करणार नाहींत. परंतु हेंही तितकेंच खरें आहे कीं, जो पर्यंत मुसलमानांच्या मागण्या स्वीकारल्या जात नाहींत, तोपर्यंत त्यांना कोणतीहि योजना स्वीकारतां येणार नाहीं. मृगजलाच्या पाठीमागें धावणारी अशी अखिल भारतीय संघाची कल्पना असून ब्रिटिश हिंदुस्थानांशीं समेट करून शीघ्र गतीनें पुढें जाण्याची अपेक्षा दर्शवितें. पण येथें सरकारचें हें कर्तव्य पाहिजे कीं, चालू परिस्थितीतील भविष्यकालाचा

निकाल समझोत्यानें व प्रामाणिकपणें दिला जावा. यांसाठीं महत्वाच्या गोष्टींचा समझोता होणें अत्यंत अवश्यक आहे.

## " फेडरेशन "

फेडरेशनसंबंधीं जिन्हांनीं ह्मटलें कीं, लवकरच या स्कीमला कायदेशीररीत्या अंमलबजावणीचें स्वरूप प्राप्त होणार आहे! तेव्हां ही गोष्ट काँग्रेसला दृष्टीआड करून भागणार नाहीं. अशा परिस्थितींत काँग्रेसचें मुख्य कर्तव्य हें पाहिजे कीं, तिनें तातडतोब अल्पसंख्यांकांशीं आदरणीय समझोता करून व आपलें सर्व वजन खर्च करून, फेडरेशन स्कीमला तीव्रतेनें विरोध करावा कीं, ज्यामुळें फेडरेशन स्कीम अयशस्वी होण्यांस वाताहत पडणार नाहीं. परंतु काँग्रेसच्या सध्याच्या धोरणावरून दिसून येते कीं. ती आपल्या महत्तम कार्यापासून परावृत्त होत आहे आणि जर असें असेल तर मी असें ह्मणूं शकतो कीं, चालू राजकारणांत काँग्रेस जरी " स्वातन्त्र्याची घोषणा करीत असली तरी तिच्या बगलेंत १९३५ चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट दडलेला आहे." आणि हें कोणाहि सत्प्रवृत्त मनुष्याला नाकबूल करतां येणार नाहीं.

## " जिन्हांनीं मुस्लिमानां काय काय दिलें. "

दिवसें दिवस मुस्लिम जनतेत अपूर्व जागृती होत असल्याचे पाहून व सर्व मुसलमान एक दिलानें लीगच्या

झेंड्याकडे आकर्षिले जात असल्याचें पाहून मानवतेचा खून करून, मुस्लिमांना सतत गुलामगिरींत ठेवूं इच्छिणाऱ्या छुप्या कॉंग्रेस भक्तानीं मुसलमानांत पद्धतशीर फूट पाडण्याचा अहर्निश प्रयत्न चालविला आहे.

मुसलमानांत गैरसमज पसरविण्याकरितां त्यांच्याकडून वारंवार हा प्रचार करण्यांत येतो कीं, "मुसलमानांनीं जिन्हांचे अनुयायीत्व स्वीकारल्यापासून त्यांना काय देण्यांत आले ?" पण या उपद्व्यापी देशभक्तानां उलट मीं असा अव्हानपूर्वक प्रश्न विचारूं शकतों कीं, " जिन्हांनीं मुस्लिमानां काय दिलें नाहीं ?"

जिन्हांनीं मुस्लिम जनतेचे नेतृत्व स्वीकारल्यापासून मुसलमानानां " सुप्रसिद्ध असा लखनौ पॅक्ट, स्वतंत्रसिंध, स्वतंत्र सरहद्दप्रांत, स्वतंत्र मतदारसंघ, अल्पसंख्य मुसलमान, प्रांतात वजन, पाकिस्तानची लोकशाही योजना, ऐक्य, सहनशीलता, धैर्य, आशा, आकांक्षा, आणि मानवतेचें सौख्यपूर्ण जविन इत्यादि गोष्टीं मिळवून दिल्या शिवाय त्यांनीं मुसलमानांना संयुक्त योजनेच्या(**Federal Scheme** )गुलामगिरीतूनही वांचविलें.

त्यांनीं मुसलमानानां जें मिळवून दिलें तें हिंदुमहा सभेच्या डोळ्यांत उघड उघड खुपत आहे आणि त्यामुळें कॉंग्रेसलाहि गुप्तपणें असह्य अशा वेदना होत आहेत. '

शिवाय जिन्हांचे वैशिष्ट्य हें कीं, मुसलमानानां वरीलप्रमाणें गोष्टीं मिळवून देतांना त्यांना एकाहि माणसाला तुरूंगात पाठवावें लागलें नाहीं, एकहि रक्ताचा थेंब सांडावा लागला नाही व कोणतीहि मोठी चळवळ करावी लागली नाहीं.

## " हिंदु-मुस्लिम ऐक्याविषयीं जिन्हांचे उद्‌गार. "

" प्रथम आपल्यांत एक सूत्रीपणा आणण्याकरितां ऐक्य नि संघटना निर्माण करा ! व एका प्लॅटफॉर्मवर उभे रहा. आपल्यामध्यें बऱ्याचशा अनावश्यक गोष्टींची घाण सांचलेली आहे. ही गोष्ट मी गुप्तपणें ठेवूं इच्छित नाहीं. आणि ही अनावश्यक घाण काढून टाकण्याकरितां म्हणून आपल्याला सुधारले पाहिजे, उत्तिष्ठ झाले पाहिजे. व आपल्यांत खरें नव चैतन्य निर्माण केले पाहिजे. आपण जर या मार्गाचा अवलंब करून, कणखर वृत्तीचे मुसलमान तयार केल्यास, मुसलमानांत एक उच्च कोटीची अभेद्य अशी संघटना निर्माण होईल. आणि याचप्रमाणें हिंदुनींही वागून आपल्यामध्यें कणखर वृत्ती व एकसूत्रीपणा निर्माण केल्यास सर्व हिंदवासि-यांत खरें ऐक्य निर्माण होईल, आणि त्याच दिवशीं हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळाले जाईल. "

# " पाकिस्तान–घोषणा "

सायमन कमिशनला पाठिंबा द्यावा कीं, न द्यावा या बिकट प्रश्नाच्या मतभेदानें ऑ. इं. मुस्लिम लीगमध्यें शफी मु. लीग व जिन्हा मु.लीग अशा दोन पार्ट्या निर्माण होऊन, मुसलमानांतील ऐक्य संपूर्णतया नष्ट झाले होते. मुसलमानांतील या आपापसांतील लाथाळीमुळें, व नाइत्तेफाकीमुळें सरकार तर बेहद्द खुष होतेच पण कांहीं मुस्लिम विरोधकांच्याहि आनंदाला पारावार उरलेला नव्हता.

अशा परिस्थितींत मौ. मोहम्मद अली व डॉ. इकबाल यांच्या मध्यस्थिनें सर्व मुसलमान पुढाऱ्यांत पुन्हां मतैक्य करण्यांत येऊन, सिमला एथें भरविण्यांत आलेल्या ऑ. इं. मुस्लिम कॉन्फरन्समध्यें मुस्लिमांच्या उज्वल भवितव्याविषयीं निश्चित मार्गहि पण आंखण्यांत आला.

यावेळीं मुस्लिम लीग व मुस्लिम कॉन्फरन्स या दोहोंच्या दृष्टीपुढें जिन्हांच्या चौदा अटी होत्या. या अटींना हिंदूंचा तर विरोध होताच पण जेव्हां कॉंग्रेसनेंहि मान्यता दिली नाहीं तेव्हां सर्वत्र मुसलमानांत बेचैनीची व असंतोषाची मूर्तिमंत लाट उसळली गेली.

या नंतर १९३० सालीं अलाहाबादमध्यें डॉ. सर इकबाल यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आलेल्या ऑ. इं. मुस्लिम लीगच्या अधिवेशनांत जिन्हांच्या चौदा अटींना एकमताने पाठिंबा देण्यांत आला. आपल्या अध्यक्षतेखालीं डॉ. इकबाल यांनीं प्रथमच पाकिस्तान योजनेवर परिणामकारक भाषण करून सांगितलें कीं, " हिंदी मुसलमानांना त्यांच्या वसतिस्थानांत, त्यांच्या संस्कृतीला व परंपरेला अनुरूप असा अनिर्बंध विकास करण्याचा हक्क मिळाला पाहिजे. ही गोष्ट कायमच्या जातीय समेटाचा पाया म्हणून मान्य करण्यांत आली तर, सर्व हिंदी मुसलमान एकसमयावच्छेदेंकरून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां आपलें सर्वस्व पणाला लावण्यास तयार होतील "

या बाबतींत डॉ. इकबाल व कायदे आजम जिन्हा यांच्यांत पुष्कळसा पत्रव्यवहार झाला व राउंडटेबल कॉन्फरन्सच्या निमित्तानें इंग्लंडमध्यें असता त्यांच्यांत प्रत्यक्ष बोलाचालीहि झाली, पण कोणतीच गोष्ट निश्चित होऊं शकली नाहीं.

मार्च १९४० मध्यें लाहोर येथें ऑ. इं. मुस्लिम लीगचे अधिवेशन कायदे आजम जिन्हांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यांत आलें असतां, जिन्हांनी म्हटलें, कोणत्याही राष्ट्र—

व्याख्येप्रमाणें मुसलमान हेहि राष्ट्रच होत. मुसलमानांना स्वतःचे वसतिस्थान, स्वतःचा प्रदेश व स्वतःचे राज्य पाहिजे आहे. " असें सांगून, त्यांनीं स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राची घोषणा केली. यानंतर फजलुल हक्क यांनी पाकिस्थानचा ठराव मांडला असतां ' स्वतंत्र मुस्लिम राष्ट्र जिंदाबाद, ' ' कायदे आजम जिन्हा जिंदाबाद ' व ' इस्लाम जिंदाबाद ' या सिंह गर्जनेंत तो पास करण्यांत आला.

कायदे आजम जिन्हांनीं हिंदुस्थान देश व त्यांतील मुसलमान समाज व तत्सम अल्पसंख्यांक जमात यांच्या हिताच्या दृष्टीनें पाकिस्तानची मागणी केल्या पासून, कायदे आजम जिन्हांना व त्यांच्या पाकिस्तानच्या योजनेस अखिल मुसलमान समाजाकडून व तत्सम अल्पसंख्यांक समाजाकडून जोराचा पाठिंबा मिळत असल्याचें पाहून कॉंग्रेस, हिंदुमहा-सभा व देशांतील इतर संस्थांनीं हिंदुस्थान एक राष्ट्र आहे. हिंदुस्थानचे तुकडे करावयाचे असेल तर मुसलमानांनीं हिंदु-स्थानांतून चालते व्हावे, पाकिस्तान आम्हीं केंव्हांही होऊं देणार नाहीं. असे पाकिस्तान विरोधी प्रचार करण्यांस सुरवात करून, देशांत पाकिस्तान बरोबर मुसलमान व मुस्लिम संस्कृती या विरूद्ध हिंदवासीयांत जेणें करून भलताच गैरसमज

पसरविण्यांत येईल यां सारख्या कृष्णकारवायां सुरू झाल्या पण कायदे आजम जिन्हांनीं हिंदुस्थान हें एक राष्ट्र कधीहि नव्हते व नाही असा रोखठोक जबाब देतांच, आणि त्यांच्या ह्या विधानाची हिंदुस्थान हे युरोप खंडासारखें आहे. ते एक राष्ट्र नाहीं, या शद्बांत ब्रिटिश सरकारनें स्टेटसेक्रेटरी मि. ॲमेरी यांच्या करवी कबुली देतांच. हिंदुस्थानांतून मुसलमान व तत्सम अल्पसंख्यांक समाजाचे निर्मूलन करून, जगांत हिंदुस्थान देश हे एक सोवळे हिंदुराष्ट्र बनविण्याची इच्छा बाळगून अंतस्त व जाहीररीत्या प्रयत्न करणाऱ्या कॉंग्रेस, हिंदुमहासभा, प्रागतीक वगैरे निरनिराळ्या नांवानीं वावरणाऱ्या व इतरेजनांची भयंकर दिशाभूल करून स्वतःचा स्वार्थ साधणाऱ्या अशा हिंदु भांडवलशाही व फॅसिस्ट संस्थांचे धाबे दणाणले जाऊन, पाकिस्तान विरूद्ध या सर्व संस्था एक झाल्या व त्यांच्याकडून पाकिस्तान विरूद्ध अखंड हिंदुस्थानची घोषणा करण्यांत येऊं लागली.

पाकिस्तानच्या विरोधकांकडून जाणून बुजून जनतेंत भलताच गैरसमज पसरविण्याकरितां ह्मणून वारंवार असें दर्शविण्यांत येतें कीं, जर पाकिस्तान अमलांत आलें तर पाकिस्तानांत समाविष्ट होणाऱ्या जनतेचे नुकसान होईल,

पाकिस्तानांत बहुसंख्य लोक मुसलमान असल्यानें खरें नुकसान मुसलमानांचेंच होणार आहे व परचक्र आल्यास त्याचा प्रतिकार हिंदुस्थानापासून फुटून वेगळ्या झालेल्या पाकिस्तानांकडून होणार नाहीं. उलट परकियांच्या भक्षस्थानीं पडून पाकिस्तानला गुलाम व्हावें लागेल. वगैरे प्रकारचे जेणें-करून जनतेची जेवढी दिशाभूल होईल तेवढी दिशाभूल करण्याचे प्रयत्न आज पाकिस्तानच्या विरोधकांकडून व त्यांच्या जात्यंध वर्तमानपत्रांकडून अहर्निश करण्यांत येत आहेत. देवाचें देवफूल चुकेल पण त्यांचे पाकिस्तानवरील हल्ले केव्हांहि चुकणार नाहींत.

हा पाकिस्तानविरोधी भांडवलशाहीचा प्रचार किती स्वार्थमूलक व खोडमाळपणाचा आहे हें जर आपणांस पहा-वयाचें झाल्यास आजवरचा हिंदुस्थान देशाचा व युरोप-खंडाचाहि विचार करणें जरूर आहे.

युरोपसारख्या खंडांत वसणारे बहुतेक सर्व लोक एकाच ख्रिस्ती धर्माचे पंथाचे व एकाच हाडामांसाचे असतांनासुद्धां त्यांचें एक राष्ट्र न बनतां अनेक राष्ट्रें बनलेलीं दिसून येतात. या भिन्न भिन्न राष्ट्रांतील फरक पाहिल्यास इंग्लंडची भाषा इंग्लिश, फ्रान्सची भाषा फ्रेंच, स्पेनची स्पॅनिश, जर्मनीची

जर्मन, इटालीची इटालियन वगैरे या व्यतिरिक्त त्यांत कांहींच फरक आढळून येत नाहीं.

असें असतांहि या सुधारलेल्या राष्ट्रांनीं युरोपखंडाचें एक राष्ट्र बनविण्याचा कधींहि प्रयत्न केला नाहीं. असा कोणी करील तर ते त्यास कधींहि मान्यता देणार नाहींत.

अर्थात हिंदुस्थानांतील हिंदु अनेक देवांचे व मूर्तींचे उपासक, तर मुसलमान एकेश्वरवादी अशाप्रकारचे परस्पर-विरोधी असे अनेक धर्मपंथीय समाज हिंदुस्थानांत वसत असतां, व मद्रास इलाख्याची भाषा, मद्रासी तर बंगालची बंगाली, पंजाबची पंजाबी, तर सिंधची सिंधी, फार काय मुंबई सारखा इलाखा घेतला तरी गुजराथमध्यें गुजराथी तर महाराष्ट्रांत मराठी, व कर्नाटकांत कानडी, अशा परस्पर विरोधी भाषा, धर्म, पंथ, समाज व आचारविचार ज्या देशांत आहेत आणि ब्रिटिश इंडियापासून पूर्ण विभक्त अशी अनेक संस्थानें ज्यांत आहेत त्या हिंदुस्थानांस एकराष्ट्र म्हणणें अगर एक बनविण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे वस्तुस्थितीचा खून करण्यासारखे नाहीं कां होणार?

यावरून हिंदुस्थान हे एकराष्ट्र कधींच नव्हते व नाहीं हें कायदे आजम जिन्हांचे ह्मणणें किती सत्य व वस्तु-स्थितीस धरून आहे याची परिपूर्ण खात्री कोणाहि प्रामाणिक

मनुष्यांस आल्याशिवाय रहाणार नाहीं. पण हें आमच्या हिंदुबांधवानां कसें पटणार आज त्यांना स्वत:च्या हितापलीकडे दुसरें कांहींहि सत्य आकर्षण करूं शकत नाहीं. कांहीं कां असेना स्वार्थ हा मनुष्य मात्राच्या अध:पतनास कारणीभूत होतो व जो स्वार्थाच्या आहारी जातो त्याची सर्वसाधारण विचार करण्याची बुद्धिच नष्ट होते. हें आपणांस प्रचलित पाकिस्तान विरोधकांच्या कृष्ण कारवायांवरून स्पष्ट दिसून येतेच.

सांप्रत हिंदी जनतेच्या आपापसांतील क्षुल्लक बखेड्या-मुळें हिंदुस्थानांतील राजकीय वातावरण अत्यंत चिघळत चाललें आहे. अशा परिस्थितींत हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सुटणे ह्मणजे सूर्यावर थुंकण्याइतके अत्यंत विकटच नव्हें तर अशक्यहि झाले आहे.

यास्तव हिंदुस्थानचा प्रश्न जर चुटकीसरशीं सोडवा-वयाचा असेल तर प्रथम पाकिस्तान द्वारे सर्व हिंदी जमातींच्या न्याय हक्कांचे संरक्षण करून त्यांच्यांत खऱ्या राष्ट्रीय वृत्तीचा प्रसार करणें जरूरीचे आहे तरच हिंदुस्थानला स्वातंत्र्याची शक्यता आहे.

हरिजन पुढारी डॉ. अंबेडकर यानीं आपल्या 'थॉट्स ऑन पाकिस्तान, या इंग्रजी ग्रंथांत चिकित्सक पूर्वक विवेचन

करून स्पष्टपणें ह्मटलें आहे कीं, " पाकिस्तान अगर तत्सम दुसऱ्या एखाद्या साम्राज्यांतर्गत योजनेशिवाय हिंदी राजकीय प्रश्न सुटणें कदापीहि शक्य नाहीं."

इतकेंच नव्हें तर, मद्रासचे पुढारी राजगोपालाचार्य यांनीं गेल्या वर्षीं कटक येथील कॉलेजच्या स्मृतिसमारंभाच्या प्रसंगीं बोलतांना ह्मटलें कीं, ' जिन्हा जे मागतात ते गैरवाजवी नाहीं. ' पाकिस्तानामुळें हिंदुस्थानचें ऐक्य भंग पावेल, असें जेव्हां तेव्हां पाकिस्तानचे विरोधक ह्मणतात. विचाराची व धोरणाची तडजोड याला ऐक्य ह्मणतां येतें. पण हिंदुस्थानच्या भौगोलिक एकत्रीकरणाला ऐक्य ह्मणतां येणार नाहीं.

त्या नंतर धोतराचें उदाहरण देऊन त्यांनीं सांगितलें, बळेंच एकत्रीकरणानें हिंदुस्थान कमजोर होईल. पाकिस्तानला विरोध करावयाचा म्हणूनच विरोध करूं नका. दोन भावानीं एकत्र राहून धुसफुसत राहाण्यापेक्षां विभक्त झाल्यानेंच दोघांची प्रगति होईल. कित्येक म्हणतात कीं, पाकिस्तानमुळें मध्यवर्ति सरकार कमजोर होईल. पण मोठा आकार म्हणजे ताकद नव्हे; परस्पर विरोधी व साशंक पक्षांचे मध्यवर्ति सरकार असण्यापेक्षां परस्पर विश्वासाचे, एक धोरणाचे सरकारच केव्हांहि प्रगतीपर आहे. म्हणून पाकिस्तानमुळेंच हिंदी राष्ट्राची

प्रगति होणार आहे." यावरून अखंड हिंदुस्थानची कल्पना किती भ्रामक व वस्तुस्थितीस सोडून आहे हें आपणास दिसून येत नाहीं काय?

या शिवाय आपणांस विशेष पटणारी अशी जर खात्री करून घ्यावयाची झाल्यास सुमारे शंभर वर्षांपूर्वी जगप्रसिद्ध तत्ववेत्ता कार्ल मार्क्स यानीं २९ जून १८९३ च्या अमेरिकेंतील 'न्यूयार्क ट्रिब्यून' या वर्तमानपत्रांत हिंदुस्थानसंबंधी स्पष्टपणें लिहिलें आहे कीं, मुसलमान, मोंगल अथवा ब्रिटिश यानीं आपल्या एकतंत्री अंमलानें हिंदुस्थान एकराष्ट्र बनविले पण ज्यावेळीं या तिघांपैकीं कोणाचाही अंम्मल नव्हता त्यावेळीं जितकीं शहरे होतीं तितकींच आपापसांत भांडणारीं स्वतंत्र राज्ये होतीं."

यावरून हिंदुस्थान हें पूर्वींहि कधीं एकराष्ट्र नव्हते याची संपूर्ण खात्री होणारी आहे.अर्थात भारत, महाभारताच्या नांवानें असो,अगर अधुनिक कल्पनेने असो अखंड भारताची ही जी चळवळ करण्यांत येत आहे ती किती खोडसाळ व वस्तुस्थितीचा कसा विपर्यास करणारी आहे हें सहज दिसून येणारे आहे,म्हणून पाकिस्तान हे मुसलमानांचे राजकीय सत्य असून,पाकिस्तान हाच हिंदी स्वातंत्र्याचा एकमेव पाया आहे हें स्पष्ट होत नाहीं काय?

या बाबतींत आपल्या दक्षिण हिंदुस्थानच्या दौऱ्यातील भाषणांत कायदे आजम जिन्हांनीं स्पष्ट म्हटलें आहे कीं, " हिंदु व मुस्लिमानां एकत्र करून एकराष्ट्र करावयाचे सर्व प्रयत्न आज पावेतो निष्फळ झाले आहेत व पुढेंहि होतील. हिंदुस्तान चंद्रगुप्त मौर्याच्या कालापासून सुद्धां एकराष्ट्र कधींच झालें नाहीं. आज ब्रिटिशांच्या संगीनींनीं हिंदु-मुस्लिमानां एकत्र ठेवले आहे, पण संगीनीचा अस्त झाल्यास भौगोलिक दृष्ट्या हिंदुस्तान एक देश रहाणार नाहीं. पाकिस्तानची योजनाच फक्त हिंदु-हिंदुस्तान व मुस्लिम हिंदुस्तानांची स्वराज्यें टिकवील. आज सर्व देशभर असा दुष्ट प्रचार करण्यांत येत आहे कीं, मुस्लिम लीग हिंदमातेचे तुकडे करण्याचा डाव खेळत आहे. मी असे खात्रीपूर्वक सांगतो कीं, लीगचा असा दुष्ट हेतू कधींहि नव्हता व नाहीं. उलट पक्षीं आमच्या हिंदु बांधवाशीं आजला असलेले आमचे नाते अधिक सलोख्याचे व बंधुत्वाचे व्हावे हीच लीगची इच्छा आहे.

# " स्वार्थ निरपेक्ष पुढारी. "

हिंदी राजकारणांत जिन्हांच्या तोडीचा मुत्सद्दी सांपडणे कठीण आहे. त्यांचा सर्वांत महत्वाचा गुण म्हणजे त्यांच्या स्वतःच्या ध्येयावर व कर्तृत्वावर असलेली त्यांची अत्यंतिक निष्ठा हा होय. कसल्याही अमिषाला बळी पडून ते आपल्या ध्येयानिष्ठेचा सौदा करणार नाहींत आणि याच गुणांत त्यांच्या यश प्राप्तीचे रहस्य सांठलेले आहे. अत्यंतिक व अव्यभिचारी ध्येयनिष्ठा असणारी व्यक्ती स्वार्थापासून अलिप्त असते. आणि स्वार्थनिरपेक्ष पुढारी प्रत्येक ठिकाणीं सांपडतोच असे नाहीं.

खरोखर ज्या स्वभाव गुणांनीं जिन्हांच्या स्वभाव चित्राची खुलावट उठावदार होते, त्यामध्यें त्यांच्या निर्भय-पणा एवढेंच त्यांच्या स्वार्थनिरपेक्ष वृत्तीलाही महत्व देणे क्रम-प्राप्त आहे. हिंदी राष्ट्रीयत्वाचें जिन्हा मारेकरी आहेत, हा कांगावा करतांना अशा कांगवखोरपणाची दुसरी बाजू म्हणून ज्या अमिषावर साम्राज्यशाहीच्या हस्तकांनीं अराष्ट्रीयत्वाचा मिना बजार मांडला, त्या अमिषांना जिन्हांच्या बाबतींत

कितपत यश आले याचाही विचार केला पाहिजे. परंतु ही दुसरी बाजू जिन्हांच्या चरित्रांत कोरीच सांपडते. हायकोर्ट जज्जाची जागा, व हिंदुस्थान सरकारच्या कार्यकारी मंडळांत कायदे मंत्र्याचे स्थान, हीं दोन अमिषे लार्ड रीडिंग यांनीं जिन्हांच्यापुढें टाकली होती. नाईट हूडही पण त्यानीं जिन्हांना देऊं केले होते, व ते त्यांनी स्वीकारावें म्हणून एका उपवन संमेलन प्रसंगी मिसेस जिन्हा यांना उद्देशून (" **Dont you wish to be Lady Jinnah** ") असा प्रश्नही पण लॉर्ड रीडिंग यांनीं विचारला होता.

" जर जिन्हा नाईट हूडची पदवी स्वीकारतील तर मी त्यांच्याशी घटस्फोट करीन " असे बाणेदार उत्तर मिसेस जिन्हांनीं लॉर्ड रीडिंग यांना दिले होते. क्षुद्रवस्तु तुच्छतेचा अविर्भाव करून झिडकाराव्या त्याप्रमाणें ही अमिषें जिन्हांनीं लाथाडली. असेंब्लीमध्यें एका चर्चा प्रसंगी मुसलमानांना मोठ्या हुद्यावर सरकारी जागा देण्यात येत नाहींत, अशी तक्रार करण्यांत आली असतां सर बेसिल ब्लॅकेट यांनी अशा जागांना पात्र असलेले लायक मुसलमान सांपडत नाहींत असे कारण पुढें केले असतां जिन्हानी (' **Search you will Find** ') असे बसल्या जागेवरून उत्तर दिले.

या उत्तराच्या पाठिमागें कांहीं तरी गर्भित सूचना असावी या कल्पनेने सर बेसिल ब्लॅकेट यांनीं ताबडतोब जिन्हांची भेट घेऊन त्यांच्या वशिल्याच्या इसमाला कोणतीही बडी जागा देण्याची तयारी दाखवली, पण आपल्या जवळ असा उमेदवार नसल्याचें सांगून जिन्हांना उपकृत करून ओशाळे करण्याची ही संधीं त्यांनीं सर बेसिल यांना मिळूं दिली नाही. पिष्टलेपन करण्याची आवश्यकता असलेलें लहानसे छिद्र जरी जिन्हांच्या चारित्र्यांत सापडलें असते, तरी त्या दोषाचा फायदा जिन्हांच्या हितशत्रूंनीं घेतला असता, व त्यांच्या चारित्र्याला कलंकित करण्याकरितां त्यांनी जिन्हांच्या नांवानें हलकल्लोळ माजविला असता, पण तसा कमकुवतपणा जिन्हांच्या चारित्र्यांत कधींहि आढळून आला नाहीं. म्हणून जिन्हांच्या दोषाकडे बकवृत्ती धारण करून पहाणाऱ्या त्यांच्या द्वेषांध शरिरसंरक्षकांची वारंवार निराशाच झालेली दिसते. आणि याच कारणामुळें कट्टर कॉंग्रेसवाल्यांच्या रोषाला जसे जिन्हा पात्र झाले, त्याचप्रमाणें सरकारच्या बहुरंगी छायेलाही ते अपात्र ठरले.

तिसऱ्या राऊंड टेबल परिषदेच्यावेळीं जिन्हा लंडनमध्यें असतां तिसऱ्या परिषदेंतून व जॉ. पार्लमेंटरी कमिटीतून त्यांना

वगळून त्यांच्या ऐवजी बंगालचे प्रतिनिधि मि. गझनवी यांची तेथें वर्णी लावण्यांत, जिन्हांना त्यांच्या जहालपणाचेंच प्रायश्चित देण्याचे धोरण होते, हे न सांगूनही समजण्याजोगे आहे.

जिन्हांच्या अज्ञात स्वार्थ निरपेक्षतेप्रमाणें त्यांचा ज्ञात स्वार्थत्यागही तेवढाच महत्वाचा असून स्वार्थनिरपेक्षतेच्या पार्श्वभूमीवर तो ठळकपणें मांडल्याखेरिज हें चित्र पुरें होत नाहीं.

" नवी दिल्ली असेब्लींत १९३४ मध्यें ओटावा करारावर निर्णय घेण्यात आल्या नंतर या कराराला सर्वत्र कडून विरोध करविण्याकरितां, जिन्हांनीं दौरा काढला असतां याचवेळीं त्यांच्याकडे एक कज्जा चालवण्यांस आला. ज्यांत त्यांना एक लाख रुपया पेक्षां ज्यादा रुपये मिळणार होते. परंतु जिन्हांनी आपल्या देशाकरितां विनासायास या गोष्टीला ठोकर मारून असें सांगितलें कीं, ओटावा पॅक्टला विरोध करणें, व देशाला दास्य शृंखलेतून मुक्त करून, स्वातंत्र्य मिळवून देणें हें व्यक्तिशः लाखो रुपये फायदा मिळविण्यापेक्षा किती तरी पटींनें उत्तम आहे."

" १९४०च्या सुमारास रियासत या उर्दू वर्तमान-पत्रानें एका मुस्लिम स्टेट विरुद्ध कांहीं मजकूर प्रसिद्ध केला,

तेव्हां या स्टेटनें एडिटर विरुद्ध दावा दाखल करून, वकीलपत्र जिन्हांनीं घ्यावे, याकरितां एक मोठी रक्कम, फी म्हणून त्यांना नजर केली. परंतु या अभिषांकडे यत्किंचितही दृष्टीक्षेप न करतां त्यांनीं म्हटलें कीं, देशहित व देशस्वातंत्र्य या बाबतींत व्यक्तिश: फायद्याला माझ्याजवळ किंमत नाहीं. " मी हिंदुस्थानांतील प्रेसच्या स्वातंत्र्याची गळचेपी करण्याकरितां जन्मलो नाहीं. तर प्रेसच्या स्वातंत्र्याकरितां सतत झगडत राहिलो आहे. व या पुढेही राहाणार आहे."

मुडिमन कमिटी, स्कीन कमिटी, या दोन कमिट्यावर जिन्हांची नेमणूक झाली असतां या दोन्ही कमिट्याबरोबर सर्व हिंदुस्तानभर व इंग्लडमध्यें साक्षी घेत सुमारे तीन वर्षे पर्यंत फिरून,हजारो रुपयांच्या प्रॅक्टिसीची यत्किंचितहि पर्वा न करितां त्यांनीं देशाकरितां व हिंदी स्वातंत्र्याकरितां जो अपूर्व स्वार्थत्याग केला आहे तो उपेक्षणीय म्हणतां येईल काय ?

ना. गोखले व फिरोज शहा मेहता यांच्या तालमींत तयार झालेल्या जिन्हा सारख्या कर्तृत्ववान व्यक्तींनां आपल्या चारित्र्यांत यत्किंचितहि वैगुण्य असलेले परवडणार नाहीं.

कावीळ झालेल्या मनुष्याला ज्या प्रमाणें सर्व जगच पिवळें दिसूं लागते त्याप्रमाणें डोळ्यांस द्वेषांध मत्सरी चष्मा

लावलेल्या बुभुक्षितानां,त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांची प्रत्येक गोष्ट द्वेषमूलक व त्याज्य अशी वाटल्यास कांहींच नवल नाहीं.

जिन्हा हे हिंदी स्वातंत्र्याचे विरोधक असून, ते पूर्णपणें सरकारच्या कच्छपि लागलेले आहेत. असा सूर अधुन मधून जिन्हांच्या विरोधकांच्या कडून काढण्यांत येतो खरा, परंतु वरील विवेचनाचे सूक्ष्मतेनें व प्रामाणिकपणें परिशीलन केलें असतां दिसून येईल कीं, जिन्हांवरील हा आरोप सर्व थैव स्वार्थमूलक, द्वेषजनक व खऱ्या वस्तुस्थितीचा खून करणारा असाच आहे.

या बाबतींत जिन्हांनीं स्पष्ट ह्मटलें आहे कीं, " सहकाऱ्या करितां ह्मणून ज्यानीं आपला मोर्चा सरकारकडे वळविला आहे, आणि ते जर सरकारच्या गुप्त पॉलिसी पासून अज्ञात आहेत, तर ते कायमच अधःपाताच्या दरींत कोसळलेले दिसून येतील !

## " असामान्य व्यक्तिमत्व. "

कायदे आजम जिन्हांच्या कीर्तीचा ध्रुवतारा त्यांच्या कसबापेक्षां त्यांच्या कर्तृत्वावर अढळ राहिलेला आहे. देश-हिताच्या दृष्टीनें कोणत्याहि कार्यांत त्यांनीं लक्ष घातलेले-असो, ते कार्य यशस्वी झालेलें नाहीं असें एकहि उदाहरण त्यांच्या हितशत्रूंना दाखवितां येणार नाहीं. ह्मणूनच त्यांच्या कित्येक विरोधकांनाहि त्यांच्या बद्दल निःसीम आदर व निष्ठा वाटत असते. एक कट्टे निश्चयी, निग्रही, करारी व खंबीर राष्ट्रधूरीण ह्मणून हिंदी राजकारणांत कोणालाहि प्राप्त झालें नव्हतें, असें महत्व आज त्यांना प्राप्त झालें असलें, तरी कार्या-वधानता, ध्येयनिष्ठा व त्यागवृत्ति यांतच त्यांच्या यशाचें व लोकप्रियतेचें रहस्य एकसमयावच्छेदेंकरून पहावयास मिळते.

सौजन्यः-आपल्यापेक्षां वयानें,ज्ञानानें, व गुणानें श्रेष्ठ असलेल्या व्यक्तींना ते अत्यंत मानाचें स्थान देतात.त्यांच्याशीं सौजन्यानें व आदबीनें वागतात.

इस्लामी संस्कृतीचे आद्य प्रवर्तक व इस्लामी संस्कृतीचे कट्टे अभिमानी ह्मणून ज्यांनीं हजारों पुस्तकें लिहून गडगंज

संपत्ति, मिळविली व ती सर्व धर्मादायखातें सतत खर्च करून इस्लामची एकानिष्ठपणें सेवा केली नि आपलें जीवन एकाद्या फकीराप्रमाणें राहून घालविलें, ते मौ. अश्रफअल्लीखान ठानवी (ठाना भवन यू. पी.) यांचा व जिन्हांचा कांहीं बाबतींत तीव्र मतभेद होता आणि हा मतभेद अश्रफअल्लींनीं जिन्हांवर कडकपणें टीका करून व्यक्तहि पण करून दाखविली होता. परंतु जिन्हांना त्यांचें कार्य व व्यक्तित्वांबद्दल निःसीम आदर वाटत असल्यामुळें त्यांनीं त्यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिलें नाहीं.

१९३९ मध्यें जिन्हांना मौलानांच्या भेटीचा योग आला असतां ते त्यांच्या मुलाखतीस गेले. त्यावेळीं मौलानांनीं जिन्हांच्या इतमामाप्रमाणें त्यांचे योग्य आदरातिथ्य करण्याकरितां, आपल्या झोपडीवजा घरांत एक मागून आणलेले टेबल व एक खुर्ची मांडून बिछाइतीस चटई टाकली होती. जिन्हा येतांच त्यांनीं त्याच्या दर्जानुसार त्यांना खुर्चीवर बसण्यास विनविले. परंतु जिन्हांनीं उलट त्यांच्या दर्जास व व्यक्तित्वास मान देऊन मोठ्या सौजन्यानें खुर्चीवर बसण्यास नकार दिला व ते खाली चटईवर बसले. नंतर इस्लामी संस्कृती व तिचे जागतिक महत्व या विषयांवर जिन्हांचे व मौलानांचे संभाषण झाले. शेवटीं जिन्हांनीं त्यांना निरनिराळे अनेक प्रश्न विचारून

आपल्या शंकेचें निरसन करून घेतले. यावेळीं जिन्हांनीतर मौलानांच्या समक्ष त्यांच्या कार्याची मुक्तकंठानें तारीफ केलीच पण मौलानांच्या नजरेतूनहि जिन्हांची शालीनता सौजन्य व उच्च प्रकारची राष्ट्रीयता सुटूं शकली नाहीं.

जिन्हांच्या अंगी जितकी शालीनता व सौजन्यता आहे; किंबहुना त्याहून जास्त त्यांच्या अंगी कडवेपणा, ताठरपणा व पराकोटीची निर्भयवृती बाणलेली आहे(**A hero is a hero at all Points**) " अलौकिक माणसाचे अलौकिकत्व सर्वत्रच दृष्टीस पडते ' या न्यायानें आज जिन्हांच्या सार्वजनिक आयुष्यांवर प्रकाश पाडला असतां, असे दिसून येईल कीं, एकीकडे ते हिंदी स्वातंत्र्याकरितां व जनतेच्या न्यायहक्का करितां साम्राज्यशाहीशीं सतत झगडत असलेले दिसतात, तर दुसरीकडे हिंदुमुस्लिम ऐक्याचे प्रतिनिधी म्हणून झळकतात. एकीकडे ते इस्लामी संघटनेचे आद्य प्रवर्तक म्हणून चमकतात तर दुसरीकडे हिंदुस्थानांतील सर्व अल्प-संख्यांक जमातीचे एकमेव पुढारी म्हणून, त्यांच्या स्वयंनिर्णय हक्कांकरितां उन्हातान्हांतून दौडधूप करीत असलेले दिसून येतात. आणि यामुळें हिंदी राजकारणांतील एक अनुभविक व मुरब्बी कार्यकर्ते म्हणून कोणत्याही महत्वाच्या अशा राजकीय प्रश्नावर त्यांचे प्रथम अचूक असे मत घेण्यांत येते.

जिन्हा सांप्रत दहा कोट मुस्लिमांचे एक ललामभूत पुढारी ह्मणून ओळखले जातात पण अराष्ट्रीय विचारसरणी व कृत्यें यांच्या चाकोरींतून ते या अत्युच्च पदावर विराजमान झालेले आहेत, असे त्यांच्या कट्टया शत्रूनाहि ह्मणतां येणार नाहीं. आज हिंदुस्थानांतील झाडून सारे मुसलमान त्यांच्या हिरव्या झेंड्याखालीं जमा झाले आहेत. पण त्यांना कह्यांत ठेवून त्यांच्यावर वचक ठेवण्याचें सामर्थ्य जिन्हाएवढें आज कोणत्याहि मुसलमान पुढाऱ्यांमध्यें नाहीं.

जिन्हांच्या मनासारखें झालें तर आपल्या पक्षाप्रमाणें इतर पक्षाचेंहि नेतृत्व स्वीकारून त्या पक्षाला शिस्तीच्या मार्गानें प्रगतिपथावर आणून सोडण्याची धमक त्यांच्या अंगीं निःसंशय आहे.

**निष्कलंक चारित्र्यः**—मौ.जाफरअलीखान,सर शिकंदर हयातखान,हसरत मोहानी, फजलुल हक,नबाबझियादा लियाकत अलीखान,मौ.मझहरूल हक,नबाब इस्माइलखान व चौधरी खलिक उझमान या सारख्या जहाल पुढाऱ्यांनाहि जिन्हाबद्दल अत्यंतिक आपलेपणा व निःसीम निष्ठा वाटते. याचें कारण ह्मणजे दुसऱ्यावर छाप पाडणारें त्यांचें व्यक्तिमत्त्व, निष्कलंक चारित्र्य व स्वभावसिद्ध मुत्सद्दीपणा हेंच होय.

जिन्हांचे महत्व आहे ते याच गोष्टीमुळें, आणि हे त्यांचे सामर्थ्य ओळखून कॉंग्रेस हीच एक हिंदुस्तानांतील एकमेव राष्ट्रीय संस्था आहे. असे वारंवार प्रतिपादणारे गांधी, बोस, जवाहीरलाल व राजेंद्र प्रसादादिक कॉंग्रेस पुढाऱ्यांना जिन्हांशीं बरोबरीच्या दर्ज्यानें बरताव करावा लागून त्यांच्याशीं तहनाम्याच्या अटी ठरवण्याकरितां वेळोवेळीं त्यानां जिन्हाच्या बंगल्यावर जावें यावे लागले आहे. आज जिन्हांचे वय जवळ जवळ सत्तर वर्षांचे आहे. तरी आजपासून पस्तीस वर्षांपूर्वी त्यांचे जे मत, जी विचारसरणी, जो उत्साह व जें धैर्य होतें तें आजहि कायम आहे.

मुस्लिम हिंदुस्थानचे एक खरेखुरे हितचिंतकच नव्हे, तर एक मार्गदर्शक या नात्यानें त्यांच्या पाठीमागें सतत अनेक महत्त्वाच्या कामगिऱ्या असतात; आणि यामुळेंच ते रात्रंदिवस आपल्या कामांत सारखे गुंतलेले दिसून येतात. ह्मणून यशस्वी लोकप्रियतेचे तंत्र ह्मणजे कार्यक्षमताच आहे हें ते वारंवार ध्वनित करीत असतात. हंसतमुख चेहरा, आकर्षक संभाषण-शैली, दुसऱ्याचें मनोगत हेरून त्याला युक्तीनें आपल्या बाजूस वळवून घेण्याचें कौशल्य व देशसेवेची अत्यंतिक तळमळ यामुळें हिंदी राजकारणांत ऐटदार रुबाबानें वावरणारी त्यांची उंच पण सडपातळ मूर्ती त्यांच्या दिगंत कीर्तींत भरच घालते.

राष्ट्रीय पुढारी:--सुप्रसिद्ध कायदे पंडित व सरावलेले राजकारण धुरंधर म्हणून जिन्हांनीं आपले पुढारीपण गौरवास्पद रीतीनें टिकवीले आहे. मुसलमान समाजच त्यांची स्तुतीस्तोत्रें गातो असे नाहीं, तर इतर जमातीचे पुढारीहि त्यांच्या सद्‌गुणांची तारीफ करतात.

मद्रासचे रावबहादूर एम्. सी. राजा, एम्.एल्.ए.; हे जिन्हांना 'दि लीडर ऑफ दि मायनॉरिटीज' अल्प-संख्यांकांचे पुढारी म्हणून संबोधितात. तर हिंदुस्तानचे माजी कायदेमंत्री व त्रावणकोरचे दिवाण सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांनीं जिन्हांच्या बद्दल पुढील उद्गार काढलें आहेत. " जिन्हांची व माझी माहिती पुष्कळ आहे; आणि त्यांच्या निश्चित मतप्रणालीमुळें व निस्वार्थ वृत्तीमुळें त्यांच्या विषयीं मला नेहमींच आदर वाटतो."

स्वार्थ साधण्यासाठीं अगर मानमरातब मिळविण्यासाठीं त्यांनीं आपल्या पुढारीपणाचा उपयोग कधीही केला नाहीं. ते असामान्य धैर्यवान राष्ट्रीय पुढारी असून, आपला दृष्टीकोन दुसऱ्यांस पटवून देण्यांत अत्यंत वाकबगार आहेत. शिवाय देवी सरोजनी नायडू या जिन्हांना, "हिंदू-मुस्लिम ऐक्याचें प्रतिनिधी " म्हणून बहुमानाचे पदक देतात. " हिंदी स्वातंत्र्याचे कट्टे पुरस्कर्ते व एक आदर्श समाज सेवक म्हणूनहि, जिन्हांच्या ठिकाणीं कित्येक सद्‌गुण आहेत. आणि त्या

गुणांचे अनुकरण प्रत्येक अद्यावत तरुणानें करावें " असे खासदार सत्यमूर्ति यांनीं जिन्हांच्याबद्दल उद्गार काढले आहेत, आणि जसजसा काळाचा ओघ वहात जाईल,तसतशी कायदे आजम जिन्हांची महानता पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें जगाच्या निदर्शनास येऊं लागेल एवढे मात्र निश्चित आहे.

१९१९ सालीं मरिन्स लाइन्सच्या मैदानांत मुस्लिम-लीगची सभा भाडोत्री गुंडांनीं उधळून लाविली असतां, तेथें जिन्हांनीं शेवटपर्यंत निश्चल उभे राहून आपली जागा सोडली नाहीं. १९१८ मध्यें लॉर्ड विलिंग्डन यांच्याशीं दोन हात करून जनतेस आपल्या उच्च राष्ट्रीयत्वाची पुरेपूर साक्ष पटवून दिली. अशाच प्रसंगाची आवृत्ति १९२६ मध्यें मुंबईच्या मारवाडी विद्यालयांत जिन्हांच्या अध्यक्षतेखालीं डॉ. परांजपे यांच्या झालेल्या व्याख्यानप्रसंगीं निघाली होती. नेमस्त व प्रतिसहकारवादी यांची मतें पसंत न पडल्यामुळें त्यांची सभा श्रोत्यांनीं उधळून लावली, असा डांगोरा पिटण्यासाठीं जमनादास मेहता यांच्या निवडणुकीची पत्रकें वाटणाऱ्या एका धंदेवाईक गुंडानें ६ नोव्हेंबर रोजीं भरलेल्या या सभेत दंगा सुरू केला असतां, जिन्हांनीं आपला पोषाखी रुबाब विसरून सदर गुंडाला धक्के मारून बाहेर काढण्यासहि कमी केलें नाहीं. या नंतर विद्यालया बाहेर फटाक्याच्या माळा घालून

बाहेरचे काँग्रेसवाले आंतल्या दंगलीला साथ देत होते, व श्री. वैकुंठ मेहता व बॅ. पुरुषोत्तम विक्रमदास यांनीहि आंत घुसून दंगेखोरांचा कैवार घेतला. शेवटीं पोलिसांनाहि पाचारण करण्यांत आले. पण जिन्हांनीं गुडांचे काँग्रेसवाले कैवारी व पोलीस सार्जंट या उभयतांचीहि मात्रा चालूं न देतां त्यांना सभागृहांतून निघून जाण्यास फर्माविलें, व दंगल मोडूनच नव्हे तर सर्वांवर मात करून सभेचें काम नेटानें पार पाडले. प्रतिपक्षाचा विरोध हाणून पाडण्यासाठीं शाब्दिक बोलानें कार्यभाग होत नाहीं असें दिसून येतांच अस्तन्या वर सारण्याचीहि जिन्हांची तयारी असते. केवढीहि प्रतिष्ठीत व्यक्ती असो, त्या व्यक्तिकडून जाणून बुजून जर अन्यायाचा अवलंब होत असेल, तर कसल्याहि परिस्थितींत त्या व्यक्तिचा प्रतिकार करणें हा जिन्हांचा जन्मसिद्ध बाणा आहे.

---

आपल्या असाधारण बुद्धिसामर्थ्यानें कायद्याचें चिकित्सकपूर्वक ज्ञान संपादन करून, हायकोर्टांतील एक "यशस्वी कायदे पंडित" असा लौकिक त्यांनीं मिळविला आहे.

**हजर जबाबीपणा**:-सर दिनशा दावर यांच्या कोर्टात पक्षकाराचे वकील या नात्यानें हजर राहाण्यास जिन्हा व सर दिनशा दावर यांचे चिरंजीव बॅ. जहांगीर दावर यांना विलंब

लागल्यामुळें सर दिनशा ' वकीलांची कर्तव्यें ' या विषयांवर एक लहानसे व्याख्यान ऐकवीत असतां, " महाराज मी २९वर्षे वकिलीचा धंदा करीत आहे. वकिलांची कर्तव्यें काय असतात हें मला शिकवण्या ऐवजीं ज्याच्या हेकटपणामुळें हा विलंब लागला त्या आपल्या चिरंजीवानांच उपदेश करा ,, असे स्पष्टोत्तर देऊन जिन्हांनीं न्यायमूर्ति दावर यांना आश्चर्य चकित व निरुत्तर करून सोडले. " तुम्ही कनिष्ट कोर्टातल्या कनिष्ट जज्जापुढें भाषण करीत नाहीं, हे विसरू नका. " असे न्यायमूर्ति कंप यांनीं जिन्हांना एकदां बजावले असतां, " तुमच्या समोरहि लुंगासुंगा बॅरिस्टर उभा राहिलेला नाहीं, हे तुम्ही पण लक्षांत ठेवा, " असा रोखठोक जबाब जिन्हांनीं दिलेला आहे. या वरून आपल्या अधिकारपदाच्या चढेलपणानें दुसऱ्यावर नाहक वचक बसविण्याचें प्रयत्न करणाऱ्या उन्मत्त पदाधिकाऱ्यांची, जिन्हांच्या पुढें कसलीच मात्रा चालत नसे हे दिसून येते.

भुलाभाई व इतर पक्षांच्या सर्वाधिकाऱ्यांप्रमाणें आजीजी व खुशामतखोरपणा जिन्हांना ठाऊक नाहीं.ज्यावेळीं साम्राज्यवादी मुत्सद्यांनीं हिंदी जनतेच्या हितसंरक्षणाविरुद्ध व्यूह रचून देशावर सार्वत्रिक गडांतर आणण्याचा प्रयत्न केला आहे.

अशा आणिबाणीच्या प्रसंगीं जिन्हांनीं यत्किंचितही न डगमगतां स्वतःचे प्राणहि धोक्यांत घालून त्यांच्या कारस्थानी व्यूहास सुरूंग लावून, त्याचे त्रिफळे उडविण्यास मागे पुढें पाहिलें नाहीं. राजकारणांत काय, अगर इतर व्यवसायांत काय, जिन्हा कधींहिं कोणांचे मिंधे नसल्यामुळें स्वाभिमानतेच्या ताठरपणानें वर मान करून फिरण्याची त्यांची ऐट त्यांच्या वैयक्तिक स्वभावांत भर घालते.

**त्याग वृत्ती:**-हायकोर्टातील प्रतिष्ठित कायदे पंडितांनीं अशिलपत्रासाठीं लुटीच्या वाटण्या घालून. आपल्या गटाची मक्तेदारी निर्माण करण्याचा जो पद्धतशीर घाट घातला होता, त्याची चौकशी चालू असतां, अनेक बड्या धेंडांची नांवे या मक्तेदारीचे घटक म्हणून बाहेर आली. पण जिन्हांच्या नांवाचा कोणीहि उच्चार केला नाहीं.

जिन्हांच्या ठिकाणीं वैयक्तिक आकर्षणशैली फार आहे. त्यांच्या सहवासांत असलेल्या प्रत्येक मनुष्यांवर त्यांच्या मोठेपणाची व असामान्य कार्यकर्तृत्वाची तत्क्षणीच छाप पडते, व त्यांच्याविषयीं कोणताहि दुराग्रह असला तरी तो नाहींसा होऊन त्यांच्याबद्दल विलक्षण आपलेपणा निर्माण होतो, व त्यांच्या मनोहर आकर्षणशक्तीनें प्रत्येकजण त्यांच्याकडे आकृष्ट होत असतो.

# ‘ पाकिस्तान अधिवेशन. ’

पंजाब मुस्लिम विद्यार्थी फेडरेशनच्या विद्यमानानें स्पेशल पाकिस्तान अधिवेशन ता. १ मार्च १९४१ इ. रोजी रात्रौ लाहोर येथें इस्लामिया कॉलेजच्या विस्तीर्ण मैदानावर उभारलेल्या मंडपांत सुरूं झालें. “ कायदे आजम जिंदाबाद मु. लीग जिंदाबाद—पाकिस्तान जिंदाबाद ’ वगैरे वीरगर्जनांनीं आकाशमंडळ दणाणून गेलें.

व्यासपीठावर नव्वाबजादा लियाकत अलीखान, जनाब जिन्हा, चौधरी खलीक उझ्-झमान, ममदोतचे सर शहनवाजखान सर अबदुल्कादिर व ज मलीक बरकतअली एम. एल. ए. वगैरे ठळक व्यक्ति तळपत होत्या.

इस्लामिया कॉलेजचे विद्यार्थी जनाब अबदुल हमीद यांनीं आपलें स्वागताध्यक्षाचें भाषण केल्यावर कायदे आजम मोहम्मद अली जिन्हा यांनीं ह्मटलें कीं‘अत्यंत गंभीर विचारांनीं मी ठरविलें आहे कीं विषयनियामक कमेटीनें मंजूर केलेला पाकिस्तान ठरावच सर्वांआधीं विचारासाठीं घेणें योग्य होईल. हा एकच ठराव अत्यंत महत्वाचा आहे या ठरावावर मी कांहींच बोलणार नाहीं. कारण माझ्या निर्णयाचा बोजा

मी आपल्या विचारशक्तीवर घालून तो आपल्या गळीं बांधण्याची माझी इच्छा नाहीं. मला तुमचें खरेंखुरें मत पाहिजे आहे. माझे विचार मी उद्‌इक आपल्यासमोर ठेवीन. परिषदेचें अध्यक्षस्थान दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. आपल्या आमंत्रणांत मला पंजाबच्या नवप्रभाताचीं सुचिन्हें दिसूं लागली ह्मणूनच मी हें स्थान स्विकारलें. अ. भा. मुस्लिम लीगच्या अधिवेशनानें जगभर गाजत असलेला ' पाकिस्तान ' ठराव ज्या महिन्यांत याच शहरीं जाहीर केला, त्याच महिन्यांत त्याच ठरावाला पवित्र भावनेनें मस्तकीं धारण करण्यासाठीं पंजाबचा नवोदित तरुणवर्ग एक जागीं येतो आहे. हा शुभ योगायोग आहे. चालू महिन्याचे नांव मार्च ह्मणजे ' आगे बढो ' आहे. ज्याअर्थी या महिन्याच्या पहिल्या तारखेस परिषद भरली आहे त्याअर्थी आतां तरुणवर्गानें ' आगे बढो ' ही सिंहगर्जना करूनच कदम उचलला पाहिजे.

आज पंजाबचा विद्यार्थीवर्ग लीगच्या अत्यंत महत्वाच्या पाकिस्तान ठरावाला आपण एकमुखी पाठिंबा देण्यासाठीं एकत्र झाला आहे हें अत्यंत अभिनंदनीय आहे.

त्या नंतर लीगच्या पाकस्तान ठरावाला संपूर्ण पाठिंबा देणारा आणि त्यासाठीं लागेल तो स्वार्थत्याग करण्याचा

दृढनिश्चय जाहीर करणारा ठराव मांडला गेला व तो ए मुखानें जयघोषांच्या गर्जनेंत मंजूर झाला.

पंजाब मु. विद्यार्थीसंघाचे अध्यक्ष जनाब मिर्झा अबदुल हमीद व भारतीय मुस्लिम विद्यार्थीसंघाचे अध्यक्ष जनाब नौमन व अन्याच वक्त्यांचीं या ठरावावर दणदणीत भाषणें झालीं.

पंजाब मुस्लिम विद्यार्थीसंघानें भरविलेल्या स्पेशल पाकिस्तान परिषदेचे नियोजित अध्यक्ष कायदे आजम मोहम्मद अली जिन्हा यांची स्पेशल गाडी ता. १ मार्च रोजीं सकाळीं लाहोरास पोचली. गाडी स्टेशनांत येतांच ' अल्लाहो अकबर कायदे आजम जिंदाबाद ' वगैरे जयनादांनीं स्टेशन कंपायमान झालें. ना. मिंया अबदुल हई शिक्षणमंत्रि, नव्वाब सर शाहा नवाजखान-अध्यक्ष, प्रांतीक मुस्लिम लीग,जनाब मलीक बरकत अली. एम. एल. ए., खा. ब. मौ. गुलाम मोहियोद्दीन आणि परिषदेचा अधिकारीवर्ग व हजारों विद्यार्थी प्लॅटफार्मवर हजर होते.

प्रचंड गर्दीच्या तुफान लाटेपुढें आगाऊ तयारीचा बंदोबस्त निष्फळ झाला व लोकांचा लोंढा फाटक तोडून प्लॅटफार्मवर घुसला. सर्वांची एकच इच्छा कीं, कायदे आजमचें अगदीं जवळून स्वागत करावें. गाडी आली पण ती नेहमींच्या

प्लॅटफार्मवर उभी न करतां दुसऱ्या एका प्लॅटफार्मला लावली गेली. लोकसमुदायाचा प्रचंड लोंढा वरील पुलावरून धावतच त्या प्लॅटफार्मवर गेला. इतकी गर्दी आणि इतका उत्साह उसळला होता कीं, अगदीं मिनतवारीच्या विनवणीनेही कायदे आजमनां स्टेशनाबाहेर येण्यास ९० मिनिटें लागली. ते मोटारीतून थेट इस्लामिया कॉलेजला गेलें तेथें त्यांनीं लीग ध्वजारोपण केले.

या प्रसंगीं नवाबजादा लियाकत अलीखान व चौधरी खलीक- उझ-झमान अलीगड-दिल्लीहून आलेले प्रतिनिधी व स्थानिक विद्यार्थी हजर होते.

## झेंड्याचे महत्त्व.

ध्वजारोपण करतांना कायदे आजम म्हणाले'मुस्लिम लीगने सर्व मुस्लिमानां एकत्र होता येईल असें व्यासपीठ व कार्यक्रम तुमच्यापुढे ठेवले आहे. लीगचा आजचा कार्यक्रम लाहोर अधिवेशनाच्या जगप्रसिद्ध ठरावाची अंमलबजावणी करणें हाच आहे. आणि लीगच्या या कृत्यनिश्चयाला अडथळा करावयास जगांतली कोणतीही शक्ति समर्थ नाहीं.

लीगच्या सब्ज झेंड्याचे पावित्र्य व महत्व सांगताना ते म्हणाले ' या झेंड्यानें हिंदी मुस्लिमांचें महत्व फक्त हिंदुस्थानातच नव्हे तर सर्वत्र जगांत वाढविलें आहे. या झेंड्याच्याच प्रभावानें नऊ कोटी मुस्लिमांच्या न्याय हक्कापुढें मि.. ॲमेरीनाही नमावें लागले. या झेंड्यानेंच अमेरिकन जनता हिंदी राजकारणाबद्दल आणि विषेशत: हिंदी मुस्लिमांच्या आकांक्षा विषयीं सहानुभूतीपूर्वक विचार करूं लागली आहे.

## कायदे आजमचें भाषण.

पंजाब मु.वि.संघाच्या स्पेशल पाकिस्तान अधिवेशनच्या दुसरे दिवशीं कायदे आजम मोहम्मदअली जिन्हा यांनीं पाकिस्तानचें ध्येय गांठण्यासाठीं काय केले पाहिजे हें विशद करतानां सांगिले ' प्रथम मुस्लिमांनीं राष्ट्रसंवर्धक योजनांचा पाया घातला पाहिजे. राष्ट्राला कार्यक्षम आणि स्वत:चे सरकार चालावेण्याइतेंक समर्थ करण्यासाठीं:प्रमुख तीन बाबींची-शिक्षण, अर्थिक शक्ति, व्यापार व उद्योगधंद्याच्या वाढीनें परकीय हल्ल्यापासून देशाचे संरक्षण करण्याची ताकद, आणि अंतर्गत शांतता राखण्याच्या सामर्थ्याच्या मजबूत पायावर उभारणी केली पाहिजे. या शक्तित्रयींवरच राष्ट्राचें जीवन आहे. आजला मुसलमान समाजाच्या तळाशीं पडलेले आहेत.

हा कार्यक्रम शांतपणे स्वावलंबनपूर्वक व आत्मविश्वासानें पुरा करतांना धमकीची किंवा चढेलपणाची भाषाच बोलता कामा नये. आपला कार्यक्रम प्रामाणिकतेचा असल्यामुळें तो यशस्वी होणारच. पाकिस्तान विरोधकांची शांतपणे गैरसमजूत दूर करा म्हणजे नाहक तेढीला आळा बसेल. मला खात्री आहे कीं, या विरोधकांना समजून येईल की आजच्या गुंतागुंतीच्या प्रश्नावर पाकिस्तान हा एकच परिणामकारक तोडगा आहे विरोधकांच्या आक्षेपांचा मी पूर्ण विचार केला आहे. 'भारतमातेचे तुकडे-आजवर कधींही नसलेल्या पण विरोधकांनीं उगाच कोलाहल सुरू केलेल्या अखंडत्वाचें खंडन-पाकिस्तान योजना इस्लामविरोधी' वगैरे वगैरे मुसलमानांची सर्वांगीण उन्नति करणारे पाकिस्तान इस्लाम विरोधी कसें होते? आणखीन एक मोठा भयंकर आक्षेप घेतला जातो कीं मुस्लिम हिंदुस्तान वेगळा केला तर ते बाकीचा हिंदु हिंदुस्थान लवकरच गडप करतील.

या आक्षेपाच्या खंडनापूर्वी 'मुस्लिम हिंदुस्तानांतील अल्पसंख्य हिंदुचे काय होणार?' हा प्रश्न निकालांत काढला पाहिजे. या प्रश्नाला हेंच उत्तर कीं, 'हिंदु हिंदुस्तानांतिल मुस्लिमांचे काय होणार? असल्या या आक्षेपानां भिऊन जेथें

बहुसंख्य आहेत अशा प्रांतासह नऊ कोटी मुस्लिमांना देशभर पसरलेल्या हिंदु बहुसंख्यांकांच्या आहारीं सोडून द्यावें काय?

२९ कोटी हिंदूंनीं अवघ्या नऊ कोटी मुस्लिमांना कां भ्यावें ? उलटपक्षी मुस्लिम हिंदुस्तान हिंदु हिंदुस्थानचा परचक्रापासून संरक्षण करणारा जिवलग साथीदार होईल. कोणत्याहि परचक्राचा हल्ला मुसलमान कधीहि सहन करणार नाहीं. आणि या कामगिरीचें हिंदूहि चीज करतील असा विश्वास आहे. नुसत्या कागदी घटनेनें परचक्राची आपत्ति दूर होणार नाहीं. तर उलट या आपत्तीची भीति दुणावेलच. अखंड भारताच्या गोंडस नांवाखालीं ब्रिटिश संगीनीच्या सहाय्यानें घटना राबवीत मुसलमानांना संपूर्णपणें चिरडून टाकण्याची मनोवृत्ति कॉंग्रेस व हिंदु हिंदुस्थाननें बदलल्या-शिवाय ही आपत्ती दूर होणार नाहीं. माझा ब्रिटिशांना सवाल आहे कीं ते हिंदू राज्याचे पोलिस व्हावयास तयार आहेत काय ? आणि अशी घटना मूर्त स्वरूपांत येईल काय ?

आतां पंजाबच्या शीखांच्या नसत्या भीतीचा विचार करूं या ! हिंदुस्थानच्या फाळणीनंतर शीख जातीला फक्त पंजाबांतच नव्हे तर वायव्य पाकिस्तान भागांत फार महत्वाचें स्थान लाभणार आहे. संयुक्त हिंदुस्थानच्या कारभारांत

शीखांचें स्थान अगदींच थोड्या संख्येमुळें ' दर्यामे खसखस ' प्रमाणें होईल, पण विभागलेल्या पाकिस्थानांतील राजकारणांत त्यांच्या प्रत्येक आकांक्षा परिपूर्ण होणार आहेत. धमक्यांची व यादवीची भाषा करण्याऐवजीं शीखांनीं शांतमनानें पाकिस्तान योजनेचा अभ्यास केला, तर मला विश्वास आहे कीं. त्यांना आपली चूक कळून येईल व पंजाबच्या दोन मोठ्या जमातींत सलोखा व दोस्ती वाढविली पाहिजे याची त्यांना खात्री पटेल, शीखांनींहि लक्षांत ठेवावें कीं ते अल्पसंख्यांक आहेत आणि त्यांना तसें रहाणें भागच आहे.धमक्या-यादवी व कलागत सुरू करून ते आपला अल्पसंख्यांकपणा बदलूं शकत नाहींत.

ऐतिहासिकदृष्ट्या विचार केला तरी हिंदु व मुसलमानांना विभक्त राष्ट्राचा संसार थाटूं दिल्याशिवाय राजकीय गाडा सुरळीत चालणार नाहीं. आजचा आमचा झगडा नुसता भौतिक नाहीं तर तो अध्यात्मिक आहे. इस्लामप्रणित मुस्लिम राष्ट्राच्या प्राणप्रतिष्ठेसाटीं आज मुसलमान झगडतो आहे. म्हणूनच हा त्याच्या जगण्यामरण्याचा प्रश्न आहे. हा कांहीं बाजारचा सौदा नाहीं.

सुरवातीसच कायदे आजमनीं मुस्लिम लीगच्या चळवळीचा उहापोहा करतांना म्हटले ' अवघ्या तीन वर्षांत यक्षीणीच्या कांडीप्रमाणें लीगनें ९ कोटी मुसलमानांची संयुक्त फळी एकाच व्यासपीठाभोवतीं व एकाच निशाणाखालीं

खडी केली. मुसलमानांच्या गेल्या २०० वर्षांच्या इतिहासांत कधीं अशी घटना घडली नाहीं कीं या देशाच्या राष्ट्रीय जीवनांत लीगनें मुसलमानांना अभिमानास्पद स्थानावर बसविलें आहे.

चालू महायुद्धाकडे वळून ते म्हणाले ' ब्रिटिश सरकारविरुद्ध आमची कांहींही गाऱ्हाणी असोत यावेळीं देशाच्या हिताच्या दृष्टीनें सरकारच्या युद्ध प्रयत्नांत आणि संरक्षक योजनांत मुसलमानांनीं अडथळे करूं नयेत असें लीगने जाहीरही केले आहे. सरकारला पेंचांत पकडण्याची तर तिची इच्छाच नाहीं इतकेंच नव्हेतर मध्यवर्ति व प्रांतिक सरकारांत लीगच्या प्रतिनिधींना खरीखुरी सत्ता दिल्यास संपूर्ण सहकारिता करावयास लीग तयार आहे.

लीगने हजारो सभातून जाहीर केलें कीं मुसलमान अल्पसंख्य नाहींत तर एक पराजित राष्ट्र आहे. राष्ट्रसंघाच्या मसुद्याप्रमाणें संरक्षण देण्याची भाषा हिंदु पुढारी वारंवार बोलतात हें आश्चर्याचें आहे. या पुढाऱ्यांना कळावयास पाहिजे कीं राष्ट्रसंघ कधीच मेला आहे. यांच्या राष्ट्रसंघाच्या घोषणे वरून हेंच सिद्ध होते कीं हिंदु पुढारी अद्याप २५ वर्षे मागे आहेत.

त्या नंतर पाकिस्तानचा संपूर्ण प्रचार खेड्यापाड्यांतून तावडतोब करण्यासाठीं एक कमेटी कायम करणारा ठराव मंजूर झाला.

# "मोठ्यांच्या चष्म्यांतून"

" हिंदी जनतेच्या स्वातंत्र्या करितां व त्यांच्या न्याय हक्कांच्या संरक्षणाकरितां आपले प्राण धोक्यांत घालूनहि जिन्हांनीं जी अपूर्व कामगिरी बजावलेली आहे, ती हिंदी जनतेच्या स्मरणांतून कधींहि नष्ट होणार नाहीं."

श्रीमती ॲनी बेझंट बाई.

" जिन्हा हिंदु-मुस्लिम ऐक्याचें प्रतिनिधी आहेत. ते एक भाग्यवान राष्ट्रीय पुरूष असून, त्यांच्या जिवंतपणींच हिंदी जनतेकडून त्यांचा योग्य आदर सत्कार करण्यांत आला आहे."

देवी सरोजिनी नायडू.

" जिन्हा हे हिंदु-मुस्लिम ऐक्याचें प्रवर्तक आहेत."

ना. गोखले.

" हिंदी स्वातंत्र्याचे कट्टे पुरस्कर्ते व एक आदर्श समाज-सेवक ह्मणून, जिन्हांचे ठिकाणीं कित्येक सद्गुण आहेत आणि त्या गुणांचे अनुकरण प्रत्येक अद्यावत् तरुणानें करावें !"

खासदार श्री. सत्यमूर्ति.

" जिन्हांची व माझी पुष्कळ माहिती आहे. त्यांच्या निश्चित मतप्रणालीमुळें व निस्वार्थ वृत्तिमुळें त्यांच्या विषयीं मला नेहमींच आदर वाटतो."

सर सी. पी. रामस्वामी अय्यर.

# शुद्धिपत्र

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ९ | १० | ईनामका | ईमानका |
| ११ | १० | पोठ | पेठा |
| २७ | १० | मातृभूमि | जन्मभूमि |
| ३० | १९ | प्रामुख्यान | प्रामुख्यानें |
| ३६ | १४ | सर्व | सर्व |
| ४५ | १७ | सल्यानिशीं | सह्यानिशीं |
| ४७ | ९ | श्वेतपत्रिकेच्या | श्वेतपत्रिकेचा |
| ४८ | ८ | सर्वत्रकडून | सर्वत्रकडून अनर्थ |
| ४८ | ९ | आस्थत्व | अस्तित्व |
| ४८ | १५ | संघटना माहिती | संघटनेची जाणीव |
| ५६ | २० | मिळतात | मिळत |

सूचना:—पान ८८ ओळ ४ व १० या ठिकाणीं कॉंग्रेस मंत्रिमंडळ असें चुकून पडलें आहे. त्या ठिकाणीं हंगामी मंत्रिमंडळ ( कूपर, कंबळी, मेहता ) असें वाचावें.

# " मोठ्यांच्या चष्म्यांतून "

" हिंदी जनतेच्या स्वातंत्र्या करितां व त्यांच्या न्याय हक्कांच्या संरक्षणाकरितां आपले प्राण धोक्यांत घालूनहि जिन्हांनीं जी अपूर्व कामगिरी बजावलेली आहे, ती हिंदी जनतेच्या स्मरणांतून कधींहि नष्ट होणार नाहीं."

श्रीमती ॲनी बेझंट बाई.

" जिन्हा हिंदु-मुस्लिम ऐक्याचें प्रतिनिधी आहेत. ते एक भाग्यवान राष्ट्रीय पुरूष असून, त्यांच्या जिवंतपणींच हिंदी जनतेकडून त्यांचा योग्य आदर सत्कार करण्यांत आला आहे."

देवी सरोजिनी नायडू.

" जिन्हा हे हिंदु-मुस्लिम ऐक्याचें प्रवर्तक आहेत."

ना. गोखले.

" हिंदी स्वातंत्र्याचे कट्टे पुरस्कर्ते व एक आदर्श समाज-सेवक म्हणून, जिन्हांचे ठिकाणीं कित्येक सद्गुण आहेत आणि त्या गुणांचे अनुकरण प्रत्येक अद्यावत् तरूणानें करावें !"

खासदार श्री. सत्यमूर्ति.

" जिन्हांची व माझी पुष्कळ माहिती आहे. त्यांच्या निश्चित मतप्रणालीमुळें व निस्वार्थ वृत्तिमुळें त्यांच्या विषयीं मला नेहमींच आदर वाटतो. "

सर सी. पी. रामस्वामी अय्यर.

# शुद्धिपत्र

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ९ | १० | ईनामका | ईमानका |
| ११ | १० | पोठ | पेठा |
| २७ | १० | मातृभूमि | जन्मभूमि |
| ३० | १९ | प्रामुख्यान | प्रामुख्यानें |
| ३६ | १४ | सर्घ | सर्व |
| ४५ | १७ | सल्यानिशीं | सह्यानिशीं |
| ४७ | ९ | श्वेतपत्रिकेच्या | श्वेतपत्रिकेचा |
| ४८ | ८ | सर्वत्रकडून | सर्वत्रकडून अनर्थ |
| ४८ | ९ | अस्थित्व | अस्तित्व |
| ४८ | १५ | संघटना माहिती | संघटनेची जाणीव |
| ५६ | २० | मिळतात | मिळत |

सूचना:—पान ८८ ओळ ४ व १० या ठिकाणीं कॉंग्रेस मंत्रिमंडळ असें चुकून पडलें आहे. त्या ठिकाणीं हंगामी मंत्रिमंडळ ( कूपर, कंबळी, मेहता ) असें वाचावें.

# " निझामुद्दीन फ्लॉवर्स कंपनी सांगली. "

आमचे दुकानी लग्न सराई करितां व सभा, समारंभाच्या वेळीं लागणारें हार, तुरे, शेरे, जाळी, मोटारजाळी वगैरे पुष्प साहित्य मागाल त्या नमून्याचे कलाबूत लावून वेळेवर करून देऊं

परगांवच्या ऑर्डरी रेल्वे पार्सलनें अगर मोटारींतून पाठविण्यांत येतील. खालील पत्त्यावर आजच लिहा.

पत्ता:—निझामुद्दीन फ्लॉवर्स कंपनी,

मारुतीरोड सांगली.

---

—० रंगित व मोहक छपाईसाठीं ०—

## " अरुण प्रिंटिंग प्रेस, " सांगली.

---

# " दि बारस्कर ग्राइंडिंग मिल सांगली. "

प्रो:—एम्. एच्. बारस्कर

सध्याच्या कंट्रोलच्या दिवसांत आमचेकडे वजनकरून दळण घेतले जाते व दिले जाते. एकाच वेळीं भरपूर स्टॉक दळून देण्याचे एकच ठिकाण म्हणजे " दि बारस्कर फ्लोअर मिल "

आजच खात्री करून ध्या.

तसेंच फ्लोअर मिलचे जुने पार्ट्स, जुनी मशिनरी व एसि करंटच्या इलेक्ट्रिक मोटर्स आमचेकडे विकत मिळतील.

## —❀“ नबाब क्लॉथ स्टोअर्स सांगली ”❀—

पाण्याच्या टाकी जवळ.

[ उत्तम ‘रू’ चा भरपूर स्टॉक व गाद्यांचा जंगी कारखाना ]

आमचेकडे सर्व प्रकारचे फॅन्सी शर्टिंग, कोटिंग, लुगडी व पातळें तसेंच रेडीमेड गाद्या, तक्के, उशा, मच्छरदाण्या, रजई व सायकल सीट कव्हर्स वगैरे योग्य भावांत ऑर्डरी प्रमाणें वेळेवर तयार करून मिळतील.

प्रो:—शेठ हाबीब मीराभाई गादीवाले, सांगली.

---

## --० दि गुजरात नॉव्हेल्टी स्टोअर्स ०—

स्टेशनरी, कटलरी, ग्लासवेअर व चिनीमाती बरण्याचे स्टॉकिस्ट.

आमचेकडे चिनी माती बरण्या व कांच माल किरकोळ व ठोक भावांत सर्वत्र पूरवण्यांत येतो, आजच लिहा.

पत्ता प्रो:—हुसेन अली नझीर अली,

मेन-रोड सांगली. ( एस्. एम्. सी. )

---

## “ न्यू जनरल स्टोअर्स सांगली. ”

सर्व प्रकारचे स्टेशनरी, कटलरी, चिनीमाती बरण्या व कांचमालाचे होलसेल व्यापारी. आमचेकडील कोणताहि माल किर्कोळ व ठोक भावांत दुकानदारानां पुरवण्यांत येतो.

पत्ता:—थिएटर रोड सांगली. प्रो:—एस्. ए. रहीम.

—० महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध बिडी कारखानदार ०—

❀ आब्बास राजुभाई सांगलीकर ❀

आब्बास राजूभाइ यांच्याच बिड्या सर्वत्र वापरल्या जातात.

व्यापारी दराबद्दल आजच लिहा.:—

पत्ता:—आब्बास राजुभाई सांगलीकर, बिडी मर्चंट.

दुकान लक्ष्मी मार्केट मिरज (एस्. एम्. सी.

उत्कृष्ट छपाईसाठीं " अरुण प्रिंटिंग प्रेस, " सांगली.

## " रोशन ॲसोसिएशन मिरज "

प्रे:—अल्लाबक्ष याकूबसाहेब गोलंदाज

से:—जी. एस्. चिनावडे     स्थापना:—४—६—१९४४.

खजिनदार:—आब्बास राजूभाइ बिडी मर्चंट.

मिरज एथील " रोशन ॲसोसिएशन " ही एक सामाजिक कार्य करणारी उपयुक्त संस्था आहे. गरींब, अनाथ व बेवारशी मुसलमान बांधवांच्या मृतांची व्यवस्था आपल्या पवित्र इस्लामच्या आज्ञेनुसार उत्तम प्रकारे करून आपल्या महत्तम कार्याची पूर्तता करणें, यां शिवाय दुसरें महत्वाचें कार्य कोणतेच नसावे असे मला वाटते. ह्मणून महाराष्ट्रीय सर्व मुस्लिम बांधवानीं तन, मन, धन. आर्पण करून या संस्थेस साहाय्य करावे अशी मी शिफारस करतो.

डि. डेप्यूटी कलेक्टर इ. डी. सातारा.

खानसाहेब ए. अझीज.